
पुणे, बुधवार, ७ मे २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 158 • वर्ष ४ थे, अंक १५८ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



'आयटी' नगरीला आता 'महामेट्रो'चे 'कोंदण'...!

P३



१२ जलतरणात महाराष्ट्राची पदक सप्तमी

## At a Glance

### सूरतकडे जाणाऱ्या बसचा भीषण अपघात

**नंदुरबार :** धुळे - सूरत राष्ट्रीय महामार्गावर कोंडाईबारी घाटातून जाणाऱ्या धुळे-सूरत बसचा भीषण अपघात झाला. या अपगातात सुमारे ४० प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर विसरवाडी आणि साक्री इथल्या ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मागील अनेक दिवसांपासून धुळे-सूरत राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. या महामार्गावर नेहमीच अपघात होतात. त्यामुळे » पान ७ वर

### म्हणून मोदींनी काश्मीर दौरा रद्द केला

**रांची :** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मंगळवारी आरोप केला की, गेल्या महिन्यात पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या "तीन दिवस आधी गुप्तचर अहवाल मिळाल्यानंतर" पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचा काश्मीर दौरा रद्द केला. त्यांनी असा दावाही केला की केंद्राने सर्वपक्षीय बैठकीत "गुप्तचर अपयश" स्वीकारले आणि लोकांचे संरक्षण करण्यासाठी » पान ७ वर

# निवडणुकीसाठी सर्वोच्च आदेश

## स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका घ्या, असे आदेश सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. निवडणुका थांबवण्याचे आम्हाला काही कारण नाही वाटत, असं मतही सुप्रीम कोर्टाने नोंदवले.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात आज सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. यात सुप्रीम कोर्टाने चार महिन्याच्या आत निवडणुका घेण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले आहेत. तसेच चार आठवड्यांच्या आत निवडणुकांसदर्भातील अधिसूचना काढण्यासही सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे.

ओबीसी आरक्षणामुळे निवडणुकांचा प्रश्न 'जैसे थे' ठेवण्यात आला होता. मात्र आता ओबीसींना २०२२ पूर्वी असलेले आरक्षण कायम ठेवून सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले आहेत. यावर राज्य सरकारनेही आक्षेप नसल्याचे सांगितल्याने चार महिन्यात निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने असे नमूद केले की ओबीसी आरक्षणासंदर्भात उद्भवलेल्या अनेक मुद्द्यांमुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या अनेक वर्षांपासून झाल्या नाहीत. मात्र आता स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकीबाबत चार आठवड्यात नोटिफिकेशन काढा आणि चार महिन्यांच्या आत निवडणूक घ्या. या निवडणुका अडवून ठेवण्याचे कोणतेही कारण आम्हाला दिसत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. तसेच ओबीसींच्या जागा कमी होत्या हा याचिकाकर्त्यांचा दावा होता, त्यावर कोर्टाने २०२२ पूर्वीची स्थिती कायम राहील, असे निर्देश दिले. राज्य सरकारला आणि राज्य निवडणूक आयोगने दिलेल्या कार्यकाळात कार्यवाही करावी, असे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, मुंबई महापालिकेसह राज्यातील इतर महापालिकांच्या निवडणुका करोना » पान ७ वर

**निवडणूक प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था**

| | |
|---|---|
| एकूण महापालिका | २९ |
| मुदत संपलेल्या महापालिका | २९ |
| एकूण नगरपरिषदा | २४३ |
| मुदत संपलेल्या नगरपरिषदा | २२८ |
| एकूण नगरपंचायती | १४२ |
| मुदत संपलेल्या नगरपंचायती | २९ |
| एकूण जिल्हा परिषदा | ३४ |
| मुदत संपलेल्या जिल्हा परिषदा | २६ |
| एकूण पंचायत समिती | ३५१ |
| मुदत संपलेल्या पंचायत समिती | २८९ |

# पुणे शहर भाजप निवडणुकीसाठी सज्ज

## भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांची प्रतिक्रिया

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुढील चार महिन्यात राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्यात, या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी स्वागत केले असून, आम्ही पक्ष म्हणून निवडणुकीसाठी सज्ज असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

घाटे म्हणाले, "पुणे शहरात भाजपचे संघटन अतिशय मजबूत आहे. आम्ही नुकतीच शहरात साडेपाच लाख प्राथमिक पक्ष सदस्यांची नोंदणी पूर्ण केली आहे. त्याबरोबर नऊ हजार सक्रिय सदस्य नोंदणीचे लक्ष्य अंतिम टप्प्यात आहे. गेल्या निवडणुकीत भाजपचे १०० नगरसेवक निवडून आले होते. विविध पक्षातून पाच नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी १०५ हून अधिक नगरसेवक निवडून आणण्याचे आमचे उद्दिष्ट आहे."

**राजकारण**

घाटे म्हणाले, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पुणेकरांनी



भाजपला निर्विवाद यश मिळवून दिले. पुणे लोकसभेसह आम्ही लढवलेल्या विधानसभेच्या सहाही जागा आम्ही जिंकल्या. एका ठिकाणी मित्र पक्षाला विजय मिळाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकार यांच्या माध्यमातून पुणे आणि परिसरात खूप मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. विविध लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचत आहेत. महापालिकेतील पाच वर्षांच्या सत्ता काळात भाजपने मोठ्या प्रमाणात पायाभूत विकासकामे केली आहेत. त्यामुळेच लोकसभा, विधानसभा निवडणुकीप्रमाणे महापालिकेतही पुणेकर भाजपला विजयी करतील असा विश्वास वाटतो, असेही ते म्हणाले.

# युद्धाची रंगीत तालीम

## महाराष्ट्रातील १६ ठिकाणांवर उद्या होणार मॉकड्रील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानमधील संघर्ष अधिकच वाढला आहे. पाकिस्तान विरोधात भारताने कठोर पाऊल उचलण्यास सुरुवात केली आहे. तर पाकिस्तानेही प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे. असे असतानाच युद्धाच्या चर्चांना उधाण आले आहे.

केंद्रीय गृहमंत्रालयानं अनेक राज्यांना युद्धसज्जतेच्या पार्श्वभूमीवर ७ मे रोजी मॉक ड्रील घेण्याचे निर्देश दिले आहेत. देश स्तरावर एकूण २४४ जिल्ह्यांमध्ये मॉकड्रील पार पडणार आहे. यापूर्वी १९७१ मध्येही राज्याराज्यात मॉक ड्रील घेण्यात आलं होतं. त्यानंतर नागरिक सुरक्षिततेच्या हेतूनं हे पाऊल उचलल्याने खळबळ उडाली आहे.

### महाराष्ट्र सरकार हायअलर्ट मोडवर

- युद्धकाळातील उपायांचा सराव या मॉक ड्रीलअंतर्गत घेतला जाणार असून यादरम्यान नागरिकांनी युद्धजन्य परिस्थिती आणि हवाई हल्ल्यादरम्यान स्वत:चं आणि इतरांचं संरक्षण नेमकं कसं करायचं यासंदर्भातील प्रशिक्षण दिलं जाणार आहे. महाराष्ट्रातील १६ ठिकाणांवर त्याचा सराव पार पडेल. केंद्र सरकारच्या मॉक ड्रिलच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकार हायअलर्ट मोडवर आहे.

### सायरन वाजताच काय करावे?

- सायरन वाजताच नागरिकांनी सर्वप्रथम घरातील सर्व लाईट बंद करावे.
- तातडीने सुरक्षित ठिकाणी आसरा घ्या.
- सायरन वाजताच इमारतीपासून दुर जावे.
- किमान ५ ते १० मिनिटांच्या आत सुरक्षित स्थळी जावे.
- मोकळ्या जागेपासून दूर राहा.

### कोणत्या ठिकाणी पार पडणार मॉकड्रील?

मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, उरण, तारापूर, नागोठणे, मनमानड, सिन्नर, थळवायशेत, छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या ठिकाणी हे मॉकड्रील पार पडेल.

### मॉकड्रीलमध्ये नेमकं काय होणार?

- हवाई हल्ल्याची पूर्वसूचना दिली जाईल.
- हल्ल्यावेळी सुरक्षित ठिकाणी लपून बसण्याचं प्रशिक्षण दिले जाईल.
- रात्रीच्या वेळी शत्रूला महत्त्वाची ठिकाणं समजू नये यासाठी ब्लॅकआऊटचं प्रशिक्षण देणार आहे.
- महत्त्वाचे कारखाने शत्रूला दिसू नयेत म्हणून उपाययोजना करण्यात येतील.
- सामान्य नागरिकांना बचावकार्याचं प्रशिक्षण दिलं जाणार
- घरात पाणी, अन्न, इंधनाचा साठा कसा करावा याचं महत्त्वं पटवून दिलं जाणार
- हवाई हल्ल्यात कोणी जखमी झाले तर प्राथमिक उपचार करुन त्याला तातडीने रुग्णालयात कसे पोहोचवायचे, याचा सराव मॉकड्रीलमध्ये केला जाईल.



# गृह मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक

## हवाई हल्ल्याचा इशारा देणारा सायरन वाजणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** देशात उद्या होणाऱ्या मॉक ड्रिलबाबत गृह मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक सुरू झाली आहे. गृह सचिव २४४ नागरी संरक्षण जिल्ह्यांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेत आहेत. ७ मे रोजी होणाऱ्या मॉक ड्रिलबाबत ही एक महत्त्वाची बैठक आहे, जी गृहसचिव गोविंद मोहन यांच्या अध्यक्षतेखाली नॉर्थ ब्लॉकमध्ये आयोजित करण्यात आली आहे. बैठकीला राज्यांचे मुख्य सचिव आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती स्पष्ट करते की हा सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित राष्ट्रीय स्तरावरील समन्वय प्रयत्न आहे. ७ मे म्हणजे उद्या होणाऱ्या मॉक ड्रिलसाठी तयारी आणि समन्वय सुनिश्चित करणे हा या बैठकीचा उद्देश आहे. यामुळे, एनडीआरएफ, नागरी संरक्षण महासंचालक, अग्निशमन आणि हवाई संरक्षण महासंचालक यांच्यासह राज्य सरकारांच्या प्रतिनिधींनीही यात भाग घेतला आहे. याशिवाय, सीमावर्ती आणि संवेदनशील » पान ७ वर

### पुण्याचा समावेश ब श्रेणीत

केंद्र सरकारने मॉक ड्रिल आयोजित करण्यात येणाऱ्या ठिकाणांचे तीन श्रेणीत वर्गीकरण केले आहे. अ श्रेणीत देशभरातील १३ शहरे असून यात मुंबई, उरण, तारापूर यांचा समावेश आहे. ब श्रेणीत देशभरातील तब्बल २०१ शहरे असून यात ठाणे, पुणे, नाशिक, रोहा-धताव-नागोठणे, मनमाड, सिन्नर, थळ-वायशेत, पिंपरी-चिंचवड यांचा समावेश आहे. तिसऱ्या श्रेणीत छ. संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

### पोलिस अधीक्षक कॉंवत यांच्या घरातच गांजा...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** बीड जिल्ह्यात आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, पोलिस अधीक्षकांच्या निवासस्थानाच्या परिसरातच एका पोलिस कर्मचा-याला गांजा ओढताना पकडल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी संबंधित कर्मचा-यावर तातडीने कारवाई करत थेट निलंबनाची शिक्षा केली आहे. पोलिस दलाच्या शिस्तीला आणि प्रतिमेला धक्का पोचवणाऱ्या या प्रकारामुळे जिल्हाभरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिस अधीक्षकांच्या निवासस्थानाच्या डागडुजीचे काम सुरू आहे. याची पाहणी करण्यासाठी काल नवनीत कॉंवत » पान ७ वर

# ऐतिहासिक घडामोड

## न्यायाधीशांच्या संपत्तीची माहिती सार्वजनिक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशातील न्यायव्यवस्थेमधील पारदर्शकता वाढवणे त्याचबरोबर जनतेचा विश्वास दृढ करणे या दिशेने सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. ६ मे) एक ऐतिहासिक पाऊल उचलले. सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधीशांच्या संपत्ती आणि कर्जाच्या (दायित्वाच्या) घोषणांची माहिती सार्वजनिक केली आहे. ही माहिती सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आली आहे. इतिहासात प्रथमच सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या संपत्तीची घोषणा सार्वजनिक झाली आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि २० इतर न्यायाधीशांची माहिती अपलोड करण्यात आली आहे. यामध्ये भावी तीन सरन्यायाधीशांचाही समावेश आहे.

> न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरील आरोपांच्या चौकशीसाठी गठीत करण्यात आलेल्या तीन सदस्यीय समितीने ३ मे रोजीचा आपला अहवाल ४ मे रोजी मुख्य न्यायाधीशांकडे सुपूर्त केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने २८ मार्च रोजी इलाहाबाद उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीशांना सल्ला दिला होता की, सध्या न्यायमूर्ती वर्मा यांच्याकडे कोणतेही न्यायिक कार्य सोपवू नये.
> **- सर्वोच्च न्यायालय**

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या अधिकृत निवासस्थानी कथितरित्या रोख रक्कम सापडली. यानंतर सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखील खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संपत्ती सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला होता.

सर्वोच्च न्यायालयाने ५ मे रोजी जनतेच्या माहितीसाठी उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांच्या नियुक्तीची संपूर्ण प्रक्रिया वेबसाइटवर अपलोड केली आहे. ९ नोव्हेंबर २०२२ ते ५ मे २०२५ या कालावधीत उच्च न्यायालयातील न्यायाधीश म्हणून झालेल्या नियुक्त्यांसाठी सर्वोच्च न्यायालय कोलेजियमने दिलेल्या » पान ७ वर

# राज्यात दोन दिवस पावसाचा यलो अलर्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात मे महिन्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीचे संकट जाण्यास तयार नाही. मागील आठवड्यात राज्यातील अनेक भागांत अवकाळी पाऊस झाला. आता पुन्हा अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये ६ आणि ७ मे रोजी जोरदार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेने व्यक्त केला आहे.

दरम्यान, राज्यात पुढील ४८ तासांत सर्वत्र वादळी वा-यासह गारपीट होणार आहे. पुणे आणि आजूबाजूच्या परिसरात पुढील चार ते पाच दिवसांत सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता पुणे वेधशाळेने वर्तवली आहे. याशिवाय कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात पुढील पाच ते सात दिवस पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेने वर्तवली आहे.

मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात आणि विशेष करून विदर्भात गेल्या दोन दिवसांपासून सातत्याने गारपीट सुरू आहे. आता येत्या २४ तासांत विदर्भासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यात आणि विशेष करून



विदर्भात गेल्या दोन दिवसांपासून सातत्याने गारपीट सुरू आहे. आता येत्या २४ तासांत विदर्भासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

मुंबईच्या कुलाबा येथील प्रादेशिक हवामान केंद्राकडून जालना जिल्ह्यात आगामी तीन दिवस वादळी वा-यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस तर काही ठिकाणी गारपीट होण्याची देखील शक्यता वर्तवण्यात आली आहे. कमी दाबाचा पट्टा आणि चक्राकार वा-याच्या परिणामामुळे राज्यावर सध्या पावसाचे सावट आहे. विदर्भात काही ठिकाणी ४०-५० कि.मी. प्रतितास वेगाने वादळी वारे वाहू शकतात. या पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान होत आहे.

#रा






## मित्रांच्या जाचाला कंटाळून तरुणाची आत्महत्या

**पुणे :** केसनंद येथे एका व्यक्तीने लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन संपविले जीवन. त्याने सुसाईड नोट लिहिली होती. याप्रकरणी चौघांवर वाघोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामदास शिंदे (रा. कदमवाकवस्ती) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी कानिफनाथ अवताडे (रा. नायगाव), मुन्नीराम चौधरी (रा. थेऊर फाटा), नंदकुमार सातव (रा. सहजपूर), राजेंद्र खेडेकर (रा. शुक्रवार पेठ) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर तेजस शिंदे यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिंदे यांनी लोणीकाळभोर येथील मंगल कार्यालयात डेकोरेटरचे काम केले होते. मंगल कार्यालयाचे मालक खेडेकर यांनी अवताडे, मुन्ना यांच्या सांगण्यावरून टोचून बोलून, अपमानास्पद वागणूक दिली. नंतर कामावरून काढून टाकले. तसेच सातव यांच्याकडूनही शिंदे यांना त्रास होत होता.




## दर्शन रांगेत दागिने चोरणाऱ्या महिलांना अटक

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिरातील दर्शन रांगेत महिला भाविकांकडील दागिने चोरणाऱ्या दोघींना विश्रामबाग पोलिसांनी अटक केली. माधुरी संतोष डुकरे-घाडगे (वय ३०), काव्या तनवीर जाधव (वय २१, दोघी रा. यवत रेल्वे फाटकाजवळ, यवत, ता. दौंड, जि. पुणे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला इंदापूर तालुक्तातील विठ्ठलवाडीतील रहिवासी आहेत. रविवारी (४ एप्रिल) दुपारी तीनच्या सुमारास त्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात दर्शनासाठी आल्या होत्या. त्या लहान मुलीला घेऊन दर्शन रांगेत थांबल्या होत्या. त्या वेळी आरोपी माधुरी आणि काव्या हिने तक्रारदार महिलेच्या मुलीच्या गळ्यातील ४० हजारांचे सोनसाखळी चोरुन नेली.

महिलेच्या लक्षात हा प्रकार आल्यानंतर तिने आरडाओरडा केला. दर्शनरांगेतील भाविकांनी माधुरी आणि काव्या यांना पकडले. पकडून सुरक्षारकांच्या ताब्यात दिले. पोलीस कर्मचारी काटे तपास करत आहेत. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही मध्ये कैद झाला आहे.



## ११ मे रोजी कोथरूडमध्ये गांधी दर्शन शिबीर

**पुणे :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने रविवार,दि.११ मे रोजी सकाळी साडेनऊ ते सायंकाळी साडेपाच या वेळेत 'गांधी दर्शन' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कोथरूड येथील गांधी भवनच्या सभागृहात हे शिबीर होणार आहे.१९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अशोक राणा(मिथक चिकित्सा),मुक्त पत्रकार प्रशांत कदम (न्यायव्यवस्था ते निवडणूक आयोग : स्वातंत्र्य आणि निष्पक्षतेवरचे आक्रमण),लोकसंस्कृतीच्या अभ्यासक स्नेहा टोम्पे ('मातृत्वतत्त्वांची मिथके') आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधी चे अध्यक्ष डॉ.कुमार सप्तर्षी हे मार्गदर्शन करणार आहेत. ' गांधी दर्शन' विषयावरचे हे २० वे शिबीर आहे.

## प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरु

**पुणे :** राज्य मंडळाने बारावीचा निकाल जाहीर केल्यानंतर आता विद्यार्थी-पालकांचे लक्ष पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकडे लागले आहे. शहरातील नामवंत महाविद्यालयांनी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाची प्रक्रियादेखील ऑनलाइनद्वारे सोमवारपासूनच सुरू केली आहे. यंदा प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची प्रक्रिया लवकर सुरू होत आहे.

निकालात घट झाल्याने पारंपरिक पदवी अभ्यासक्रमाच्या पात्रता गुणांमध्ये काही प्रमाणात घट होण्याची शक्यता आहे. शहरातील विद्यापीठे, स्वायत्त महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून काही महाविद्यालयांनी ही प्रवेश प्रक्रिया बारावीचा निकाल जाहीर झाला, त्याच दिवसापासून सुरू केली आहे. एकीकडे पारंपरिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरू होत आहे, तर दुसरीकडे अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना मात्र काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## अखेर 'मोकळा श्वास'...!





**पुणे** शहरातील अत्यंत महत्वाचा आणि रहदारीचा समजल्या जात असलेल्या मार्केटयार्ड जवळील गंगाधाम रस्त्याला अतीक्रमणांनी विळखा घातला होता, या रस्त्यावरच अनेक पथारी व्यवसायिक त्यांचा 'संसार' थाटत असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत होती. त्यामुळे नागरिक आणि वाहनचालकांनी महापालिका प्रशासनाकडे तक्रारी केल्या होत्या; त्याची गंभीर दखल घेत महापालिकेच्या अतीक्रमण विभागाने याठिकाणी कारवाई करत अनाधिकृत व्यवसायिकांचा 'बाजार' उठविला. त्यामुळे या रस्त्याने अखेर मोकळा श्वास घेतला आहे.

## आलापिनी जोशी यांना पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गानवर्धन संस्थेचे संस्थापक कै. कृ. गो. धर्माधिकारी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या संगीतसंवर्धक पुरस्कारासाठी कराड येथील स्वरनिर्झर संगीत अकादमीच्या संचालिका आलापिनी जोशी यांची निवड करण्यात आली आहे.

शास्त्रीय गायन, वादन आणि नृत्य या तीनही क्षेत्रात गेली ४८ वर्षे गानवर्धन संस्था कार्यरत आहे. शास्त्रीय संगीतामध्ये ज्ञानदान व प्रसाराचे काम करणाऱ्या कलाकारास संस्थेच्या वतीने संगीतसंवर्धक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. अमेरिकास्थित सुधीर धर्माधिकारी आणि सविता हर्षे हे पुस्काराचे प्रायोजक आहेत. मातोश्री कै. स्वरगंधा टिळक यांनी स्थापन केलेल्या स्वरनिर्झर संस्थेच्या माध्यमातून आलापिनी जोशी गेली २५ वर्षे संस्थेच्या संचालिका म्हणून काम पाहात आहेत. आलापिनी जोशी यांच्या सांगीतिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष दयानंद घोटकर यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे.

# ठेकेदारांची 'झाडाझडती'...!

### झाडणकामाच्या निविदाच रद्द करण्याच्या हालचाली

### अशी झाली 'रिंग'...!

| क्षेत्रीय कार्यालयाचे नाव | निविदांची संख्या |
|---|---|
| औंध बाणेर क्षेत्रीय कार्यालय | ५ |
| हडपसर मुंढवा | ४ |
| बिबवेवाडी | ४ |
| सिंहगड रस्ता | ४ |
| धनकवडी सहकारनगर | ५ |
| कोंढवा येवलेवाडी | ५ |
| शिवाजीनगर घोले रस्ता | ४ |
| नगर रस्ता वडगावशेरी | ४ |
| येरवडा कळस धानोरी | ४ |
| कसबा विश्रामबाग | ५ |
| वारजे कर्वेनगर | ५ |
| कोथरूड बावधन | ७ |
| वानवडी रामटेकडी | ५ |
| ढोले पाटील | ४ |



> अटी व शर्ती अंतिम करण्यासाठी समिती नेमली होती, मी त्यास केवळ मान्यता दिली आहे. या निविदेत चुकीच्या पद्धतीने काही होणार नाही. चॅम्पियन मशिनच्या अटीबद्दलही विचार केला जाईल.
>
> **-डॉ. राजेंद्र भोसले,** महापालिका आयुक्त, पुणे

राष्ट्रसंचार IMPACT


पालिकेच्या तिजोरीची 'साफसफाई'..!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील १४ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये झाडणकाम करण्यासाठी तब्बल ९०४ कोटींच्या निविदा काढल्यानंतर शहरातील विविध स्तरातूअ मोठ्या प्रमाणावर टीका झाली होती, धक्कादायक बाब म्हणजे कोट्यावधी रुपयांची ही 'मलई' लाटण्यासाठी ठेकेदारांचीच 'मलिदा गँग' तयार झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने आता सावध पवित्रा घेतला असून ही 'मलिदा गँग' मुळासकट उखडून टाकण्याचा विडा प्रशासनाने उचलला आहे. त्यानुसार या निविदाच रद्द करण्याच्या हालचाली प्रशासनाने सुरु केल्या आहेत.

गेल्या काही वर्षांपासून महापालिकेत प्रशासकीय राज आहे, त्यामुळे विकासकामांच्या संदर्भात कोणताही निर्णय घेताना त्याबाबत मर्यादा ठेवण्याची आवश्यकता असते. मात्र; गेल्या काही महिन्यांपासून महापालिकेत मनमानी कारभार सुरु असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे या कारभारावर महापालिका आयुक्तांचेही नियत्रंण नसल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे शहरातील १४ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये झाडणकाम करण्यासाठी तब्बल ९०४ कोटी रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या होत्या.

या निविदांमध्ये रिंग झाल्याचेच चित्र दिसून येत आहे. ठेकेदारांनी एकमेकांना पुरक अशा निविदा भरल्या असून, कोणत्या क्षेत्रीय कार्यालयांमध्ये कोणता ठेकेदार पात्र होणार हे देखील निश्चत झाले आहे. यासंदर्भात दैनिक ' राष्ट्र संचार' ने ३० एप्रिलच्या अंकात सविस्तर वृत्त प्रसिद्ध करुन हा मनमानी कारभार चव्हाट्यावर आणला होता, त्याची दखल घेऊन प्रशासनाने या निविदाच रद्द करण्याच्या हालचाली सुरु केल्या आहेत. पुणे शहरातील रस्ते, गल्लीबोळ झाडून काढण्यासाठी महापालिकेतर्फे दरवर्षी निविदा काढल्या जातात. यंदाच्या वर्षी या निविदा काढताना पूर्वीच्या नियम व अटी बदलण्यात आल्या आहेत. ठरावीक ठेकेदार कसे पात्र होतील हे लक्षात घेऊन या अटी व शर्ती अंतिम केल्या आहेत.

त्यामुळे ज्यांना अटी व शर्ती पूर्वीच माहिती आहे अशा ठेकेदारांनाच ही कामे मिळणार आहेत, असे अधिकारी सांगत आहे. तसेच अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी चॅम्पियन मशिनची अट रद्द केली जाईल असे सांगितले होते, पण प्रत्यक्षात ही अट कायम ठेवण्यात आली आहे. या निविदेसाठी प्रस्ताव सादर करण्याची मुदत तीन दिवसांपूर्वी संपली आहे, आलेल्या प्रस्तावांची कागदपत्र छाननी सुरु करण्यात आली आहे.

## मानवनिर्मित पाणी कपात मागे घ्या : मनसे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** दक्षिण पुण्यात नागरिकांवर लादलेली पाणीकपात ही नैसर्गिक आपत्ती नसून, मानवनिर्मित आहे. पाणीगळती, चोरी आणि प्रशासनाच्या नियंत्रणाच्या अभावामुळे कृत्रिम टंचाईचा बोजा सामान्य जनतेवर टाकला जात आहे. ही अन्यायकारक पाणीकपात त्वरित मागे घ्यावी अन्यथा आंदोलन केले जाईल अशा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाने दिला.

मनसेचे सरचिटणीस हेमंत संभूस यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना निवेदन दिले. ॲड. प्रियंका पिसे, रोहित गुर्जर, प्रशांत भोलागीर, हनुमंत मोहिते, केदार कोडोलीकर आदी उपस्थित होते.

धायरी, सिंहगड रस्ता आंबेगाव, कात्रज, धनकवडी, कोंढवा, सुखसागर नगर आदी भागात महापालिकेने आठवड्यातून एक दिवस पाणी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची अंमलबजावणी (ता. ५) सुरु झाली आहे. वडगाव जलशुद्धीकरण केंद्रातून रोज २५० एमएलडी पाणी पुरवठा होतो, हे पाणी १६ लाख नागरिकांना पुरेल इतके असताना ते आठ लाख नागरिकांनाही पुरत नाही.

मनसेने यासंदर्भात आयुक्तांना निवेदन दिले. संभूस म्हणाले, " पुणेकर नियमीत कर भरूनही त्यांच्यावर पाणी कपात करणे अन्यायकारक आहे. बहुतांश ठिकाणी पाणी मीटर असतानाही त्यावर पाणीपुरवठा विभागाचे मीटरवर नियंत्रण नाही. महापालिकेने गळतीचे ऑडिट केले आहे का ? असे असे प्रश्न आयुक्तांना केले आहेत. ही पाणी कपात मागे घ्यावी व नियोजनात सुधारणा करावी, अन्यथा आंदोलन केले जाईल.

आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले म्हणाले,"वडगाव जलशुद्धीकरण केंद्रातील पाणी पुरवठ्यात सुधारणा करून ही पाणी कपात मागे घेण्यासंदर्भात अधिकाऱ्यांशी चर्चा केली जाईल.

## व्यक्त, अव्यक्ताचा अनोखा आविष्कार : 'मिलाप - अ कपल ऑफ मेनी थिंग्ज'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** तबला आणि नृत्य बोलांची संवादरूपी जुगलबंदी, ताल आणि नृत्यातून घेतलेला काव्याचा मागोवा, भाषेची सुंदर गुंफण करत नादात्मक काव्यनिर्मिती अशा अनोख्या संकल्पनेतून साकारलेल्या 'मिलाप - अ कपल ऑफ मेनी थिंग्ज'चा अनोखा अविष्कार रसिकांना मोहित करून गेला.

कलासक्त कल्चरल फाऊंडेशनतर्फे आज (दि.5) या विशेष कार्यक्रमाचे आयोजन एस. एम. जोशी सभागृहात करण्यात आले होते. प्रसिद्ध तबलावादक निखिल फाटक आणि प्रसिद्ध कथक नृत्यांगना, अभिनेत्री शर्वरी जमेनिस यांनी कार्यक्रम सादर केला.

सुरुवातीस झपतालातील पेशकार सादर करताना शास्त्रीय संगीताचा गाभा असलेली उत्स्फूर्तता, अमूर्तता निखिल फाटक यांनी तबला वादनातून दर्शविली. त्यानंतर कथक नृत्य शैलीतील पेशकाराच्या अंगाने जाणारा थाट शर्वरी जमेनिस यांनी सादर केला. तालाशी एकरूप होत ध्यानधारणेचा आनंद देणारा हा थाट सादर करताना शर्वरी यांनी दागिन्यांच्या वैविध्यतेतून प्रेरणा घेऊन नृत्याविष्कार सादर केला. तीन तालातील काव्यमय बंदिशी सादर करत काही नृत्यरचना तर काही पढंत उलगडत नेले.

वाद्य, नृत्यबोल, पक्षांचा आवाज याचा संगम साधणारा 'परमेलू' हा प्रकार सादर करताना तिहाईतील बंदिश सादर करून रसिकांची मने जिंकली. रोजच्या आयुष्या घडणाऱ्या काही घटना, जसे आईने मुलाला भरविणे, तो खात नाही म्हणून तिचे रागविणे, पती-पत्नीचा संवाद दर्शविताना विलंबित, मध्य आणि द्रुत लयीतील बंदिश तसेच लहान मुलाचा खेळायचा हट्ट तर आईने अभ्यास करण्यासाठी धरलेला आग्रह अशा रचनाही नृत्य आणि तबल्याच्या बोलातून सादर झाल्या. पदन्यासातून काव्यात्मकता निर्माण करताना शर्वरी जमेनिस यांनी आपले नृत्यावरील प्रभुत्व दर्शविले.



**पुणे** कलासक्त कल्चरल फाऊंडेशनतर्फे आज (दि.5) या विशेष कार्यक्रमाचे आयोजन एस. एम. जोशी सभागृहात करण्यात आले होते. प्रसिद्ध तबलावादक निखिल फाटक आणि प्रसिद्ध कथक नृत्यांगना, अभिनेत्री शर्वरी जमेनिस यांनी कार्यक्रम सादर केला.

# राष्ट्र विकासासाठी संघटित होऊन कार्य करण्याची गरज : पवार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आज आमचे बारीपाडा गाव संघटित झाल्यामुळे अकराशे एकर जंगलाचे संरक्षण व संवर्धन करता आले आहे. यामुळे गावातील दुष्काळ संपला आणि स्थलांतरालाही आळा बसला. स्थानिक संसाधनांचा उपयोग करून सातत्याने कार्य करणे गरजेचे आहे. आमचे कार्य केवळ पुरस्कार मिळवण्यासाठी नाही, तर राष्ट्राला स्वावलंबी बनवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूनच सुरू आहे. त्यासाठी सर्वांनी संघटित होऊन काम करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन पद्मश्री पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते चैत्राम पवार यांनी केले.

ह्यूमनिस्ट युनियन ट्रस्टच्यावतीने हिंदू हितासाठी कार्य करणाऱ्या देशभरातील कार्यकर्त्यांना 'अक्षय्य हिंदू पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. स. प. महाविद्यालयातील लेडी रमाबाई हॉल येथे पुरस्कार वितरण संपन्न झाला. यावेळी परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त संदिपसिंह गिल उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन तुषार दामगुडे, शेफाली वैद्य यांसह अमोल शुक्ला, कल्याणी रणसिंग, हर्षल गरुड, सारिका वाघ,केदार दिवेकर, श्रीनिवास निगडे, पल्लवी ढोले, स्वप्नील तळेकर, निलेश धायरकर,रिषभ परदेशी यांनी केले.

यंदाचा मुख्य पुरस्कार पराग दिवेकर गुरुजी यांना हिंदू एकतेच्या कार्याकरिता, वर्षा परचुरे यांना जनजाती कल्याण कार्याकरिता, अविनाश तायडे यांना धर्म जागरण करिता, अश्विन संपतकुमारन यांना गोपालन यासाठी प्रदान करण्यात आला. तर अर्चना तिवारी यांना पत्रकार म्हणून त्यांच्या कुटुंबाने हा पुरस्कार स्विकारला. तसेच वै. शिरीष महाराज मोरे यांना मरणोत्तर विशेष पुरस्कार निलेश भिसे,लोकेश कोंढरे यांच्याकडून प्रदान करण्यात आला.



> अशा सामाजिक कार्यक्रमात तरुणांना मोठ्या संख्येने सहभागी करून घेतले पाहिजे. जेणेकरून पुरस्कार प्राप्त विजेत्यांनी केले कार्य त्यांच्यासाठी प्रेरणादायी असेल. अशा आदर्श घेवून भविष्यात त्यांना देखील उत्तम कार्याची प्रेरणा मिळेल.
>
> **—संदीपसिंह गिल,** पोलीस उपायुक्त, परिमंडल एक



## रायसोनीच्या विद्यार्थिनींना अभियांत्रिकी शिष्यवृत्ती

**पुणे :** जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट पुणेच्या संगणक अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्षात शिकत असलेली विद्यार्थिनी कोमल कथवडे आणि मेकॅनिकल अभियांत्रिकीच्या तृत्तीय वर्षात शिकत असलेली अनुजा भिसे यांना क्वेस्ट ग्लोबल द्वारे निधी प्राप्त केलेल्या इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर्स (IEEE) महिला अभियांत्रिकी शिष्यवृत्ती २०२४-२५ प्रदान केली. आयईईई महिला अभियांत्रिकी शिष्यवृत्ती, पुणे विभाग अध्यक्ष आणि विभाग प्रमुख, पुणे डॉ. सिमरन खियानी, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. क्वेस्ट ग्लोबल- पुणे केंद्र प्रमुख तुषार जोशी, क्वेस्ट ग्लोबल ब्रँड मॅनेजर ईएसजी गायत्री ठाकरे, आयईईई पुणे विभाग अध्यक्ष डॉ. अमर बुचडे, आयईईई पीईएस सोसायटी अध्यक्ष डॉ. सुरेखा देशमुख, पीईई एज्युकेशन सोसायटी चेअर डॉ. राजश्री जैन, एआयएसएसएमएस प्राचार्य पी. बी. माने, आयईईई इंडिया व्यवस्थापक डॉ. अशोक विट्ठल डॉ. आशपना शिराळकर, आयईईई पुणे उपाध्यक्ष डॉ. मंदार भवाळकर यांच्या उपस्थितीत आयोजन केले होते.




## ‘सोमेश्वर फाउंडेशन’ तर्फे 'पुणे आयडॉल’ १९ मे पासून

**पुणे :** ‘सोमेश्वर फाउंडेशन’ आयोजित महाराष्ट्रातील हौशी गायक, कलाकारांची 'पुणे आयडॉल २०२५' स्पर्धा दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील १९ ते २४ मे २०२५ या दरम्यान, पंडित भिमसेन जोशी नाट्यगृह, औंध येथे होणार असल्याची माहिती सोमेश्वर फाउंडेशनच्या वतीने माजी नगरसेवक सनी विनायक निम्हण यांनी दिली.

दिवंगत आमदार विनायक निम्हण यांनी सन २००३ साली सुरू केलेल्या या स्पर्धेचे यंदा २३ वे वर्ष आहे. स्पर्धेचे उदघाटन गायन क्षेत्रात राष्ट्रपती पदक विजेत्या, प्रसिद्ध गायिका सावनी रविंद्र यांच्या हस्ते सोमवार दि.१९ मे, सकाळी ९.३० वा. पंडित भीमसेन जोशी नाट्यगृह, औंध येथे होणार आहे. अंतीम फेरी २४ मे २०२५ रोजी, १२ ते ३ या वेळेत बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे होणार आहे. स्पर्धेचे फॉर्म www.sunnynimhan.com या संकेस्थळावर उपलब्ध असणार आहेत. प्रवेशाची अंतीम तारीख १५ मे २०२५ राहिल.

स्पर्धेचे परिक्षक म्हणून रामेश्वरी वैशंपायन, कल्याणी देशपांडे, जितेंद्र भुरूक, कोमल लाळगे हे काम पहाणार आहेत. वय वर्षे १५ पर्यंत 'लिटिल चॅम्प्स', वय '१५ ते ३० वर्ष ‘युवा आयडॉल ’,३० ते ५० वर्ष ‘जनरल आयडॉल 'वर्ष ५० नंतर ‘ओल्ड इज गोल्ड' अशा चार गटात स्पर्धा होणार आहेत. सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या पाच हौशी कलाकारांना विशेष निमंत्रित करून त्यांना गाण्याची संधी देऊन त्यांना सोमेश्वर फाउंडेशन तर्फे सन्मानित केले जाणार आहे.

## प्रा. सुभाष जाधव यांचा रविवारी अमृतमहोत्सवी सत्कार



**पुणे :** फ्रेंड्स अकाउंट्स अकॅडमी सासवड माजी विद्यार्थी आयोजित विद्यार्थी प्रिय प्राध्यापक आणि लेखक प्रा. सुभाष महादेव जगताप यांचा अमृत महोत्सवी सत्कार व कृतज्ञता समारंभाचे आयोजन रविवार दि. ११ मे रोजी सकाळी १० वाजता सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन, सासवड याठिकाणी करण्यात आले आहे. या समारंभासाठी माजी अध्यक्ष व संचालक लक्ष्मी को. ऑफ. बँक, पुणे प्रा. सुरेश के. मेहता यांच्या शुभहस्ते होणार असून समारंभाचे अध्यक्ष के. के. इन्स्टिट्युटचे संस्थापक अध्यक्ष कल्याणजी जाधव हे असणार आहेत.




## सिम्बॉयसिसतर्फे सर्टिफिकेट कोर्सचे आयोजन

**पुणे :** पर्यावरण संरक्षण, सामाजिक आणि प्रशासन या विषयात कॉर्पोरेट क्षेत्रात काम करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तींना आता एक उत्तम संधी उपलब्ध झाली आहे. सध्याच्या इएसजी (ESG - Environmental, Social and Governance) रिपोर्टिंगच्या वाढत्या गरजा आणि आगामी नियमांच्या पार्श्वभूमीवर तसेच उद्योगांमध्ये या विषयातील कौशल्यांच्या अभावाची गरज लक्षात घेऊन, सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंग, पुणे यांनी ‘इएसजी (ESG) मॅनेजमेंट व रिपोर्टिंग’ या विषयावर एक विशेष सर्टिफिकेट कोर्स सुरु केला आहे. प्रथमच इएसजी (ESG) मॅनेजमेंट आणि त्याच बरोबर याच विषयाचे रिपोर्टिंग एकत्र शिकवले जाणार आहे.

हा कोर्स सीएसआर CSR (Corporate Social Responsibility), इएसजी धोरण तयार करणे, अंमलबजावणी करणे आणि मूल्यांकन यामध्ये रस असलेल्या व्यावसायिक, व्यवस्थापक व सीएसआर क्षेत्रातील उत्साही व्यक्तींसाठी उपयुक्त आहे.

# ‘आयटी’ नगरीला आता ‘महामेट्रो’चे ‘कोंदण’...!

## हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावर सप्टेंबरमध्ये चाचणी : तिसरा मार्ग ‘लाईन’वर

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे मेट्रो लाईन तीनच्या हिंजवडी ते शिवाजीनगर या सुमारे २३ किलोमीटर लांबीच्या मार्गावर सप्टेंबर पासून चाचणी सुरू होणार आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि टाटा-सिमेन्स यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित होत असलेल्या या प्रकल्पाला पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड या विशेष कंपनीद्वारे अंमलात आणले जात आहे.

हा मार्ग पूर्णपणे उन्नत (एलिव्हेटेड) असून, यात २३ स्थानकांचा समावेश आहे. या मार्गावरील प्रवासी सेवा मार्च २०२६ पर्यंत सुरू होण्याची शक्यता आहे, असे पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. हा प्रकल्प सुरुवातीला मार्च २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते, परंतु जमीन अधिग्रहण, परवानग्या आणि निविदा प्रक्रियेतील अडथळ्यांमुळे विलंब झाला.

सध्या प्रकल्पाचे सुमारे 85 टक्के काम पूर्ण झाले आहे, परंतु विद्यापीठ चौकाजवळील एकात्मिक उड्डाणपूल आणि काही भागातील उपयुक्तता स्थलांतराची कामे अद्याप बाकी आहेत. या अडचणींमुळे चाचणी सप्टेंबर २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. चाचणी पूर्ण होण्यासाठी किमान दोन ते अडीच महिने लागतील, त्यानंतरच प्रवासी सेवा सुरू होईल. हिंजवडी हे पुण्यातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे केंद्र आहे, तर शिवाजीनगर हे शहराचे मध्यवर्ती व्यावसायिक क्षेत्र आहे.

या दोन्ही ठिकाणांना जोडणारा हा मार्ग दररोज लाखो प्रवाशांना, विशेषतः आयटी व्यावसायिकांना, जलद आणि सोयीस्कर प्रवासाची सुविधा देईल. या मार्गामुळे हिंजवडी ते शिवाजीनगर हा प्रवास अवघ्या ३५ ते ४० मिनिटांत पूर्ण होईल, जो सध्या रस्त्याने तासाभरापेक्षा जास्त वेळ घेतो. यामुळे रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल आणि शहरातील पर्यावरणीय प्रदूषणावरही सकारात्मक परिणाम होईल. या मार्गावर २२ मेट्रो गाड्यांचा समावेश असेल, प्रत्येक गाडीत तीन डबे असतील आणि ती एक हजार प्रवाशांना वाहून नेऊ शकतील.

या गाड्या अल्स्टॉम कंपनीने आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथे तयार केल्या असून, त्या थर्ड रेल सिस्टीम आणि रिजनरेटिव्ह ब्रेकिंगसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत. या प्रकल्पात गणेशखिंड रस्त्यावरील दुहेरी मजली उड्डाणपुलाचे बांधकामही समाविष्ट आहे, ज्यामध्ये खालचा मजला वाहनांसाठी आणि वरचा मजला मेट्रोसाठी असेल. हा मार्ग पूर्ण झाल्यावर पुणे मेट्रोच्या लाईन एक आणि लाईन दोन शिवाजीनगर आणि सिव्हिल कोर्ट येथे जोडला जाईल, ज्यामुळे शहरातील एकत्रित वाहतूक जाळे अधिक मजबूत होईल.

या प्रकल्पामुळे हिंजवडी, बाणेर आणि शिवाजीनगरसारख्या भागांमध्ये निवासी आणि व्यावसायिक विकासाला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ मिळेल. हिंजवडी-शिवाजीनगर मार्गावरील मेट्रो लाईन तीन ही पुण्याच्या शाश्वत शहरी विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.




### असा मिळणार लाभ...!

- हिंजवडी ते शिवाजीनगर या सुमारे २३ किलोमीटर लांबीचा प्रवास
- हिंजवडी ते शिवाजीनगर प्रवास जेमतेम ३० ते ४० मिनिटांचा
- मार्ग पूर्ण एलिव्हेटेड; २३ स्थानकांचा समावेश
- प्रवासाचा वेळ वाचेल आणि नागरिकांचे जीवनमान
- मार्च २०२६ मध्ये प्रवासी सेवेची प्रत्यक्षात सुरुवात
- या गाड्या ८५ किमी प्रतितास वेगाने धावतील
- प्रवाशांसाठी आकर्षक रंग, प्रशस्त आतील भाग
- आरामदायी आसने आणि प्रगत माहिती प्रणाली
- प्रत्येक गाडीत तीन डबे; एक हजार प्रवाशांची क्षमता
- बावीस मेट्रो गाड्यांचा समावेश

# थेट ‘घरचा रस्ता’...!

### अतिक्रमण कारवाईत कसूर करणे भोवले; नोटीसा बजावणार

गेल्या काही महिन्यांपासून शहराला अनाधिकृत अतीक्रमणांचा विळखा पडला आहे; प्रशासनाने जंग जंग पछाडूनही आणि कारवाई करुनही त्यामध्ये तसूभरही फरक पडलेला नाही. त्यामुळे शहराच्या सर्वच भागात वाहतूक कोंडी होत असून त्याचा वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांनाही त्रास सहन करावा लागत आहे, विशेष म्हणजे ही वाहतूक कोंडी हटविताना पोलीसांचीही दमछाक होत आहे. त्याची गंभीर दखल महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी घेतली होती; त्यानुसार वाहतूकीला अडथळा ठरत असलेली अतीक्रमणे हटविण्याच्या सूचना या पथकाला दिल्या होत्या. मात्र; या पथकातील बहुतांशी जणांनी त्यामध्ये कसूर केला असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

> नामदार गोखले रस्त्यावर रविवारी सायंकाळी स्थिर पथक असतानाही अनधिकृत पथारी व्यवसाय सुरू होता. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने खुलासा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शहरातील सर्वच भागात अतिक्रमण विभाग, फिरती पथके, स्थिर पथकांना नियमित कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
>
> **-संदीप खलाटे;** उपायुक्त, अतिक्रमण निर्मूलन विभाग



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे स्थिर पथक रस्त्यावर असतानाही बिनदिक्कत अनधिकृत पथारी व्यावसायिक व्यवसाय करत असल्याने आयुक्तांनकडून आदेश देण्यात आले आहेत. शहरातील अतिक्रमणांविरोधात नियमितपणे कारवाई करावी, त्याचा नियमित अहवाल सादर करावा, असे आदेश महापालिका आयुक्तांनी अतिरिक्त आयुक्त तसेच अतिक्रमण विभागाला दिले आहेत. तसेच कारवाईत कसूर करणाऱ्यांना नोटीस बजावण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या आहेत.

शहरातील अतिक्रमणे आणि अनधिकृत विक्रेत्यांकडे महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे. रविवारी नामदार गोखले रस्ता (एफ.सी रस्ता) वरून चालणेही मुश्कील झाले होते. अतिक्रमण विभागाचा एम एच १२ आर एन २२६० या क्रमांकाचा ट्रक रानडे इन्स्टिट्यूटच्या बाहेरील बस थांब्यापाशी लावण्यात आलेला होता. तर एम एच १२ डब्ल्यू ०४७८ हे धडक कारवाई वाहन (व्हॅन) आर्यभूषण छापखान्याच्या गल्लीच्या तोंडाशी लावण्यात आले होते. या दोन्ही वाहनांच्या बाजूला तसेच समोरील पदपथावर अनधिकृत पथारी व्यावसायिकांनी बिनदिक्कत ठाण मांडले होते. याबाबत आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना तक्रार केल्यानंतर त्यांनी कडक भूमिका घेतली आहे.

‘शहरातील वाढत्या अतिक्रमणांविरोधात तक्रारी येत आहेत. कारवाईसाठी अनेक ठिकाणी स्थिर तसेच फिरती पथकेही नियुक्त केली आहेत. तरीही अतिक्रमण होत असल्याने अतिक्रमणांविरोधात सातत्यपूर्ण कारवाई करा, अशा सूचना दिल्या आहेत. तसेच स्थिर पथक असतानाही अनधिकृत व्यवसाय होत असल्यास संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस बजावण्याचाही सूचना दिल्या आहेत,’ असे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले.

# पाणीकपातीचा निर्णय पालिका मागे घेणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दक्षिण पुण्यासह सिंहगड रस्ता, कात्रज व कोंढवा परिसरात पाणी कपात लागू करत दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी या भागातील पाणी पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. या निर्णयावर नागरिकांनी देखील संताप व्यक्त केला आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या निर्णयाचा एका आठवड्यानंतर फेर आढावा घेण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले दिले आहे. पाणी वितरण व्यवस्था सुरळीत करून गरज नसल्यास हा निर्णय मागे घेण्याच्या सूचना देखील भोसले यांनी केल्या आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून वडगाव जलकेंद्रातून कात्रज परिसरात केला जाणारा पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे. यामुळे नागरिक पाण्यासाठी ओरड करत होते. त्यातच आता उन्हामुळे पाण्याची मागणी वाढल्याने त्यात आणखी भर पडली आहे.



ज्या भागात कमी पाणी जाते, त्या भागाला पुरेसे पाणी देण्याचे कारण देत या जलकेंद्राचे सात दिवसांचे सात झोन करून त्यानुसार, प्रत्येक एका झोनमध्ये आठवड्यातून एक दिवस पाणी कपात केली जाणार आहे.

सोमवारपासून हा निर्णय दक्षिण पुण्यात लागू करण्यात आला आहे. महापालिकेच्या पाणी कपातीच्या निर्णयाला नागरिकांकडून विरोध करण्यात येत आहे. हा निर्णय तत्काळ मागे घेण्याची मागणी केली जात आहे. त्यासाठी काही नागरिकांनी महापालिका आयुक्तांची भेट घेतली आहे.



> शहराला पुरेसे पाणी मिळत आहे. पाण्याची मागणी वाढली असेल अथवा पुरवठा विस्कळित झाला असल्यास त्यानुसार, प्रशासनाने तो सुरळीत करावा. मात्र, कपात करणे योग्य नाही. त्यामुळे आठवडाभर या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यानंतर पुन्हा फेरआढावा घेऊन निर्णय घ्यावा, अशा सूचनाही अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.
>
> **- डॉ. राजेंद्र भोसले,** आयुक्त पुणे मनपा

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवारांचा सत्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे ते अहिल्यानगर महामार्गावरील प्रस्तावित उन्नत महामार्ग अंतर्गत होणाऱ्या वाघोली ते शिरूर या दुमजली उड्डाणपुलाचे काम लवकरच चालू होणार आहे हा उड्डाणपूल वाघोली येथून चालू न करता तो विमाननगर चौकातून चालू करावा अशी मागणी सातत्याने होत होती तत्कालीन आमदार सुनील टिंगरे यांनी देखील विधानसभेत याविषयी आवाज उठवला होता.

वडगाव शेरी विधानसभेतील खराडी, चंदनगर, वडगावशेरी या भागात शिरूर तालुका तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील व मराठवाड्यातील अनेक नागरिक वास्तव्यास आहेत या लोकांना गावी जाण्यासाठी सातत्याने वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे, परंतु जर हा उड्डाणपूल झाला तर वाहतूक कोंडी मुक्त नगररोड होईल व त्यांना सहज प्रवास करणे शक्य आहे त्यातूनच हा पूल वाघोली ऐवजी विमान नगर चौकातून सुरू करावा अशी मागणी होत होती

राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी व माजी आमदार सुनील टिंगरे यांनी मागणी केली होती त्यास अजित दादांनी सकारात्मक प्रतिसाद घेऊन मंत्रिमंडळाचे बैठकीत हा उड्डाणपूल विमान नगर चौकातून सुरू करण्यास मंजुरी दिली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी शिरूर व अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिकांसमोर अजितदादांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले. यावेळी माजी नगरसेविका उषाताई कळमकर, नारायण गलांडे, मनोज पाचपुते, माऊली कळमकर, बाळा पराड, स्वप्नील पठारे, किरण खैरे, निखिल बटवाल, ऋषिकेश राजगुरू, सुहास तळेकर, संपत जाधव, कोंडीराम येवले आदी उपस्थित होते.



पुणे | पुणे ते अहिल्यानगर महामार्गावरील प्रस्तावित उन्नत महामार्ग अंतर्गत होणाऱ्या वाघोली ते शिरूर या दुमजली उड्डाणपुलाचे काम लवकरच चालू होणार आहे. त्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सत्कार करण्यात आला.

# ढोल ताशा पथकांमुळे सण-उत्सवांना विधायक स्वरूप : मोहोळ




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पूर्वी काही वर्षांपूर्वी मोठमोठ्या साऊंडच्या भिंती उभ्या करून, बीभत्स पद्धतीने डान्स करत सण-उत्सव साजरे केले जात होते. त्यामुळे आपले सण आपण कसे साजरे करायचे हे आपण विसरत चाललो होतो, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र त्यानंतर ढोलताशा पथकांची संख्या वाढत गेली आणि सण-उत्सवांना पुन्हा धार्मिक आणि विधायक स्वरूप प्राप्त झाले, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले.

ढोलताशा महासंघ महाराष्ट्र यांच्यावतीने राज्यभरातील ढोलताशा पथकांचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन बीएमसीसी कॉलेज ऑफ कॉमर्स येथील टाटा हॉल मध्ये आयोजित करण्यात आले होते. अधिवेशनाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर, सुभाष लाडे, संजय सातपुते, अभिनेता सौरभ गोखले, राजाभाऊ कदम, मानाचा पहिला गणपती श्री कसबा गणपती सार्वजनिक ट्रस्ट चे कार्याध्यक्ष निलेश वकील आदी उपस्थित होते.

या अधिवेशनात नागपूर, नाशिक, मुंबई, ठाणे, पिंपरी-चिंचवड, सांगली, कोल्हापूर, सोलापूर अशा २० जिल्ह्यांतील सुमारे २५० पथकांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. महासंघातर्फे विविध मागण्यांचे निवेदन मोहोळ यांना देण्यात आले.

मुरलीधर मोहोळ पुढे म्हणाले, मी मंत्री झालो असलो तरी गणेशोत्सव मंडळाचा कार्यकर्ता असल्याचा मला अभिमान आहे. आज ढोलताशा पथकांद्वारे जगभर मराठी माणसाने ही वैभवशाली परंपरा पोहोचवली आहे. यासोबतच लेझीम, लाठी-काठी यांसारख्या ग्रामीण परंपराही या पथकांमध्ये सामावून घेतल्या पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले.

> ढोलताशा पथक हे सरकारचे नाक, कान आणि डोळे होऊ शकतात. वेगवेगळ्या माध्यमांतून ते सरकारला सहकार्य करू शकतात. ढोल ताशा वादनाला ‘खेळ’ म्हणून मान्यता मिळावी. तसेच राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांची सुरुवात ढोलताशा वादनाने व्हावी, सरकारी कार्यक्रमांमध्येही हे वादन व्हावे. अशा विविध मागण्या सरकरा मान्य करेल. या अधिवेशनामुळे पथकांची संघटित ताकद निर्माण होईल.
>
> **-पराग ठाकूर,** अध्यक्ष, महाराष्ट्र ढोल ताशा महासघ.

# ‘क्रांतिज्योती’ बालसंगोपन योजनेत ‘गोलमाल’...!

## लाखभर लेकरांच्या पैशांना फुटले पाय; लाभार्थी वर्षभर 'वेटिंग'वर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचे अनुदान लाभार्थ्यांना वेळेवर मिळत नसताना हे अनुदान प्रलंबित नसल्याचे नुकतेच विधानसभेत सांगण्यात आले. तर, दुसरीकडे लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये मात्र संपूर्ण बारा महिन्यांचे अनुदान जमा झालेले नाही. त्यामुळे राज्यभरातील लाखभर लेकरांच्या खात्यामध्ये जमा होणाऱ्या या पैशांना पाय फुटले की हे पैसे हरवले? नेमके पैसे गेले कुठे? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सातिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचे संपूर्ण वर्षाचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा झालेले नाही. त्यामुळे हा पैसा कुठे गेला, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना विधिमंडळात सकाळी घोषणा, दुपारी जीआर, दोन दिवसांत डीबीटी असा अतिशय वेगवान प्रवास करून आठवडाभरात सुमारे अडीच कोटी महिलांच्या खात्यात दरमहा पंधराशे रुपयांचे आगाऊ हप्ते यापूर्वी जमा करण्याचे न भूतो न भविष्यति, अशी अचंबित करणारी गतिमानता याच आयुक्तालयाने दाखवली. मात्र, याच विभागामार्फत गेल्या पन्नास वर्षांपासून राबविल्या जाणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या डीबीटी प्रणाली व अनुदानवाटपातील गोंधळ मात्र थांबायला तयार नाही. त्यामुळेच बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्यांना सहा-सहा महिन्यांनंतरदेखील अनुदान मिळत नाही. याशिवाय गेल्या एक ते दोन वर्षांपासून महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतील महिला व बालविकास अधिकारी कार्यालय व जिल्हा बालकल्याण समित्यांकडे बालसंगोपन योजनेचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे महाराष्ट्र साऊ एकल महिला समितीचे समन्वयक व मिशन वात्सल्य शासकीय समितीचे सदस्य मिलिंदकुमार साळवे यांनी सांगितले.




जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय व जिल्हा बालकल्याण समित्यांकडे प्रलंबित असलेले बालसंगोपन योजनेचे प्रस्ताव व रखडलेले अनुदान वेळेवर मिळावे, यासाठी साळवे यांनी गेल्या तीन वर्षांपासून आयुक्तालयापासून ते मंत्रालयापर्यंत पाठपुरावा सुरू ठेवलेला आहे. मुंबई येथे झालेल्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान श्रीरामपूरचे आमदार हेमंत ओगले व रावेरचे आमदार अमोल जावळे यांनी बालसंगोपन योजनेच्या प्रलंबित अनुदानाबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाला लेखी उत्तर देताना महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी अनुदान प्रलंबित नसल्याचे सांगितले.

या योजनेअंतर्गत निधी वित्त विभागाच्या मान्यतेने वितरित करावयाची कार्यवाही सुरू आहे, असेही मंत्री तटकरे यांनी सांगितले. बाल संगोपन योजनेअंतर्गत वित्त विभागाच्या मान्यतेने निधी वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे. वित्त विभागाने उपलब्ध करून दिलेला सर्व निधी वितरित केलेला असल्याने चौकशी करण्याचा अथवा विलंबास कारणीभूत असणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असेही मंत्री तटकरे यांनी लेखी उत्तरात म्हटले आहे. त्यामुळे राज्यभरातील लाखभर लेकरांचे एक ते दोन वर्षांपासून थकलेले अनुदानाचे पैसे गेले कुठे? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

> कोरोनानंतर आम्ही कोरोना एकल महिला व नंतर सर्वप्रकारच्या एकल महिलांसाठी राज्यभरात काम सुरू केले आहे. या महिलांच्या लेकरांच्या शिक्षण, पोषणासाठी बालसंगोपन योजनेचा मोठा हातभार लागला. पण योजनेचे अनुदान वर्ष-वर्ष वेळेत मिळत नाही. आयुक्तालयाने अनुदानाची पारदर्शी माहिती न देता ती दडपली. लाभ न मिळालेल्या बालकांची माहिती आयुक्त व मंत्र्यांना यापूर्वीच मी लेखी दिली.
>
> **-मिलिंदकुमार साळवे,** सदस्य, मिशन वात्सल्य शासकीय समिती



### भारतीयांमधील प्रोटीन गॅपवर मूठभर बदाम प्रभावी उपाय

**पुणे :** भारतातील नागरिक आजही दैनंदिन आहारातील प्रथिनांच्या गरजा पूर्ण करण्यात मोठ्या आव्हानाला सामोरे जात आहे. आपल्या रोजच्या जेवणामध्ये कार्बोहायड्रेट्स मोठ्या प्रमाणात असले तरी, सर्व वयोगटांतील अनेक लोकांची आवश्यक प्रथिनांची गरज पूर्ण होत नाही. याबाबत जनजागृती वाढवण्यासाठी आणि प्रॅक्टिकल सोलुशन देण्यासाठी, अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाने पुण्यात “अड्रेसिंग इंडियाज प्रोटीन गॅप : बेटर नुट्रीशन फॉर हेल्दीयर टुमारो' या विषयावर एक पॅनेल चर्चा आयोजित केली. यामध्ये अभिनेत्री सोहा अली खान, फिटनेस एक्स्पर्ट यास्मिन कराचीवाला आणि रितिका समद्दार (रीजनल हेड - डायेटेटिक्स, मॅक्स हेल्थकेअर, नवी दिल्ली) यांसारख्या प्रसिद्ध व्यक्तींनी सहभाग घेतला. पॅनेलने भारतीय नागरिकांच्या पोषणातील प्रोटीन गॅपच्या समस्येवर प्रकाश टाकला. आहारमधील छोटे छोटे बदल किती मोठी भूमिका निभावतात- रोज आहारात मूठभर बदाम खाण्याने सर्व वयोगटांतील लोकांसाठी प्रोटीन लेव्हल सुधारण्यात कशी मदत होऊ शकते हे त्यांनी अधोरेखित केले.

### तरुणाचा धरणात बुडून दुर्दैवी मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुट्या असल्याने मित्रांसोबत दुपारच्या सुमारास खडकवासला पाणलोट क्षेत्रात पोहण्यासाठी गेलेला तरुण पाण्यात उतरला. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने खोल पाण्यात गेल्याने त्याला बाहेर निघता आले नाही. यात तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. दरम्यान आपत्ती व्यवस्थापन टीमकडून आज सकाळी मृतदेह बाहेर काढण्यात आला आहे.

खडकवासला पाणलोट क्षेत्रात सोमवारी दुपारच्या सुमारास हि घटना घडली आहे. साहिल अभिजीत बामगुडे (वय २३) असे घटनेत मृत झालेल्या तरुणाचे नाव आहे. दरम्यान साहिल बामगुडे हा आपल्या मित्रांसोबत खडकवासला पाणलोट क्षेत्रातील गोऱ्हे बुद्रुक येथे पोहायला गेला होता. सर्व मित्र पाण्यात उतरले असताना साहिल देखील पोहण्यासाठी उतरला. आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दल रात्री सात वाजल्यापासून साडेआठ वाजेपर्यंत शोध मोहीम राबवत होते. मात्र, वाऱ्याचा वेग जास्त आणि अंधारामुळे शोध थांबवावा लागला. तर आज सकाळी पुन्हा एकदा शोध मोहीम सुरू केल्यानंतर काही वेळातच हवेली आपत्ती व्यवस्थापन टीमला साहिलचा मृतदेह सापडला.

# ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नवले पूल ते कात्रज यादरम्यानच्या बाह्यवळणावर नुकत्याच झालेल्या अपघातांत तीन जणांचा मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर आमदार भीमराव तापकीर यांनी या अपघातांच्या ठिकाणी पाहणी केली. या वेळी त्यांनी रस्ते सुरक्षा उपाययोजनांबाबत अपयशी ठरत असलेल्या प्रशासनावर ताशेरे ओढले तसेच संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

माजी नगरसेवक हरिदास चरवड, बाळासाहेब नवले, सचिन मोरे, गणेश वरपे, सारंग नवले, महेश भोसले यांच्यासह परिसरातील नागरिक या वेळी उपस्थित होते. तापकीर म्हणाले की, नवले पूल ते कात्रज यादरम्यान सुरू असलेल्या कामात ठेकेदार मनमानी करीत असून, वारंवार त्याला मुदतवाढ दिली जात आहे.

या कामाकडे संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत झाल्याचे निदर्शनास आले आहे. ठेकेदाराला अधिकारी पाठीशी घालत आहेत. याशिवाय संबंधित विभागाने महापालिकेकडून या मार्गासाठी ड्रेनेजव्यवस्थेच्या प्राप्त निधीतून निकृष्ट दर्जाचे काम केल्याचा आरोपही त्यांनी केला.

संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्याबाबत तापकीर यांनी सिंहगड रोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीसि निरीक्षक दिलीप दाईगडे यांना सूचना केली.





> खडकवासला रस्ते सुरक्षा विभागाने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी वेळेत झाली असती, तर अपघातांच्या घटना टाळता आल्या असत्या. ही केवळ अपघातांची मालिका नाही, तर रस्ते विकासातील बेफिकिरी आहे.
>
> **-आमदार भीमराव तापकीर,** खडकवासला विधानसभा.

# हापूसचा हंगाम अंतिम टप्प्यात; भाव कमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लहरी हवामानामुळे मोहोर गळाल्याने हंगामाच्या सुरुवातीलाही हापूस आंब्याची आवक कमी होत होती. त्यामुळे गुढीपाडव्याला या आंब्याचे भाव चढेच होते. डझनाला १ हजार ते १८०० रुपये मोजावे लागत होते. फळांचा राजा असलेल्या कोकणातील हापूसचा हंगाम आता अंतिम टप्प्यात आल्याने मार्केट यार्डातील फळबाजारात हापूस आंब्याची आवक घटू लागली आहे. लहरी हवामानामुळे यंदा हंगाम लवकर आटोपता घेत असल्याने पुढील आठ ते दहा दिवस आंब्याची चव चाखता येणार आहे.सद्य:स्थितीत बाजारात ४०० ते ८०० रुपये डझन या दराने हापूस आंबा उपलब्ध आहे.

अक्षयतृतीयेला आवक वाढल्यामुळे भाव आटोक्यात आले होते. आता तेच आहेत. डझनाला दर्जानुसार ४०० ते ८०० रुपये मोजावे लागत आहेत, तर दुसरीकडे कर्नाटक



हापूसलाही हवामानबदलाचा फटका बसला आहे. यंदा महिनाभर विलंबाने आवक वाढली आहे.

सद्य:स्थितीत कर्नाटक हापूसचा हंगाम बहरला आहे. मागील आठवड्याच्या तुलनेत आवक दुप्पट होत आहे. त्यामुळे खवय्यांनी आता कर्नाटक हापूसकडे आपला मोर्चा वळविला आहे. दि. १५ जूनपर्यंत कर्नाटक हापूसची आवक सुरू राहणार आहे. रविवारी (दि. ३) लाकडाच्या पाच ते सात डझनाच्या सुमारे सात हजार पेटी, तर २ डझनाच्या २० हजार बॉक्सची आवक झाली. ४ ते ६ डझनाच्या पेटीला १ हजार ते १ हजार ५०० रुपये भाव मिळत आहे.

> कोकणातील हापूसची आवक घटली आहे. मागील आठवड्यात पाच हजार पेट्यांची होणारी आवक आता अडीच ते तीन हजार पेटीपर्यंतच होत आहे. नेहमीच्या तुलनेत पंधरा ते वीस दिवस आधीच हंगाम संपणार आहे. **- युवराज काची,** कोकण हापूसचे व्यापारी, मार्केट

> कोकणातील हापूसची आवक घटून दरवाढ झाल्याने नागरिक कर्नाटक हापूस खाण्यास पसंती देत आहेत. कोकणातील हापूसचा हंगाम आटोपल्यास कर्नाटक हापूसच्या भावात वाढ होण्याची शक्यता आहे. **- रोहन उरसळ,** कर्नाटक हापूसचे व्यापारी, मार्केट यार्ड



### इलेक्ट्रिक स्कूटर मॅनुफॅक्चरर कंपनीच्या शोरुमचे उदघाटन

**पुणे :** इलेक्ट्रिक स्कूटर मॅनुफॅक्चरर कंपनी रिव्हरने महाराष्ट्रातील आपल्या पहिल्या स्टोरचे पुणे येथे उदघाटन केले आहे. हे स्टोर ब्रँडचा स्ट्रॉंगहोल्ड असलेल्या दक्षिण भारताबाहेरील त्यांचा पहिला उपक्रम आहे. तेराशे स्क्वेअर फूटमध्ये पसरलेलं खराडी येथील रिव्हर स्टोर हे रलास व्हील्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सहयोगाने सुरू करण्यात आलं आहे. रिव्हर स्टोरमध्ये ग्राहकांना इंडी, रिव्हरच्या सर्व ॲक्सेसरीज़ आणि मर्चेंडाईज अर्थात ब्रँडेड वस्तू यांचं प्रत्यक्ष प्रदर्शन पाहायला मिळेल. याशिवाय, या स्टोअरमध्ये एक पूर्ण संचालित सर्व्हिस सेंटर सुद्धा आहे, ज्याचं क्षेत्रफळ चार हजार स्क्वेअर फूट असून स्टोरच्या चार किमीच्या रेडियसच्या परिसरातच आहे.

स्टोरच्या उदघाटनप्रसंगी बोलताना रिव्हरचे को-फाउंडर आणि चीफ एक्सिक्युटीव्ह ऑफिसर अरविंद मनि म्हणाले, “पुणे हे बऱ्याच काळापासून ऑटोमोटिव्ह एक्सलेंसचे हब राहिले आहे. जेव्हा आम्ही इंडी लॉन्च केली, तेव्हा आम्हाला या शहरातून खूप प्री-ऑर्डर्स मिळाल्या आणि आता आम्ही स्कूटर्समधील स्पोर्ट युटिलिटी वेहिकल (एसयूव्ही) पुण्यात घेऊन येताना खूप उत्साही आहोत. रिव्हर इंडीला या भागात एक खास वेगळे वेहिकल म्हणून प्रस्थापित करणे उद्दिष्ट आहे.

# शहरात दम्याच्या रुग्णांमध्ये चाळीस टक्क्यांची वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही वर्षांत बांधकाम आणि रस्ते बांधणीचे काम सर्वच मोठ्या शहरांमध्ये झपाट्याने वाढत अहे. त्यामुळे हवेतील गुणवत्तेवर विपरीत परिणाम झाला आहे. वातावरणातील या धुळीमुळे ॲलर्जी होऊन अनेक जण दम्याचे बळी ठरत आहेत. मागील काही वर्षांत शहरात दम्याच्या रुग्णांमध्ये तब्बल 40 टक्क्यांची वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

पुण्यासह सर्वच मोठ्या शहरांमध्ये हवेची गुणवत्ता खालावत आहे. वाहतूक कोंडी, वाहनांमधून बाहेर पडणारे धूलिकण, औद्योगिक प्रदूषण, ऋतूनुसार हवेच्या गुणवत्तेत होणारे बदल, यामुळे प्रदूषण उच्चांकी पातळी गाठत आहे. वाढत्या प्रदूषणामुळे श्वसनविषयक आजारांमध्ये भर पडत वाढत आहे. त्यामुळे दम्याच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात येत आहे. पुणे शहरातील 'रेस्पायर लिव्हिंग सायन्सेस' या संस्थेने देशभरातील अकरा शहरांमधील हवाप्रदूषणाच्या पातळीचा नुकताच अभ्यास केला. त्यानुसार सूक्ष्म धूलिकणांची पातळी जास्त असून, प्रदूषणाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. प्रदूषणामुळे श्वास घेण्यास त्रास होणे, फुफ्फुसांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होणे, सततचा खोकला, घशात खवखव अशी दम्याची लक्षणे दिसून येत आहेत.

छातीत जडपणा येणे, हे दम्याचे लक्षण आहे. बऱ्याचदा एकही लक्षण आढळून येत नाही. केवळ खोकलाच होतो. अशा वेळी खोकल्याकडे दुर्लक्ष केले जाते, म्हणून दीर्घकालीन खोकला, घशातून खरखर आवाज येणे, छाती भरून येणे, ही दम्याची लक्षणे असू शकतात. या आजाराच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

> वाढत्या प्रदूषणामुळे काही जणांना वारंवार सर्दी व खोकल्याचा त्रास होत असल्याने उपचारासाठी रुग्णालयात येत आहेत. दर महिन्याला रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागात खोकल्याची तक्रार घेऊन येणाऱ्या दहा पैकी चार ते पाचजणांना दम्याचा विकार जडल्याचे दिसून येते.
>
> **- डॉ. सम्राट शहा,** इंटर्नल मेडिसीन एक्सपर्ट



### एसटीच्या ताफ्यात नव्या लालपरी दाखल होणार

**पुणे :** एसटी महामंडळात नव्या लालपरी दाखल होत आहेत. टप्प्याटप्प्याने बस दाखल झाल्यानंतर त्या बस प्रत्येक विभागाला देण्यात येत आहे. ऐन उन्हाळ्याच्या गर्दीच्या काळात नव्या बस ताफ्यात दाखल झाल्याने प्रवाशांना सोयीचे होणार आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाला नव्याने दहा लालपरी मिळाल्या आहे. आतापर्यंत पुणे विभागाला ५० नव्या लालपरी मिळाल्या असून, स्वारगेट, शिवाजीनगर, इंदापूर, दौंड या चार विभागाला दहा बस देण्यात आले होते. आता नव्याने आलेल्या दहा बस नारायणगाव आगाराला देण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातून एसटीने प्रवास करणाऱ्यांना याचा फायदा होणार आहे.

शिवाय भविष्यात अजून पुणे विभागाला अजून १५० बस दाखल होणार आहेत. त्यामुळे पुणे विभागातील बसची संख्या वाढणार आहे, अशी माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली.

# श्री शंकर महाराजांचा जीवनपट रूपेरी पडद्यावर झळकणार; टीजर-पोस्टर लॉन्च

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्री शंकर महाराज हे आधुनिक काळाचे सत्पुरुष म्हणून आज सर्वत्र परिचित आहेत. त्यांची समाधी ही सातारा रस्त्यावर धनकवडी भागात आहे. श्री शंकर महाराज हे योगीराज होते. ते स्वत: नेहमी म्हणत- सिद्धीच्या मागे लागू नका... त्यांना स्वत:ला सिद्धी प्राप्त होत्या पण त्यांनी कधीच उपाधी लावल्या नाहीत. "अवलिया" श्री शंकर महाराज या आगामी चित्रपटातून त्यांचा जीवनपट आपल्या भेटीस येणार आहे. नुकतीच या चित्रपटाची घोषणा शंकर महाराज समाधी सोहळ्याच्या दिवसाचे औचित्य साधुन भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते चित्रपटाचे टीजर पोस्टर लॉन्च करण्यात आले.

जयशंकर प्रॉडक्शन या निर्मितिसंस्थे अंतर्गत या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून भाजपाचे मा.राजेंद्र (आबा) शिळीमकर हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. चित्रपटाचे लेखन दिग्दर्शन शशि चंद्रकांत खंदारे यांचे असून याआधी त्यांनी अनेक महोत्सवात गौरवलेल्या "जिप्सी" या चित्रपटाचे लेखन दिग्दर्शन केले आहे.

'अवलिया' हा चित्रपट श्री सद्गुरू शंकर महाराज यांच्यावर असणार आहे. १८०० च्या सुमारास श्री सद्गुरू शंकर महाराज प्रकट झाले ते १९४७ मध्ये त्यांनी समाधी घेतली. या १५० वर्षांच्या कालखंडात त्यांनी असंख्य लीला केल्या, अगणित भक्तांना सन्मार्ग दाखवले, त्यांचा उद्धार केला. अशा आधुनिक काळातील सत्पुरुषावर सदर चित्रपट असणार आहे.

श्री सद्गुरू शंकर महाराजांवर आधारित असलेल्या बहुतांश कलाकृती मध्ये केवळ चमत्कारांवर भर देण्यात आला आहे. महाराज हे चमत्काराच्या ही खूप पुढे आहेत. त्यांनी चमत्कार हे केवळ भक्तांचे डोळे उघडण्यासाठी आणि त्यांचा उद्धार करण्यासाठी केले आहेत. शंकर महाराजांनी असंख्य लीला केल्या त्याच बरोबर त्यांचा दृष्टिकोन हा वैज्ञानिक ही होता, हे विसरून चालणार नाही. महाराजांनी केलेल्या अगाध लीलांबरोबरच महाराजांचा वैज्ञानिक दृष्टिकोन दाखवण्याचा आम्ही प्रयत्न करणार असून चित्रपटातील कलाकारांची नावे लवकरच जाहीर करणार असल्याचे लेखक दिग्दर्शक शशि चंद्रकांत खंदारे यांनी सांगितले.




# महाराष्ट्राच्या जनतेसाठी सभागृह चालवण्यास प्राधान्य देणार : अण्णा बनसोडे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** "महाराष्ट्राच्या विधानसभेत उपाध्यक्ष म्हणून काम करताना सभागृहात जनतेच्या प्रश्नांवर साधक-बाधक चर्चा होईल; त्यांच्या हिताचे निर्णय होतील. कायद्याच्या चौकटीत राहून सर्वांना समान न्याय देण्याला आणि जनहिताचे काम करून घेण्याला माझे प्राधान्य राहील," असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानसभेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष नामदार अण्णा बनसोडे यांनी केले. भविष्यात समाजातील दुर्बल घटकांसाठी सर्वतोपरी मदत करू. त्यासोबतच शासनाच्या सर्व योजना समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यरत राहू, असेही बनसोडे यांनी नमूद केले.

महाराष्ट्र विधानसभेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल, तसेच वाढदिवसानिमित्त अण्णा बनसोडे यांची ग्रंथतुला करण्यात आली. यावेळी विविध सामाजिक उपक्रमांचे उद्घाटन, नृत्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक सुमित चौधरी, निखिल गायकवाड व शशिकांत कांबळे यांच्या पुढाकारातून टीएम फाउंडेशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष समिती यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रसंगी राज्यघटनेचे अभ्यासक प्रा. प्रकाश पवार, उद्योजक जवाहर चोरगे यांच्यासह विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात अनाथ मुलांसाठी काम करणाऱ्या ममता फाउंडेशन या संस्थेला ५१ हजार रुपये, तर जनसेवा फाउंडेशन वृद्धाश्रमाला ३१ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्त करण्यात आला. ग्रंथतुलेतील वह्या-पुस्तके गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वाटप करण्यात येणार आहे. यावेळी भारतीय संस्कृतीतील विविध कलानृत्य विष्कार सादर करण्यात आले. पाच ते ५५ वयोगटातील भगिनींनी सहभाग घेतला. तीन यशस्वी संघांना बनसोडे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. बहुजन हिताय संघ वसतिगृह, पंचशील सेवा संघ राम सोसायटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हाउसिंग सोसायटी या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचा, विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. विजयश्री इव्हेंट्सचे निखिल निगडे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. निखिल गायकवाड यांनी स्वागत प्रास्ताविक केले. दीपक म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले. शशिकांत कांबळे यांनी आभार मानले.

> "विधानसभेचे उपाध्यक्ष ही मोठी जबाबदारी आहे. आपल्या प्रश्नांची सोडवणूक होईल, हिताचे निर्णय होतील, या आशेने सामान्य नागरिक विधिमंडळाकडे पाहत असतो. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी आपल्या पदाचा उपयोग सर्वसामान्य माणसाच्या समस्या सोडविण्यासाठी, त्यांच्या आयुष्यात बदल घडविण्यासाठी करावा.
>
> **-प्रा. प्रकाश पवार**, भारतीय राज्यघटनेचे अभ्यासक

# पिंपरी चिंचवडमध्ये भाजपाची 'भरारी'...!



**पिंपरी :** चिंचवडमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून आम आदमी पक्षाचे माजी शहराध्यक्ष आणि पदवीधर आघाडीचे प्रदेशाध्यक्ष चेतन बेंद्रे यांच्यासह 'आप' आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) विभाग प्रमुख प्रदीप महाजन यांच्यासह दोन्ही पक्षांचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते भारतीय जनता पक्षात दाखल झाले आहेत.या पक्षप्रवेश सोहळ्याला भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, शहराध्यक्ष आमदार शंकर जगताप, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार महेश लांडगे, आमदार राहुल कुल, आमदार हेमंत रासने, आमदार उमा खापरे, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवी अनासपुरे, पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, भाजपा पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे, शरद बुट्टे पाटील, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे आदी उपस्थित होते.

## शेतरस्त्यांसाठी मोजणीचे शुल्क शेतकऱ्यांना माफ

**पुणे :** शेतरस्त्यांसाठी मोजणीचे शुल्क शेतकऱ्यांना भरावे लागणार नाही. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून रस्ते खुले करण्याच्या कामास गती येणार आहे. गावातील पाणंद, शेतरस्ते खुले करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. मात्र, अतिक्रमित झालेले रस्ते, तसेच रस्त्याची हद्द कुठे आहे, हे समजण्यासाठी या रस्त्यांची मोजणी करावी लागते. या मोजणीसाठी शेतकऱ्यांना भूमिअभिलेख विभागाकडे मोजणी फी भरावी लागत होती. त्यामुळे मोजणी फी अभावी हे रस्ते खुले होण्यास अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने पाणंद, शेतरस्त्यांच्या मोजणीसाठी फी न आकारण्याचा निर्णय घेतला असून, तसे पत्र भूमिअभिलेख विभागाला दिले आहे. सर्व तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वहिवाट रस्ते, ग्रामीण रस्ते, हद्दीचे रस्ते खुले करण्याची अनेक प्रकरणे प्रलंबित आहे. रस्ते खुले करण्यासाठी काही प्रकरणांमध्ये मोजणी फी कोणी भरायची यावरुनसुद्धा प्रकरणे प्रलंबित राहून रस्त्यांचा प्रश्न काही सुटत नसल्याचे समोर आले आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी एक परिपत्रक काढून तहसीलदार यांनी मोजणी करून रस्ते खुले करण्याकरिता गाव निहाय नियोजन करावी. त्याबाबतची कल्पना भूमिअभिलेख व पोलिस निरीक्षक यांना देण्यात यावी. रस्त्यांची मोजणी ही महिन्याच्या प्रत्येक बुधवारी करण्यात यावी. या मोजणीसाठी फी न आकारता मोजणी करण्यात यावी, असे या परिपत्रकात नमूद केले आहे. तसेच, यासाठी पोलीस बंदोबस्तासाठीसुद्धा शुल्क आकारू नये, अशा सूचना दिल्या आहेत.

## सिंबॉयोसिस कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश

**पुणे :** सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटीच्या



सिंबायोसिस ज्युनिअर कॉलेज, किवळेच्या विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील एकूण १७१ विद्यार्थी डिस्टिंक्शनसह उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सिंबायोसिसचे संस्थापक व अध्यक्ष प्रो. डॉ. एस. बी. मुजूमदार, सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटीच्या प्रधान संचालिका डॉ. स्वाती मुजूमदार, प्राचार्या भावना नरसिंगोजू , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. महाविद्यालयाच्या कला , विज्ञान आणि वाणिज्य शाखेचे प्रथम तीन क्रमांकाचे निकाल खालील प्रमाणे- कला शाखा-प्रथम क्रमांक : जेनी सॅम्युअल (९१.८३%), विज्ञान शाखा-प्रथम क्रमांक : ब्रायन डिसूझा (८५.३३%), वाणिज्य शाखा-प्रथम क्रमांक : दिया दार्जी (९४.३३%)

## अधिकाऱ्यांच्या चौकशीसाठी एसआयटी: बावनकुळे

**पुणे :** "भूमि अभिलेख विभागातील हवेली



उपअधीक्षक कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांनी चुकीच्या पद्धतीने मोजणी करून नकाशे दिल्याच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विशेष पथकाची (एसआयटी) नियुक्ती केली आहे. त्यामार्फत याप्रकरणी सखोल चौकशी करून दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करण्यात येईल," असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी सांगितले. भूमि अभिलेख विभागातील हवेलीचे उपअधीक्षक अमरसिंह पाटील यांनी चुकीची मोजणी केल्याप्रकरणी त्यांना निलंबित करण्यात आले आहे, तर तत्कालीन जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सूर्यकांत मोरे यांची विभागीय चौकशी सुरू आहे. याबाबत विचारले असता बावनकुळे यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, "हवेलीमध्ये कोणाच्या चुकीच्या मोजण्या झाल्या असतील तर त्यासंदर्भात तक्रार स्वीकारण्यासाठी येत्या १७ आणि १८ मे असे दोन दिवस शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याठिकाणी मोजणी संदर्भात नागरिकांच्या काही तक्रारी असतील तर त्यांचे अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत.

# सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजचा निकाल १०० टक्के

### विज्ञान शाखा



प्रथम
पवनी शार्दूल भिडे
(९२.५० %)



द्वितीय
संयुक्ता अशोक मोरे
(९२.३३ %)



तृतीय
चिन्मयी ज्ञानेश रहाणे
(९२ %)

### वाणिज्य शाखा



प्रथम
विनीत महेश बंग
(९१ %)



द्वितीय
प्रसाद काशवी
(९० %)



तृतीय
श्रीम गिरीश पसाद
(८५.१७ %)

### कला शाखा



प्रथम
झलक दर्शन गांधी
(९०.५० %)



द्वितीय
शुभश्री विश्वनाथ
(८९.८३ %)



तृतीय
शर्वरी मंदार दामले
(८७.१७ %)

> दरवर्षीप्रमाणे यंदाही सूर्यदत्त कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करीत उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली. त्यांना स्वयंपूर्ण होण्यासाठी विकासाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जातात. क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी धवल यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीचा अभिमान वाटतो.
>
> **-प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया,**
> संस्थापक अध्यक्ष, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत बावधन येथील सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सातत्याने घवघवीत यश संपादन करत महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे. उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम , प्रमाणपत्र व गोल्ड मेडल देऊन गौरविण्यात येणार आहे. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहायक उपाध्यक्षा स्नेहल नवलखा यांनी विद्यार्थी, पालकांचे, तसेच समूह प्राचार्य किरण राव, प्राचार्य वंदना पांडे, विभाग प्रमुख, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजमध्ये विज्ञान शाखेत पवनी शार्दूल भिडे (९२.५० टक्के), संयुक्ता अशोक मोरे (९२.३३ टक्के), चिन्मयी ज्ञानेश रहाणे (९२ टक्के), शौनक विजय तिकोटेकर व आर्या सुनील बोर्डे (९१.८३ टक्के), शर्वरी योगेश महाबळेश्वरकर, रेवा सुनील करंदीकर व निषाद नैनीश लुब्री (९१.६७ टक्के) यांनी अनुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा, चौथा व पाचवा क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेत विनीत महेश बंग (९१ टक्के), प्रसाद काशवी (९० टक्के), श्रीम गिरीश पसाद (८५.१७ टक्के), मीनाक्षी राहुल मालेगावकर (८०.३३ टक्के), तर श्रीनिवास पांडुरंग दगडे (७९.६७ टक्के) यांनी अनुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा, चौथा व पाचवा क्रमांक पटकावला. कला शाखेत झलक दर्शन गांधीने (९०.५० टक्के) पहिला, शुभश्री विश्वनाथने (८९.८३ टक्के) द्वितीय, शर्वरी मंदार दामलेने (८७.१७ टक्के) तृतीय, जान्हवी अजयकुमार (८६.६३ टक्के) हिने चौथे, तर निखिल संतोष खळदकर (८५.५० टक्के) याने पाचवे स्थान पटकविले.

# बारावीच्या अफलातून यशाची 'माया'...!

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

### शेतकऱ्याच्या मुलीला पडले ९५ टक्के

**पुणे :** आई- वडील दोन्ही शेतकरी, वडिलांना बारावीत ६७ टक्के गुण मिळाले होते. वडिलांना पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिक्षण घेण्याची इच्छा होती; पण घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे ते शक्य झाले नाही. मात्र, मुलगी माया माने हिने वडिलांचे हे स्वप्न पूर्ण करत फर्ग्युसन कॉलेजमध्ये बारावीत तब्बल ९५ टक्के गुण मिळवले. त्यामुळे घरच्यांना आनंदाश्रू रोखता आले नाहीत. माया मूळची धाराशिव जिल्ह्यातील (उस्मानाबाद) विठ्ठलवाडी गावाची.

शैक्षणिक प्रवासासाठी पुण्यात आलेल्या मायाला दहावीत चांगले गुण मिळाले होते. त्यामुळे फर्ग्युसन महाविद्यालयात अकरावीत प्रवेश मिळाला. मायाचा प्रवास तसा खडतरच होता. आई- वडील धाराशिव जिल्ह्यातील विठ्ठलवाडी गावात शेती करतात. कोणताही खासगी क्लास नाही, फक्त पाठ्यपुस्तके, शिक्षकांचे मार्गदर्शन, महाविद्यालयात होणारी दररोजच्या लेक्चरला उपस्थिती आणि अभ्यास करून तिने हे घवघवीत यश मिळवले.

राज्यात यंदा कला शाखेचा निकाल पाच टक्क्यांनी कमी लागला असताना माया माने हिने ९५ टक्के गुण मिळवले. महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहून स्वावलंबीपणे शिक्षण घेणाऱ्या मायाने अभ्यासात सातत्य ठेवले. ग्रामीण भागातून येऊन मोठ्या शहरात स्वतःचे स्थान निर्माण करणाऱ्या मायाने सर्व विद्यार्थ्यांना दाखवून दिलेय की, हातात फक्त पुस्तके असली तरी स्वप्न गाठता येते.

> आई-वडील शेती करतात, मी त्यांचं कष्टाचं आयुष्य जवळून पाहिलंय. मला पुढं जाऊन अधिकारी व्हायचंय, त्यासाठी ही सुरुवात माझ्या यशाची पहिली पायरी आहे, मला परीक्षेत मिळालेले यश हे वडिलांना त्यांचंच वाटतंय. गावाकडं माझ्या वयातील सर्व मुलींचा विवाह झाला आहे. एव्हाना त्यांना मुलंही झाली आहेत; पण आई- बाबांनी नेहमी माझ्या शिक्षणाला प्राधान्य दिलं आणि त्यांच्या पाठिंब्यामुळंच आज मला हे यश मिळालं.
>
> **— माया माने,** विद्यार्थिनी



# पन्नास वंचित महिलांना व्यवसाय किटचे वाटप

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** सामाजिक बांधिलकी जपत पर्णकुटी संस्थेच्या सहकार्याने जॉन्सन कंट्रोल्स इंडियाच्या वतीने वंचित महिलांना स्वयंरोजगार व कौशल्य विकासाच्या माध्यमातून सक्षम करण्यासाठी पुढाकार घेत व्यवसाय किटचे वाटप करण्यात आले.

पर्णकुटी या वंचित व उपेक्षित महिलांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थेला एक बटनहोल मशीन भेट दिले. तसेच पन्नास महिलांना अत्याधुनिक प्रशिक्षण दिले. यामध्ये प्रगत टेलरिंग, डिजिटल टूल्स व प्लॅटफॉर्म्स, मार्केट लिंकिंग व विक्रीचे आधुनिक मार्ग यांचा समावेश होता. हे प्रशिक्षण महिलांना आपल्या व्यवसायात आधुनिक तंत्रांचा वापर करून बाजाराशी जुळवून घेण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. या उपक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे कर्मऱ्यांचा सहभाग असतो. जॉन्सन कंट्रोल्सचे कर्मचारी स्वतः या महिलांच्या क्षमतेत वाढ घडवून आणण्यासाठी कार्यशाळांमध्ये सहभागी होत आहेत. त्यांनी एक्सेलवर आधारित कार्यशाळा घेतली, ज्यामुळे महिलांना व्यवसायातील नोंदवही, स्टॉक व्यवस्थापन व आर्थिक नियोजन समजून घेण्यास मदत झाली. पर्णकुटीच्या सह-संस्थापक व सचिव स्नेहा भारती यांनी सांगितले, की आमच्या महिलांना केवळ आर्थिक मदतच नाही, तर त्यांच्या आत्मविश्वासात भर घालणाऱ्या प्रशिक्षण व मार्गदर्शनाद्वारे त्यांना सक्षमही केले. त्यांच्या या सहकार्यामुळे अनेक महिलांच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने बदल घडून येत आहे.



# सेमी क्लासिकल नृत्यांनी बहरला नृत्य दिन सोहळा




■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** विविध नृत्य सादर करून नृत्य कला मंदिराच्या वतीने जागतिक नृत्य दिन व पुरस्कार सोहळा निगडी येथे साजरा करण्यात आला. जागर स्त्री शक्तीचा अशी या कार्यक्रमाची संकल्पना नृत्यगुरू आणि नृत्यकला मंदिरच्या संचालिका तेजश्री अडिगे यांनी कल्पनेतून साकारली गेली. नृत्य तेज अकादमी तर्फे लोकनृत्य, सेमी क्लासिकल, बॉलीवूड, फ्युजन, कंटेम्पररी अशा विविध नृत्यप्रकरच्या प्रशिक्षणाचे शिबीर घेण्यात आले होते. त्या शिबिरार्थी आणि नृत्यकला मंदिरच्या विद्यार्थिनी यांनी सर्व नृत्ये उत्तमरित्या सादर केली.

कार्यक्रमाची सुरुवात गणेशस्तुती, सरस्वतीस्तुती ने करण्यात आली. शंभो शंकरा, देवी स्तुती अशी सेमी क्लासिकल नृत्ये अत्यंत प्रेक्षणीय झाली. शेतकरी, आदिवासी, असामी बिहू अशा लोकगीतांवर आधारित जोशपूर्ण नृत्ये सादर झाली. लावणी आणि जोगवा नृत्याने प्रेक्षकांची टाळयांची दाद मिळवली. मध्यंतरानंतर नृत्यकला मंदिर तर्फे कलाकारांसाठी पुरस्कार सोहळा झाला. उत्कृष्ट बालकलाकार विघ्नेश साळुंखे, उत्कृष्ट युवा कलाकार आशुतोष संकाये पाटील उत्कृष्ट नृत्य रचनाकार सुप्रिया धाईंजे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. अजून दोन विशेष पुरस्कारांनी आशा नेगी आणि जुई प्रकाश यांना सन्मानित करण्यात आले.

मध्यंतरानंतर बॉलीवूड कंटेम्पररी आणि फ्युजन अशा प्रकारची मनोरंजनात्मक नृत्ये सादर झाली. या नृत्यांनी सोहळा अतिशय रंगतदार झाला. जागतिक नृत्य दिनाचे औचित्य साधून सादर झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून दिग्गज व्यक्तींची उपस्थिती लाभली. लेखक, दिग्दर्शक, अभिनेते चेतन चावडा, निफ संस्थेचे अध्यक्ष मुकेश कणेरी आणि निगडी प्राधिकरण विभागाच्या नगरसेविका शर्मिला बाबर, विश्वस्त रत्नम आदी उपस्थित होते. सर्व उत्कृष्ट शिबिरार्थींना या पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तेजश्री अडिगे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियांका जोशी यांनी केले.नृत्य कला मंदिरचे संचालक अविनाश अडिगे यांनी आभार मानले.

संपादकीय विशेष

# मूर्तीसंरक्षक तालिबान!

दोन महिन्यांपूर्वी तालिबान प्रशासनाने घोषणा केली की, अफगाणिस्तानमधील वारसा आणि ऐतिहासिक ठिकाणांचे संरक्षण, देखरेख आणि जतन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. 'तो' आपल्या देशाच्या समृद्ध संस्कृतीचा, इतिहासाचा आणि ओळखीचा भाग आहे. अनेक दशके चाललेल्या युद्धाच्या समाप्तीनंतर, बौद्ध धर्माशी संबंधित अनेक अवशेष आता खुद्द तालिबान प्रशासनाकडून उघड केले जात आहेत. उत्खननादरम्यान ते सापडल्याचा दावा केला जात आहे. याशिवाय, पूर्व अफगाणिस्तानमधील लघमान प्रांतातील गौवर्जन गावात खडकांमध्ये तयार केलेले पोकळ भाग 2000 वर्षं जुन्या कुशाण साम्राज्याशी जोडले जात आहेत. हे खडकाळ खड्डे कुशाण साम्राज्याचे भांडार असल्याचे बोलले जात आहे. हे साम्राज्य एके काळी गोबीच्या वाळवंटापासून गंगा नदीपर्यंत पसरले होते. लघमानमध्ये दगडांवर ब्राह्मी लिपीमध्ये लिहिलेले शिलालेख आणि एक दगडी पाटीही सापडली असून त्यात द्राक्षे दळून वाइन बनवल्यासारखे दिसते. लघमानच्या संस्कृती आणि पर्यटन विभागाचे प्रमुख मोहम्मद याकूब अयुबी यांनी सांगितले, की अफगाणिस्तानला पाच हजार वर्षांचा इतिहास आहे. हे अवशेष त्याचा पुरावा आहेत. येथे राहणारे लोक, मग ते मुस्लिम असोत वा नसोत; त्यांचे येथे साम्राज्य होते. तालिबान या ठिकाणांच्या सुरक्षेला महत्त्व देते. या मताला गझनी प्रांतातही पाठिंबा मिळाला. तेथील संस्कृती विभागाचे प्रमुख हमीदुल्ला निसार यांनी सांगितले की, बामियानच्या बौद्ध शिल्पांचे जतन केले पाहिजे आणि भविष्यातील पिढ्यांना वारसा म्हणून सुपूर्द केले पाहिजे कारण ते आपल्या इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग आहेत.

2001 मध्ये तालिबानचा संस्थापक मुल्ला उमरने मूर्तीपूजा थांबवण्यासाठी सर्व बौद्ध मूर्ती नष्ट करण्याचे आदेश दिले आणि काही दिवसांमध्येच आंतरराष्ट्रीय निषेध असूनही बामियान येथील 1500 वर्ष जुन्या महाकाय बुद्धमूर्तींवर क्षेपणास्त्रे डागण्यात आली. लघमनचे हेरिटेज संवर्धन संचालक मोहम्मद नादिर मखवार यांनीही मागील सरकारमध्ये हेच पद भूषवले होते. ते म्हणाले की तालिबान परतले तेव्हा लोकांना वाटत होते की ते पूर्वीसारखे ऐतिहासिक वारशांना महत्त्व देणार नाहीत; पण प्रत्यक्षात ते याला खूप महत्त्व देत आहेत. डिसेंबर 2021 मध्ये तालिबानने अफगाण राष्ट्रीय संग्रहालय पुन्हा उघडले. त्यांनी स्वतः गैर-इस्लामिक वस्तूंचे नुकसान केले होते. 2022 मध्ये, त्यांनी ऐतिहासिक बौद्ध स्थळ मेस आयनाक जतन करण्यासाठी 'आगा खान ट्रस्ट फॉर कल्चर' (एकेटीसी) कडे मदत मागितली. आता बामियानमध्ये बुद्ध मूर्तीविषयी वारसास्थळांचे महत्त्व सांगणारे फलक दिसू लागले आहेत. 'इंटरनॅशनल असोसिएशन फॉर द कॉन्झर्व्हेशन ऑफ ह्यूमन हेरिटेज'च्या संचालक वॅलेरी फ्रॅलँड यांच्या मते बामियान बुद्धमूर्तींचा नाश आपल्या प्रतिमेला किती हानीकारक होता, हे आता तालिबानला समजले आहे. त्यांचा असा विश्वास आहे की आता तालिबानला प्रत्येक प्रकारचा भौतिक वारसा जपायचा आहे. तथापि, तालिबानचे स्वारस्य केवळ पुतळे आणि इमारतींपुरती मर्यादित असल्याचे काही तज्ज्ञांनी उघड केले.

प्रत्यक्षात इस्लामच्या नावाखाली आजही संगीत, नृत्य, लोककथा आणि महिलांशी संबंधित समस्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. उदाहरणार्थ, हेरात शहरातील ज्यूंचे जुने प्रार्थनास्थळ जतन केले गेले आहे; परंतु शहरातील प्राचीन ज्यू समुदायाच्या सद्यस्थितीबद्दल कोणतीही बातमी नाही. तालिबानने आपल्या पहिल्या कारकिर्दीपासून अनेक आंतरराष्ट्रीय वारसा करारांवर स्वाक्षरी केली आहे. देशाच्या वारशाची हानी करणे हा त्या करारानुसार 2016 पर्यंत 'युद्ध गुन्हा' बनला होता. आता या वारसा संवर्धनामुळे त्यांना पर्यटन आणि आर्थिक विकास दोन्ही साध्य करण्याची महत्त्वाची संधी उपलब्ध होऊ शकते; मात्र हे साध्य करण्याआधी तालिबानसमोर दोन मोठ्या अडचणी आहेत. एक म्हणजे पैशाची कमतरता आणि दुसरे म्हणजे पुरातत्व आणि वारसा यांचे ज्ञान असलेले लोक आता देश सोडून गेले आहेत. पर्यटकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न मोठा आहे. कारण गेल्या वर्षी बामियानला भेट देणाऱ्या एका गटावर दहशतवादी हल्ला झाला होता.

एकीकडे ही स्थिती असताना दुसरीकडे अफगाण तालिबानबाबत रशियाने आपल्या भूमिकेत मोठा बदल केला आहे. अलिकडेच रशियाच्या सर्वोच्च न्यायालयाने तालिबानचा दहशतवादी संघटनेचा दर्जा काढून टाकला. या निर्णयामुळे 2003 मध्ये लादण्यात आलेली बंदी संपुष्टात आली. या निर्णयाकडे मुत्सद्दी दृष्टिकोनातून तालिबानचा मोठा विजय म्हणून पाहिले जात आहे. रशियन सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय देशाच्या अभियोजन कार्यालयाने केलेल्या अपीलनंतर आला आहे.

अफगाणिस्तानमध्ये अमेरिका आणि नाटो सैन्य सक्रिय असताना 2003 मध्ये रशियाने तालिबानला अधिकृतपणे दहशतवादी संघटना घोषित केले होते; पण 2021 मध्ये अफगाणिस्तानातून अमेरिकन सैन्याने माघार घेतल्यानंतर आणि तालिबान काबूलमध्ये परतल्यानंतर रशिया आणि तालिबान यांच्यातील संबंध वाटाघाटीच्या पातळीवर आले. अलिकडच्या वर्षांमध्ये अनेक रशियन अधिकाऱ्यांनी तालिबानच्या प्रतिनिधींशी भेट घेतली आहे. आता या नव्या कायदेशीर दर्जामुळे दोन्ही देशामधील संबंध औपचारिक करण्याचा मार्ग सुकर झाला आहे. रशिया मध्य आशिया आणि अफगाण क्षेत्रात आपली राजनैतिक पकड मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे.

तालिबान राजवटीला अद्याप आंतरराष्ट्रीय मान्यता मिळालेली नाही; परंतु रशियासारख्या देशांनी उचललेली पावले त्यांच्यासाठी या दिशेने मार्ग खुला करू शकतात. त्याचबरोबर या निर्णयावर पाश्चात्य देश आणि आंतरराष्ट्रीय संस्था काय प्रतिक्रिया देणार हे पाहणे बाकी आहे. तालिबान आता पाकिस्तानच्या विरोधात भूमिका घेत आहे. चार वर्षांपूर्वी तालिबानने काबूलवर ताबा मिळवला, तेव्हा भारत त्यापासून दुरावला. अफगाणिस्तानशी आपले संबंध पुन्हा सुधारू शकतील, याची कल्पनाही कोणी त्यावेळी केली नव्हती. मात्र दोन दशकांपासून हे दोन देश पुन्हा एकदा राजनैतिकदृष्ट्या जोडले गेले आहेत. काही दिवसांपूर्वी भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दुबईत घेतलेली अफगाणिस्तानचे प्रभारी परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्तकी यांची भेट पाकिस्तानविरोधातील मोठी खेळी मानली जात आहे. अलीकडेच पाकिस्तानने अफगाणच्या तळांवर केलेल्या हवाई हल्ल्यांवर टीका केली होती. याशिवाय दोन्ही देशांचे मुत्सद्दीही भेटत आहेत. तथापि, भारताने या संघटनेला देशाचे सरकार म्हणून मान्यता दिलेली नाही.

# सायबर संस्कार; एक आवश्यक गरज

**एव्हाना आपण सर्वांनीच सायबरजगतात आणि त्या निमित्ताने एका नव्या विश्वात प्रवेश केला आहे. या जगतात आपल्याला अनुकूल आणि जगणे सूकर करणारी अनेक तंत्रे समाविष्ट आहेत. गेल्या दशकातील तंत्रज्ञान विकास व अंमलबजावणीच्या वेगापेक्षा पुढील दशकातील वेग अधिक दखलपात्र असेल. सर्वांना, विशेषतः एकविसाव्या शतकात जन्माला आलेल्या पिढीला इथे वावरताना जास्त सतर्क व जागरूक राहावे लागेल.**

तंत्रवेध
डॉ. दीपक शिकारपूर





मनन करून, सर्वांगीण विचार करून कृती करतो तो मनुष्य. चांगला विचार आणि कृती होण्यासाठी संस्कारांची गरज असते. आजचे युग पूर्णपणे डिजिटल झालेय. एकविसाव्या शतकात संगणक आणि मोबाईल क्रांतीने जीवनपद्धतीचे सर्व संदर्भ बदलेले आहेत. नुकताच घडलेला एक प्रसंग सांगतो. कॉलेजमधला एक मित्र अनेक वर्षांनी विमानतळावर भेटला. तो बराच अस्वस्थ वाटत होता. त्याचे खरे कारण म्हणजे त्याचे मोबाईल डेटा आणि आउटगोइंग काही तास बंद होते आणि त्यामुळे त्याला सोशल मीडिया वापरता येत नव्हता. अशी अनेक उदाहरणे आपण बघतो. संगणक आणि इतर उपकरणे आपले जीवन सुसह्य करण्यासाठी निर्माण केली आहेत. पण दुर्दैवाने अनेकजण त्याच्या अधीन झाले आहेत. दारू, सिगरेटसारखेच हे ही एक व्यसन आहे. आज प्रौढ वयात संगणक अथवा इंटरनेटशी संबंध आलेली पिढी आणि जन्मापासून संगणकीय युगातच वावरणारी म्हणजे साधारण 2000 नंतर जन्मलेली मुले-मुली यांच्या इंटरनेटकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात मूलभूत फरक असणार आहेच.. इंटरनेट वापराच्या 30 टक्के एवढा वेळ सोशल नेटवर्किंग आणि ब्लॉग्जसाठी खर्च केला जातो, जो इ-मेलपेक्षा ही जास्त आहे. गेल्या काही वर्षांमध्ये लोकप्रिय सोशल नेटवर्किंग साइट वापरकर्त्यांच्या प्रमाणात जगभर लक्षणीय वाढ होत आहे. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक कायम टाळला पाहिजे. अनेकदा वेळ नसल्याने पालक आणि बाल्यांचा संवाद कमी होत आहे. त्यामुळे संगणक, मोबाईल, टीव्ही ही उपकरणे मुलांच्या संवादाची साधने बनली आहेत. 8-14 वयोगटातील बरेच विद्यार्थी याच्या आहारी जाऊन तेच आपले विश्व असल्याच्या भ्रमात वावरतात. त्यामुळे नैराश्य, दुभंगलेले व्यक्तिमत्व आदी समस्यांमुळे काहीजण आत्महत्येचा मार्गही स्वीकारत आहेत.

या पार्श्वभूमीवर प्रत्येक वस्तू, उपकरण हे 'स्मार्ट' असणे ही आज चैन नसून गरज बनत चालली आहे. सतत इंटरनेटचा वापर हे सुद्धा एक व्यसनच बनत आहे. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक कायम टाळला पाहिजे. शेवटी आपण लक्षात घेतले पाहिजे की तंत्रज्ञान हे सुऱ्यासारखे असते. एखादे फळ कापण्यासाठी किंवा एखाद्याचा खून करण्यासाठीही ते वापरले जाऊ शकते. आहेत. इंटरनेटवर अनेक गुन्हेगार वावरत असतात, तसेच अतिरेकी मनोप्रवृत्तीचे लोकही वावरत असतात. मात्र हे लोक तुम्हाला फसवायचा प्रयत्न न करता आपलेसे करण्याचा प्रयत्न करत असल्याने या प्रकारच्या लोकांनी चालवलेल्या संकेतस्थळांची सफर करताना सावधपणा अंगी बाळगणे जरूरीचे असते. आजच्या काळात पालकांनी आपल्या पाल्यांना स्मार्टफोन द्यायच्या आधी तो कसा वापरावा याचे प्रशिक्षण देणे अत्यावश्यक आहे. तंत्राला वापरणारे मन, विचार हे त्याचा वापर ठरवते. अमेरिकेत अनेक वेळा शाळकरी मुलांवर खुनी हल्ले झालेत. ते आत्तापर्यंत कुठल्या तरी हाडामासाच्या विकृत खुनी व्यक्तीने केलेत. पण भविष्यात कदाचित स्वयंचलित वाहन किंवा यंत्रमानव असे गुन्हे करू शकेल. त्यावेळी खुनी कोण हे ठरवणे अवघड असेल. माहिती-तंत्रज्ञानातील अभूतपूर्व क्रांतीने सारे जग जोडण्याची किमया केली खरी; परंतु त्याबरोबरच विघातक, विध्वंसक वृत्तींनाही कमी जोखीम पत्करून जास्त दुष्परिणाम घडवण्याची क्षमताही प्राप्त झाली. सायबर तंत्रज्ञानाद्वारे चालवली जाणारी अशी युद्धे आत्तापर्यंतच्या लढायांपेक्षा फार वेगळी असणार आहेत. कोणतीही प्रत्यक्ष सीमारेषा नसलेली आणि फार वेगाने पसरणारी.

यापुढे शाळा, महाविद्यालयांमध्येही संगणक किंवा स्मार्टफोनच्या दुष्परिणामांवर प्रबोधन होणे बंधनकारक व्हायला हवे. नागरिकशास्त्र या विषयातही याचा समावेश करायची हीच वेळ आहे. आधुनिक तंत्रज्ञान योग्य प्रकारे वापरणे म्हणजे सायबर संस्कार. सायबर संस्कार प्रशिक्षणात स्मार्टफोनचा वापर नेमका कसा करावा, सोशल मीडियावर माहिती पोस्ट करताना कोणती काळजी घ्यावी, सेल्फीचे व्यसन मर्यादेत असावे; किंबहुना ते व्यसन बनूच नये, योग्य पध्दतीने चलतचित्रण करणे, सायबर गुन्हेगारी, स्वतःला सायबर सुरक्षित कसे ठेवायचे, सायबर कायदे कसे पाळायचे आणि सायबर गुन्हेगारी करणाऱ्यांना झालेल्या शिक्षा या महत्वाच्या बाबींची माहिती द्यायला हवी. हे प्रशिक्षण गंभिर्याने द्यायला, घ्यायला हवे. तरच त्याची परिणामकारकता जाणवेल आणि उपयुक्तता सिध्द होईल. पूर्वी फक्त भौतिक गोष्टींची सुरक्षा गणली जायची. आता सायबर सुरक्षा आणि सर्व संगणकीय भांडवलाची आणि माहितीची सुरक्षा ही एक अत्यावश्यक बाब झाली आहे. कुंपण, पहारेकरी, कड्या-कुलूप, तिजोरी, शिस्त हे सर्व पर्याय पारंपारिक भौतिक जगातील व्यवसायांसाठी ठीक आहेत, पण डिजिटल युगात ते कुचकामी ठरतात. त्यासाठी वेगळे सायबर नियम अत्यावश्यक आहेत.

आगामी काही वर्षांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, विश्लेषण, यंत्रमानव (रोबोटिक्स), इंटरनेट ऑफ थिंग्स यासारख्या तंत्रज्ञानामुळे येत्या काळात जगाच्या भल्यासाठी अनेक क्रांतिकारी शोध लागतील. या संशोधनाचा वापर करुन नवीन उत्पादने बनू शकतील आणि बनतीलही. पण हेच सर्व तांत्रिक प्रवाह एखाद्या विकृत, गुन्हेगारी वृत्तीच्या व्यक्तीच्या हाती पडल्यास नाशही होऊ शकतो. यामुळेच एमआयटी, स्टॅनफर्ड, हार्वर्डसारख्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये संगणक तंत्रज्ञांना आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नैतिकता, नीतिमूल्य या मूलभूत विषयावर सक्तीचा अभ्यासक्रम विकसित होत आहे. त्यामुळे काय बरोबर आहे व काय चूक आहे हे समजून घेणे कसे गरजेचे आहे, हे नव्या पिढीला, तंत्रज्ञांना कळेल आणि या बाबी ते आचरणात, व्यवहारात आणतील, असा त्यांचा होरा आहे. हा प्रवाह काही वर्षांमध्येच भारतीय शिक्षणपद्धतीमध्येही अंतर्भूत होईल. अस्तित्वात असलेल्या मानवी नातेसंबंधांचा दर्जा आणि खुमारी वाढवण्यासाठी तंत्रज्ञान वापरा, पण सोशल नेटवर्किंग साइटवर जाऊन मित्र-मैत्रिणी शोधू नका, अशा ई-नातेसंबंधांचे मानवी व्यक्ती ऋणानुबंधात फार क्वचित रुपांतर होते, हे आता समजून घ्यावे आणि प्रसंगी समजावून सांगावे लागेल. त्यातून अनेकदा गुन्हेगारीचे प्रकार घडतात. सर्वच इंटरनेट वापरकर्ते सभ्य आणि सुसंस्कृत असतीलच असे नाही. इंटरनेटवर अनेक गुन्हेगार वावरत असतात तसे अतिरेकी मनोप्रवृत्तीचे लोकही वावरत असतात. मात्र हे लोक तुम्हाला फसवायचा प्रयत्न न करता आपलेसे करण्याचा प्रयत्न करत असल्याने या प्रकारच्या लोकांनी चालवलेल्या संकेतस्थळांची सफर करताना अंगी सावधपणा बाळगणे जरूरीचे असते.

कुठलीही गोष्ट मर्यादित प्रमाणात मूल्य देते. तंत्रज्ञानाचेही असेच आहे. गरज असेल तरच मुलांनी ते वापरावे. वेळ जात नसेल तर मैदानी खेळ, कला, बाह्य क्रिया, योगा, फिरणे, संगीत असे अनेक पर्याय आहेत. इंटरनेट न वापरायचीही सवय झाली पाहिजे. माझा एक मित्र रविवारी इंटरनेट अजिबात वापरत नाही. या बाबतीतही स्वतःवर बंधन आणि शिस्त आवश्यक आहे. अनेकजण स्वत:वर ते घालून घेतात तर अनेकजण मुळातच संतुलन राखून सोशियल मीडिया, इंटरनेटचा वापर करतात. या ठिकाणी हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, माफक प्रमाणात आणि हवे असेल तेव्हाच आपण हे तंत्रज्ञान वापरले तर त्याचे अनेक फायदे आहेत, मात्र अनाठायी, उठता-बसता सायबरजगतात रमायची सवय लागली तर नजिकच्या काळातच या सवयीचे रुपांतर व्यसनामध्ये होऊ शकते आणि पाहता पाहता मुले या तंत्राच्या आहारी जाऊ शकतात. सायबरचोरीचे, या तंत्रामुळे निर्माण होणाऱ्या गुंत्याचे तोटे समजून घेतले आणि समजावून दिले तर भविष्यात या विश्वात वावरणे सोयीचे होईल, अन्यथा त्याचा बाऊ करणे किंवा त्यापासून दूर राहण्याचा मार्ग अनेकजण स्विकारताना दिसतील.

खेचाखेची

## नंतर पटतं

**शिक्षिका :** जो माझ्या प्रश्नाचे लवकर उत्तर देईल त्याला आज माझ्याकडून सुट्टी मिळेल...
गण्याने लगेच आपली बॅग वर्गाबाहेर फेकली!...
**शिक्षिका :** ती बॅग कोणी फेकली?

**गण्या :** मी. आता घरी जाऊ...?

ह्याला म्हणतात डोक...

सुप्रभात

वेगळं काही

इराकमध्ये २२ वर्षांच्या प्राण्यांच्या वैद्यकशास्त्राचं शिक्षण घेणाऱ्या अहमद ताहेर मक्की या विद्यार्थ्यांने मांजरांसाठी हॉस्टेल सुरू केलं आहे. इथे लोक पाळीव मांजरांना ठेऊ शकतात. यासाठी दिवसाला पाच हजार इराकी दिनार इतका खर्च येतो. आपल्या घरातच त्याने ही संकल्पना राबवली आहे. इथे येणाऱ्या मांजरांना मऊ बिछाना, पौष्टिक आहार आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. इथे मांजरांना खेळण्यासाठी खास वातानुकुलित मैदानही तयार करण्यात आलं आहे. या सुविधेमुळे लोक मांजरं पाळू लागतील. तसंच बाहेरगावी जाणारे लोक आपल्या पाळीव मांजरांना इथे निर्धास्तपणे सोडू शकतील, असं मक्कीचं म्हणणं आहे.

भटकंती

## खारं पाणी केसांसाठी घातक

सुट्टीतील भटकंती म्हणून अनेकजण बीचची निवड करतात. समुद्रात मनसोक्त डुंबलं जातं. दंगामस्ती होते. पण समुद्रस्नानामुळे केसांचा पोत बिघडतो. ते टाळण्यासाठी सोप्या ट्रिक्स वापरून केसांची काळजी कशी घ्यावी हे जाणून घ्या.



* समुद्रकिनारी वास्तव्य असेपर्यंत एक दिवसाआड केसांचं कंडिशनिंग करावं. धूळ, ऊन आणि रेतीमुळे केस कोरडे होतात. हे लक्षात घेता केसांवर हेअर मास्कचा वापरही करता येऊ शकतो. * समुद्रात जाण्यापूर्वी केस साध्या पाण्याने ओले करून घ्यावेत. त्यामुळे केसांकडून खारं पाणी कमी प्रमाणात शोषलं जाईल. * बीचवर जाताना स्कार्फ आणि हॅट्चा वापर करणं गरजेचं ठरतं. त्यामुळे केसांचं नुकसान टाळणं शक्य आहे. * बीचवर दिवसभर उन्हात राहिल्यानंतर केसांवर ड्रायरचा वापर करणं योग्य नाही. ब्लो ड्रायरने सुकवण्याऐवजी केस नैसर्गिकरित्या वाळवावेत. * बीचवर जाताना केसांसाठी कुठलं प्रॉडक्ट योग्य ठरेल याचा अंदाज घ्या. केसांसाठी अँटी फ्रीजिंग प्रॉडक्ट आणि सन प्रोटेक्शन शँपूचा वापर करा. सीरमचा वापरही लाभदायक ठरेल.




राशीभविष्य

- **मेष** : किरकोळ बाबींचा ताण राहील. प्रवासामुळे दगदग होईल. जुनी येणी वसुलीबाबत अडचणी येतील.
- **वृषभ** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक घ्याव्या. अतिआत्मविश्वास अडचणीचा ठरेल. विचारानं रहायला हवं.
- **मिथुन** : मुलांबाबत चिंता राहील. कौटुंबिक वाद–विवाद संभवतात. नोकरीत प्रगतीच्या संधी लाभतील.
- **कर्क** : कलाकारांचा गौरव होईल. स्थापत्य क्षेत्रात विशेष अनुकूलता राहील. परदेश प्रवासाचे योग आहेत.
- **सिंह** : आठवणींना उजाळा मिळेल. स्थावर प्रश्नात लाभ होईल. नव्या ओळखीतून दिलासा मिळेल.
- **कन्या** : गृहसजावटीच्या क्षेत्रात प्रगती होईल. मोठ्या खरेदीचा उत्साह राहील. मुलांची उत्तम प्रगती होईल.
- **तूळ** : आर्थिक प्रश्नांचा ताण राहील. सरकारी कामं मार्गी लागतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी.
- **वृश्चिक** : हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल. उत्साहवर्धक घटना घडतील. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.
- **धनु** : व्यवसायात अडचणी संभवतात. अनुभवींचा सल्ला घ्यावा. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं.
- **मकर** : कलाकारांचा उत्साह वाढेल. अनपेक्षित संधी चालून येतील. स्थावर प्रश्नात तडजोड करावी लागेल.
- **कुंभ** : अडचणींवर धैर्यानं मात कराल. कोणत्याही आमिषाला बळी पडू नका. विवाहकार्य लांबणीवर पडेल.
- **मीन** : भावंडांशी मतभेद संभवतात. छोट्या–मोठ्या प्रश्नांचा ताण राहील. प्रवासात काळजी घ्यावी.

सल्ला मोलाचा

## उन्हाळ्यात हे नकोच...

उन्हाळ्यात पोटाशी संबंधित अनेक विकार डोकं वर काढतात. त्यामुळे आहारात योग्य घटकांचा समावेश करुन शरीराला आतून थंडावा देणं गरजेचं असतं. या काळात कोणत्या पदार्थांचं सेवन टाळावं याविषयी...

* **मसाले–** उन्हाळ्यात मसालेदार पदार्थांनी युक्त आहार शरीरातील उष्णता वाढवण्यास कारक ठरतो. त्यामुळे या दिवसात मिरच्या, आलं, काळी मिरी, दालचिनी सारख्या मसाल्यांचं प्रमाण मर्यादित ठेवावं. * **लाल मांस–** उन्हाळ्यात सामिष आहारावर नियंत्रण ठेवणं गरजेचं ठरतं. * **जंक फूड –** खरं पाहता जंक फूडचं सेवन हानिकारकच असतं. पण उन्हाळ्यात पचनास जड असणारे असे पदार्थ खाल्ले तर पोटादुखीसारख्या तक्रारींमध्ये वाढ होते. * **सुकामेवा –** सुकामेवा शरीरासाठी लाभदायी समजला जातो. पण उन्हाळ्यात याचं सेवन मर्यादात प्रमाणात असावं. हे पदार्थ शरीरात उष्णता निर्माण करतात. * **चहा किंवा कॉफी –** चहा अथवा कॉफीशिवाय अनेकांच्या दिवसाची सुरवात होत नाही. पण उन्हाळ्यात चहा–कॉफीचं सेवन मर्यादित ठेवावं. त्याऐवजी नारळपाणी, लिंबू सरबत, ताक आदी थंडावा देणारी पेय घ्यावी.

दिनविशेष

## ७ मे

- **२००२** : लोकसाहित्याच्या संशोधक दुर्गाबाई भागवत यांचे निधन.
- **२०१३** : स्थानिक संस्था कराच्या वादावर तोडगा निघालेला नसल्याने व्यापाऱ्यांची बंदची हाक.
- **२०१७** : फ्रान्सच्या अध्यक्षपदासाठी इमॅन्युएल मॅक्रॉन यांना कौल.
- **२०१८** : आगामी सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस सर्वात मोठ पक्ष म्हणून उदयाला आल्यास आपण पंतप्रधान होण्यास तयार असल्याचं राहुल गांधी यांचं प्रतिपादन.

महत्त्वपूर्ण काही

## जग ॲनिमेशनचं...

ॲनिमेशनच्या क्षेत्रात सध्या प्रचंड संधी उपलब्ध झाल्या आहेत. हे क्षेत्र वेगाने वाढत आहे. ॲनिमेशनच्या माध्यमातून चित्रपटातल्या व्यक्तिरेखेला जिवंत करणं हे ॲनिमेटरचं काम असतं. ॲनिमेशन तंत्रज्ञानाचा वापर करून चित्रपट, जाहिराती तयार केल्या जातात. या क्षेत्रात कल्पकतेला महत्त्व दिलं जातं.

**कौशल्य:** या क्षेत्रात करीअर करण्यासाठी तुमच्याकडे चित्रकलेची जाण असायला हवी. यासोबतच ॲनिमेशनची आवडही असली पाहिजे.

**शैक्षणिक पात्रता:** बारावीनंतर ॲनिमेशनचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. बीए इन ॲमिनेमशन, बीएससी इन ॲनिमेशन, डिप्लोमा इन ॲनिमेशन तसंच प्रमाणपत्र अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत.

**संधी:** भारतात ३०० पेक्षा जास्त ॲनिमेशन स्टुडिओ आहेत. या स्टुडिओंमध्ये लोक मोठ्या संख्येने काम करतात. गेमिंगच्या क्षेत्रात बऱ्याच संधी आहेत. मनोरंजनाच्या क्षेत्राबरोबरच उद्योगजगत, शिक्षण, जाहिरात अशा क्षेत्रांमध्येही ॲनिमेशनची गरज लागते. पुरेशा अनुभवानंतर उत्पन्नातही वाढ होते.

पंचांग

**बुधवार, ७ मे २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
वैशाख शु. १०, नक्षत्र : पू. फाल्गुनी
चंद्रराशी : सिंह, योग : व्याघात
सूर्योदय: ६.१०, सूर्यास्त: ७.०१

फॉरवर्डस


**तेरी मोहब्बत में ऐसा असर हैं,
हर गम भी अब मुझे गवारा हैं।**

**तेरे बिना हर लम्हा अधूरा लगता हैं,
तेरे साथ ही अब मेरा सारा जहाँ हैं।**

आरोग्यमंत्र

## सकारात्मक विचार करा

दंतवैद्यांची जाण्याची भीती निर्माण होण्यामागे अनेक कारणं आहेत. आधीच्या वेदनादायी अनुभवानंतर पुन्हा असा अनुभव घेताना भीती वाटू शकते. असुरक्षिततेची भावना, उपचारासाठी खुर्चीवर बसल्यानंतर वाटणारी भीती, स्वत:वर नियंत्रण न राहणं, तोंड उघडताना वाटणारी अस्वस्थता, ओशाळलेपण यामुळे अशी समस्या निर्माण होऊ शकते. डेंटिस्टकडे जाण्याआधी अस्वस्थ वाटणं, झोप न येणं, डॉक्टरकडे गेल्यानंतर ताण येणं, निराश, हताश वाटणं, डेंटिस्टकडे जाण्याआधी आजारी असल्यासारखं वाटणं, दातांची तपासणी होत असताना भीती वाटणं आणि श्वास घ्यायला त्रास होणं ही या त्रासाची लक्षणं मानता येतील. या विकारावर उपचार शक्य आहेत. आपली भीती दंततज्ज्ञाकडे व्यक्त करा. दातांच्या उपचारांविषयी डेंटिस्टशी बोलून घ्या. उपचारांदरम्यान लक्ष दुसरीकडे वळवा. गाणी ऐका, तीव्ही बघा. वेदना कमी करण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी वेदनाशामक औषधं घेता येतील. याविषयी दंततज्ज्ञाशी बोला. ताण निवारणाच्या उपाययोजना करा. डेंटिस्टकडे जाण्यापेक्षा दातांच्या वेदना सहन करणं तुम्हाला अधिक योग्य वाटत असेल तर मानसोपचारतज्ज्ञाची मदत घ्या. उपचारानंतर दूर होणाऱ्या वेदनारहित आयुष्याचा विचार करा. सकारात्मकतेने ही भीती दूर सारा.



वाचा तर खरं

यासोबत पदवी, पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमही आहेत. या क्षेत्राशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर, नेटवर्क ॲडमिनिस्ट्रेटर, सिस्टीम इंजिनिअर, टेक्निकल इंजिनिअर, नेटवर्क इंजिनिअर म्हणून तुम्ही काम करू शकता. इतरही अनेक पर्याय आहेत. या क्षेत्रात काम करण्यासाठी पदवीसोबतच आवश्यक ती कौशल्यं असणंही गरजेचं आहे. या क्षेत्रात येणाऱ्यांना तांत्रिक माहिती असणं गरजेचं आहे. चिप, कॉम्प्युटर सिस्टीम, मदरबोर्ड, प्रोसेसर, रॅम, सर्किट बोर्ड या सगळ्या गोष्टींचं ज्ञान तुम्हाला असायला हवं. हार्डवेअरमध्ये पदवी मिळवणाऱ्या तरूणांना आयटी क्षेत्रात अनेक संधी आहेत.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### आम्हाला राज्यात शांतता हवी

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये आम्हाला दंगली नको तर शांतता हवी आहे. दंगल भडकवणाऱ्यांचे ऐकू नका, दंगलखोरांना बाहेरून आणले जाते. राज्यामध्ये कोणत्याही प्रकारचा धार्मिक हिंसाचार चालू देणार नाही, असे प्रतिपादन तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केले आहे. बॅनर्जी मंगळवारी मुर्शिदाबादला पोहोचल्या आणि त्यांनी हिंसाचारग्रस्तांची भेट घेतली. निदर्शकांना इशारा देताना त्यांनी सांगितले की, जर तुम्हाला निदर्शने करायची असतील तर तुम्ही दिल्लीला जावे. मी बंगालमध्ये हे होऊ देणार नाही. येथे कोणतीही समस्या नाही

### पंजाबच्या जंगलातून शस्त्रसाठा जप्त

**नवी दिल्ली :** पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर, पोलिसांनी पंजाबमधील शहीद भगतसिंग नगर (नवा शहर) च्या जंगलातून २ आरपीजी, २ आयईडी, ५ हँडग्रेनेड आणि एक वायरलेस कम्युनिकेशन सेट जप्त केला. गुप्तचर माहितीनंतर, अमृतसरचे राज्य विशेष ऑपरेशन्स सेल (एसएसओसी) केंद्रीय एजन्सीसह कारवाई करीत आहे. पंजाबचे डीजीपी गौरव यादव यांनी याची पुष्टी केली आहे. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर लिहिले- सुरुवातीच्या तपासात असे दिसून आले आहे की पाकिस्तानच्या आयएसआय आणि त्यांच्याशी संबंधित दहशतवादी संघटनांनी पंजाबमध्ये लपलेले त्यांचे स्लीपर सेल पुन्हा सक्रिय करण्याची योजना आखली होती.

# तुळजापूर मंदिरासाठी १६५ कोटींचा निधी

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोठे निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**अहिल्यानगर :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त फडणवीस सरकारने प्रथमच अहिल्यानगरच्या चौंडीत राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीचे आयोजन केलंय. आजच्या (६ मे २०२५) या ऐतिहासिक कॅबिनेट बैठकीच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय महत्वाच्या निर्णयांची घोषणा केली आहे. आज बैठकीच्या निमित्ताने चौंडीला स्मृतीस्थळाच्या जतन आणि संवर्धन करण्यासाठी ६८१ कोटी रुपयांचा आराखडा मान्य केलाय. या निधीतून विविध प्रकारची कामे होतील असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

दरम्यान, अष्टविनायक मंदिरासाठी १४७ कोटी रुपये, तुळजापूर मंदिरासाठी १६५ कोटी रुपये, नाशिकच्या त्र्यंबकेश्वर मंदिर विकास आराखड्यासाठी २७५ कोटी रुपये, सोबतच विदर्भातील माहूरगड विकास आराखड्यासाठी ८२९ कोटी रुपये, असे एकूण ५ हजार ५२० कोटी रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. तर दुसरीकडे अहिल्यानगर जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारणार असल्याची घोषणा ही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलीय. सोबतच मुलींचे स्वतंत्र आयटीआय देखील असणार असल्याचे ते म्हणाले.

राज्यात महिला सक्षमीकरणासाठी सरकार आदिशक्ती अभियान राबवणार आहे.

समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आणि जागृती करण्याचा आमचा प्रयत्न असेल. जे काम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केले तेच काम आमचं सरकार करणार आहे. अहिल्यादेवींचे जीवन आणि कार्याचा सन्मान झाला पाहिजे, यासाठी चित्रपटाची निर्मिती केली जाणार आहे. तो चित्रपट बहुभाषिक असेल. शिवाय हा केवळ जीवनपट नसेल तर प्रभावी मांडणी करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी यशवंत योजना

● परक्रियांच्या आक्रमणामुळे आमची श्रद्धास्थानं नष्ट करण्यात आली. मात्र त्याचे पुनरुज्जीवन करण्याचे काम अहिल्यादेवींनी केलं. आज बैठकीच्या निमित्ताने चौंडीला स्मृतीस्थळाचे जतन करण्यासाठी ६८१ कोटी रुपयांचा आराखडा मान्य केलाय. अखिल भारतीय स्थरावर प्रेरणा आणि तीर्थस्थळ तयार झाले पाहिजे, असं काम आपण केलंय. समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आणि जागृती करण्याचा आमचा प्रयत्न आहे. महिला केंद्रीत एनजीओ उभा करण्याचे काम हाती घेतले आहे. धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना नामांकित शाळांमध्ये प्रवेश द्यायचा यासाठी यशवंत योजना सुरु केली आहे. आता १० हजार विद्यार्थी आपण यातून शिकवणार आहोत. सोबतच गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह योजना सुरु करत आहोत, अशी महत्वपूर्ण घोषणा ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

### अहिल्यादेवींच्या काळातील १९ विहिरी ६ कुंड ३४ जलाशयांचे होणार संवर्धन

● अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या विहिरींसाठी जलसंधारण विभागाने हाती काम घेतलंय ज्यात त्यांचे पुनरुज्जीवन आपण करणार आहोत. ज्यामध्ये १९ विहिरी ६ कुंड ३४ जलाशयाच्या संवर्धनाचे काम करणार आहोत. सोबतच राहुरी दिवाणी न्यायालयाला ही मान्यता दिली आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरला मेळावा होतो त्यात कुंभमेळा प्राधिकरणाच्या कायद्याला मंजुरी दिली आहे. अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दीनिमित्ताने डाक तिकीटसह प्रेरणा गीत देखील जारी केलंय. ज्याप्रकारे या देशात सांस्कृतिक पुनरुत्थानाचे काम पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या माध्यमातून केलं गेलं त्याच पावलावर पाऊल टाकत सरकार पुढे जात आहे. असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

# १९ माजी मंत्र्यांना धक्का



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गृह मंत्रालयाने दिल्ली पोलिसांना १९ माजी राज्यमंत्र्यांचे सुरक्षा काढून घेण्याचे निर्देश दिले आहेत. कार्यकाळ संपल्यानंतरही या मंत्र्यांकडे सुरक्षा तैनात होती. मात्र केंद्र सरकारने भाजप नेत्या आणि माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांची सुरक्षा सहा महिन्यांसाठी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

दिल्ली पोलिसांनी गृह मंत्रालयाकडे माजी राज्यमंत्री आणि खासदारांची यादी पाठवली होती ज्यांना त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतरही सुरक्षा कवच आहे. गेल्या वर्षी दिल्ली पोलिसांच्या सुरक्षा युनिटने केलेल्या ऑडिटनंतर यादी केली होती.

ऑडिटमध्ये अनेक वरिष्ठ नेत्यांना कार्यकाळ संपल्यानंतरही सुरक्षा असल्याचे आढळले होते. ऑडिटनंतर, अनेक नेत्यांची सुरक्षा काढून घेण्यात आली. पुनरावलोकनात अनेक माजी राज्यमंत्री पदावर नसतानाही त्यांना अजूनही संरक्षण मिळत असल्याचे आढळले. अशा व्यक्तींची यादी गृह मंत्रालयाकडे पाठवण्यात आली होती, असे अधिकाऱ्याने सांगितले.

### काही खासदार आणि न्यायाधीशांची सुरक्षा काढली

● या पत्रात ज्यांची नावे आहेत त्यांना वाय-श्रेणी सुरक्षा कवच देण्यात आले आहे, त्यात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयातील माजी राज्यमंत्री भानू प्रताप सिंग वर्मा, पंचायती राजचे माजी मंत्री बिरेंदर सिंग, दळणवळणाचे माजी राज्यमंत्री देवुसिंह जेसिंगभाई चौहान, आदिवासी व्यवहाराचे माजी राज्यमंत्री जसवंतसिंह सुमनभाई भाभोर आणि परराष्ट्र व्यवहाराचे माजी राज्यमंत्री राजकुमार रंजन सिंग यांचा समावेश आहे. राज्यमंत्र्याव्यतिरिक्त गृहमंत्रालयाच्या यादीत काही खासदार आणि वरिष्ठ न्यायाधीशांची नावे देखील समाविष्ट आहेत. काही न्यायाधीशांसाठी सुरक्षा कायम ठेवण्यात आली आहे, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

### माजी लष्करप्रमुखांची सुरक्षा कायम

● सध्याच्या नियमांनुसार, एखाद्या व्यक्तीचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर पदीय किंवा धमकीच्या आधारावर प्रदान केलेल्या सुरक्षेचे पुनरावलोकन केले जाते. मात्र पुनरावलोकने बराच काळ घेण्यात आले नव्हते. मूल्यांकन पूर्ण केल्यानंतर, दिल्ली पोलिसांनी गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये गृहमंत्रालयाला त्यांच्या शिफारसी पाठवल्या. गृहमंत्रालयाचा अंतिम निर्णय काही आठवड्यांपूर्वी आला, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. माजी लष्करप्रमुख जनरल व्ही. के. सिंह आणि राज्यमंत्री अजय भट्ट यांची नावे देखील गृहमंत्रालयाला पाठवण्यात आली होती, परंतु त्यांची सुरक्षा कायम ठेवण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, गृहमंत्रालयाने स्मृती इराणी यांची सुरक्षा आणखी सहा महिन्यांसाठी वाढवली आहे.

# राज्य सरकारच्या स्पष्ट भूमिकेमुळे निवडणुकांचा मार्ग मोकळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील चार महिन्यात घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी स्वागत केले आहे.

पांडे म्हणाले, " पराभवाच्या भीतीने महाविकास आघाडी सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात कचखाऊ भूमिका घेतली होती. त्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेत वेळ गेला. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने निवडणुका घेण्यासंदर्भात आम्हाला कुठलीच अडचण नसल्याचे न्यायालयात स्पष्टपणे सांगितल्याने या निवडणुकींचा मार्ग मोकळा झाला."



पांडे पुढे म्हणाले, "सप्टेंबर पूर्वी निवडणुकांचा कार्यक्रम पूर्ण करा, सुप्रीम कोर्टाचे आदेश आहेत.

पुढील ४ आठवड्यात निवडणुकीची अधिसूचना जारी करायची आहे. 2022 पूर्वी ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाळ संपला आहे, त्यांच्या निवडणुका जुन्या ओबीसी आरक्षणा नुसार घेण्यात येतील.

त्यामुळे ओबीसी आरक्षणाचा तिढा सध्या सुटला आहे. राजकीय पक्ष म्हणून या निवडणुकीस सामोरे जाण्यास प्रदेश भाजपा तयारीत आहे. विधानसभेप्रमाणेच या निवडणुकातही आम्ही यश मिळवू असा विश्वास वाटतो."

# अपघातातील जखमींवर होणार कॅशलेस उपचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अपघातातील जखमींना वेळीच उपचार मिळावेत आणि प्राण वाचावेत यासाठी केंद्र सरकारने कॅशलेस उपचार योजना आणली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग आणि परिवहन मंत्रायलयाने यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. देशभरात अपघातातील जखमींना कोणत्याही रुग्णालयात कॅशलेस उपचार मिळणार आहे.




अपघातातील जखमींना कॅशलेस उपचार योजना २०२५ नुसार, मान्यताप्राप्त कोणत्याही रुग्णालयात जखमींना दीड लाखांपर्यंत कॅशलेस उपचार मिळणार आहे. अपघात झालेल्या दिवसापासून सात दिवसांच्या उपचाराचे पैसे मिळणार आहेत. ही योजना सोमवारपासून म्हणजे ५ मे २०२५ पासून लागू करण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जानेवारी २०२५ मध्ये या योजनेची घोषणा केली होती. अपघातातील जखमींसाठी केंद्र सरकार सुधारित योजना घेऊन येत आहे असे त्यांनी सांगितले होते.

कॅशलेस उपचार योजनेचा लाभ घेण्याचे तीन टप्पे आहेत. पहिला म्हणजे अपघातानंतर जखमींना तात्काळ हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागेल. केंद्र सरकार या सरकारी हॉस्पिटलची यादी जारी करेल. दुसरा म्हणजे अपघातानंतर २४ तासांत पोलिसांना कळवावे लागेल, अपघाताची संपूर्ण माहिती, जखमींच्या प्रकृती पोलिसांना सांगावे लागेल. तिसरा म्हणजे जखमींची फाईल तयार होईल. त्यात पोलिस रिपोर्ट, जखमीचे ओळख पत्र जमा करावे लागेल.

७ दिवसांसाठी १.५ लाख रुपयांचे मोफत उपचार

ही प्रक्रिया पार पाडल्यानंतर जखमी व्यक्तीला १.५ लाख रुपये दिले जातील. ज्यामुळे अपघाताच्या दिवसापासून पुढील ७ दिवसांसाठी १.५ लाख रुपयांचे मोफत उपचार दिले जातील. जखमींना प्रवेशावेळी कुठलेही शुल्क द्यावे लागणार नाही. प्राथमिक उपचार मोफत मिळतील. गंभीर रित्या जखमी झाल्यास सर्जरीची सुविधा मिळेल. त्याचबरोबर एक्स रे, सीटी स्कॅन, एमआरआयसारख्या सुविधा मोफत मिळतील. उपचारावेळी दिली जाणारी औषधे मोफत असतील. केंद्र सरकारने योजना लागू करण्यापूर्वीच महाराष्ट्र सरकारने अशीच योजना लागू केली आहे. महाराष्ट्रात अपघातातील जखमींना एक लाखांपर्यंत कॅशलेस उपचार करण्यासंदर्भातील निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

### नौदलाने घेतली एमआयजीएम क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

**नवी दिल्ली :** स्वदेशी बनावटीच्या मल्टी-इन्फ्लुएन्स ग्राउंड माइन (एमआयजीएम) क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी करून भारताने संरक्षण क्षेत्रात मोठे यश मिळवले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या कामगिरीबद्दल संरक्षण संशोधन आणि विकास संघटनाम्हणजे डीआरडीओ आणि भारतीय नौदलाचे अभिनंदन केले आहे. ही प्रणाली भारतीय नौदलाच्या लढाऊ क्षमतांमध्ये आणखी सुधारणा करेल असे त्यांनी म्हटले आहे.

ही प्रणाली एक प्रगत पाण्याखाली काम करणारी नौदल खाण आहे, जी नौदल विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रयोगशाळा, विशाखापट्टणम यांनी इतर प्रयोगशाळा, हाय एनर्जी मटेरियल्स रिसर्च लॅबोरेटरी, पुणे आणि टर्मिनल बॅलिस्टिक्स रिसर्च लॅबोरेटरी, चंदीगड यांच्या सहकार्याने विकसित केली आहे.

# ब्रह्मोसने वाढवली पाकची चिंता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पाकिस्तानची चिंता वाढवणारी आणखी एक बातमी समोर आली आहे. याबातमीमुळे पाकड्यांच्या छातीत धडकी भरली आहे. त्याला कारणही तसेच आहे. भारताच्या सर्वात घातक ब्रह्मोस क्षेपणास्त्राचे अपग्रेडेड वर्जन युद्ध ड्यूटीवर तैनात करण्यात आले आहे. ब्रह्मोसच्या तैनातीमुळे पाकिस्तान तणावात आहे. त्यांचे टेन्शन निश्चतच वाढले आहे. यासोबतच राफेल फायटर प्लेनवर ब्रह्मोस-एनजी क्रूझ क्षेपणास्त्र लावण्यासही हिरवा झेंडा मिळाला आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने उचललेले हे सर्वात मोठे पाऊल मानले जात आहे.

भारत आणि रशियाद्वारे संयुक्तपणे विकसित केलेल्या ब्रह्मोस क्षेपणास्त्राचे नाव ब्रह्मपुत्रा आणि मोस्कवा नद्यांवरून ठेवले आहे. जे सांस्कृतिक वारसा आणि धोरणात्मक सहकार्याचे प्रतीक आहे. त्याचे भारतीय नाव ब्रह्मपुत्रा हे हिंदूंच्या निर्मितीचे देव ब्रह्मा यांच्याशी जोडलेले आहे. धोरणात्मकदृष्ट्या ब्रह्मोस आपल्या सुपरसोनिक गती, अचूकता आणि मल्टी-प्लॅटफॉर्म क्षमतेसाठी ओळखले जाते.

हे भारताच्या विश्वसनीय किमान प्रतिरोध सिद्धांतानुसार कार्य करते. मोठ्या भागाचा नाश करण्याऐवजी सर्जिकल स्ट्राइक करण्याची क्षमता याला अधिक खास बनवते.

**ब्रह्मोसची वैशिष्ट्ये...**

- भारताचे सर्वात घातक क्षेपणास्त्र
- सर्जिकल स्ट्राईकसाठी धोकादायक शस्त्र
- जगातील सर्वात प्रभावी क्रूझ क्षेपणास्त्र
- पारंपरिक क्षेपणास्त्रांपेक्षा 3 पट वेगवान
- आधुनिक डिफेन्स सिस्टीमला भेदण्याची क्षमता
- शत्रूंना प्रतिक्रिया देण्यासाठी वेळ नाही
- कमी उंचीमुळे ट्रॅक करणे खूप कठीण
- रडारला चकवा देऊन अचूक निशाणा
- कोठूनही सोडता येणारे क्षेपणास्त्र
- समुद्र, जमीन, आकाश तिन्ही व्हर्जन उपलब्ध
- हवेतच आपला मार्ग बदलण्यास सक्षम
- चालत्या-फिरत्या लक्ष्यालाही भेदण्याची क्षमता

पान १ वरून

## गृह मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक

जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करावे लागेल. या बैठकीला २४४ नागरी संरक्षण जिल्हे आणि सीमावर्ती भागातील प्रतिनिधींनी विशेष उपस्थिती लावली आहे. यासोबतच, या सरावात रॉकेट, क्षेपणास्त्रे आणि हवाई हल्ल्यांसारख्या आपत्कालीन परिस्थितींसाठी तयारी करण्यावरही भर दिला जाईल. याशिवाय, सायरन आणि ब्लॅकआउटची व्यवस्था कशी करावी याबद्दलही बैठकीत चर्चा करणे शक्य आहे. देशाच्या सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापन क्षमतांची चाचणी आणि सुधारणा करण्याच्या दिशेने ही बैठक एक मोठे पाऊल मानली जात आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने सुरक्षा तयारीबाबत मोठे पाऊल उचलले आहे हे उल्लेखनीय आहे. गृह मंत्रालयाने देशातील अनेक राज्यांना ७ मे रोजी एक व्यापक नागरी संरक्षण मॉकड्रिल आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मॉकड्रिल अंतर्गत महत्त्वाचे उपक्रम राबवले जातील. या काळात हवाई हल्ल्याचा इशारा देणारे सायरन वाजवले जातील. हे मोठे धोके आणि शत्रूच्या कारवायांबद्दल अलर्ट जारी करण्याशी संबंधित एक पाऊल आहे.

संभाव्य हल्ल्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना आवश्यक नागरी संरक्षण तंत्रांचे प्रशिक्षण दिले जाईल. क्रॅश ब्लॅकआउटची व्यवस्था केली जाईल. याअंतर्गत, शत्रूच्या हवाई देखरेखीपासून किंवा हल्ल्यापासून शहरे आणि संरचना लपविण्यासाठी आपत्कालीन प्रोटोकॉल लागू केले जातील.

## ऐतिहासिक घडामोड

शिफारशींची माहिती – नाव, उच्च न्यायालय, स्त्रोत (सेवा किंवा बारमधून), कोलेजियमच्या शिफारशीची तारीख, न्याय विभागाची अधिसूचना तारीख, नियुक्तीची तारीख, विशेष प्रवर्ग तसेच संबंधित उमेदवार कोणत्याही विद्यमान किंवा सेवानिवृत्त उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालय न्यायाधीशाचा नातेवाईक आहे का, याचीही माहिती वेबसाइटवर दिले गेले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाईटवरील माहितीनुसार, तत्कालीन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील कोलेजियमने शिफारस केलेली एकूण १७ नावे अद्याप सरकारकडे प्रलंबित आहेत. तसेच सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखालील कोलेजियमने शिफारस केलेली १२ नावेही प्रलंबित आहेत. अशा प्रकारे, ९ नोव्हेंबर २०२२ पासून एकूण २९ न्यायाधीशपदाच्या नियुक्त्या सरकारकडे प्रलंबित आहेत. सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या तीन सदस्यीय समितीने अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरील आरोपांबाबतचा अहवाल सरन्यायाधीश संजीव खन्ना यांना सादर केला आहे. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्या. शील नागू, हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्या. जी. एस. संधावालिया आणि कर्नाटक उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अनु शिवरामन यांच्या समितीने ३ मे रोजी अहवाल अंतिम केला होता. हा अहवाल ४ मे रोजी सरन्यायाधीशांकडे सुपूर्त करण्यात आला अहे. अहवालामध्ये १४ मार्च रोजी रात्री ११.३५ वाजता न्यायमूर्ती वर्मा यांच्या लुटियन्स दिल्लीतील निवासस्थानी लागलेल्या आगीच्या घटनेनंतर सापडलेल्या कथित रोख रकमेसंदर्भातील निष्कर्ष दिले आहेत.

## म्हणून मोदींनी काश्मीर दौरा रद्द केला

काश्मीरमध्ये सुरक्षा व्यवस्था "मजबूत न केल्याबद्दल" त्यांना जबाबदार धरले पाहिजे असे म्हटले.

"हल्ल्याच्या तीन दिवस आधी मला माहिती मिळाली की, मोदीजींना एक गुप्तचर अहवाल पाठवण्यात आला होता आणि म्हणूनच मोदीजींनी त्यांचा काश्मीर दौरा रद्द केला... जेव्हा गुप्तचर अहवालात असे म्हटले आहे की तुमच्या सुरक्षेसाठी तिथे जाणे योग्य नाही, तेव्हा तुम्ही तुमच्या सुरक्षा, गुप्तचर, स्थानिक पोलिस आणि सीमा दलाला लोकांच्या संरक्षणासाठी का कळवले नाही? जेव्हा तुम्हाला माहिती मिळाली, तेव्हा तुम्ही तुमचा कार्यक्रम रद्द केला पण तिथे पर्यटकांच्या संरक्षणासाठी अधिक सैन्य पाठवले नाही...", असा आरोप खर्गे यांनी केला. २२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता, ज्यात बहुतेक पर्यटक होते. झारखंडची राजधानी रांची येथे 'संविधान बचाओ' रॅलीला संबोधित करताना काँग्रेस प्रमुखांनी दावा केला की, "सर्वपक्षीय बैठकीत तुम्ही (पंतप्रधान मोदी) गुप्तचर यंत्रणेत त्रुटी असल्याचे मान्य केले. पहलगाम हल्ल्यात झालेल्या जीवितहानीबद्दल केंद्राने जबाबदार नसावे का, जेव्हा त्यांनी गुप्तचर यंत्रणेचे अपयश स्वीकारले," असा सवाल त्यांनी केला.

## पोलिस अधीक्षक काँवत यांच्या...

त्यांच्या कुटुंबियांसोबत निवासस्थानी गेले होते. त्यावेळी पोलिस कर्मचारी बाळू बहिरवाळ घराच्या आतमध्ये गांजा ओढत होते. नवनीत काँवत यांनी घराची बेल वाजवली पण बाळू बहिरवाळ यांनी गेट उघडले नाही. काही वेळानंतर त्यांनी गेट उघडले. नवनीत काँवत यांनी घरात प्रवेश केला. पण त्यावेळी त्यांना गांजाचा वास आला.

पोलिस अधीक्षकांच्या घरातच असा गांजाचा वास आल्यामुळे नवनीत काँवत यांनी संबंधित पोलिस कर्मचाऱ्याची जिल्हा रुग्णालयात तपासणी केली. तपासणी अहवालात कर्मचाऱ्याने गांजा पिल्याचे निष्पन्न झाले. त्याची दखल घेत काँवत यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला. त्याचवेळी बाळू बहिरवाळ यांचे निलंबनही करण्यात आले.

# पुराव्याशिवाय आरोप करणे हा ईडीचा पॅटर्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पुराव्याशिवाय आरोप करणे हा ईडीचा पॅटर्न बनला आहे, अशी फटकार सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्रीय तपास यंत्रणेला लगावली. न्यायमूर्ती अभय एस. ओका आणि न्यायमूर्ती उज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर छत्तीसगडमधील २००० कोटी रुपयांच्या मद्य घोटाळ्या प्रकरणीच्या अरविंद सिंग यांनी दाखल केलेल्या जामीन याचिकेवर सुनावणी सुरू होती.



यावेळी न्यायमूर्ती अभय एस. ओक यांनी निरीक्षण नोंदवले की, आम्ही ईडीची अनेक प्रकरणे पाहिली आहेत. ईडी पुराव्याशिवाय आरोप करत आहे, ही एक पद्धत बनली आहे. सुनावणीदरम्यान, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी आरोप केला की, या प्रकरणात अरविंद सिंग यांनी विकास अग्रवाल नावाच्या दुसऱ्या व्यक्तीशी संगनमत करून ४० कोटी रुपये कमावले आहेत. न्यायालयाने विचारले की, अग्रवाल यांना आरोपी बनवण्यात आले आहे का, तेव्हा राजू यांनी उत्तर दिले की ते फरार आहेत.

यावर खंडपीठाने म्हटले की, ईडीने ४० कोटी रुपये कमावले असा आरोप केला आहे. आता ईडी या व्यक्तीचा कंपनीशी संबंध दाखवू शकत नाही. तो व्यक्ती त्या कंपन्यांचा संचालक आहे का, बहुसंख्य भागधारक आहे का, तो व्यवस्थापकीय संचालक आहे का. काहीतरी असायला हवे, असे न्यायालयाने म्हटले. एस. व्ही. राजू म्हणाले की, एखादी व्यक्ती कंपनी नियंत्रित करू शकते परंतु कंपनीच्या वर्तनासाठी जबाबदार असणे आवश्यक नाही. यावर सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, ईडी निरर्थक आरोप करत आहे. या प्रकरणीची पुढील सुनावणी आता ९ मे रोजी होणार आहे.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने २८ एप्रिल रोजी छत्तीसगड सरकारला फटकारले होते आणि राज्य अधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या मद्य घोटाळ्याच्या प्रकरणात आरोपीला किती काळ तुरुंगात ठेवायचे असा प्रश्न विचारला होता. या प्रकरणात तीन आरोपपत्रे दाखल करण्यात आली आहेत आणि तपास अजूनही सुरू असल्याचे त्यात नमूद करण्यात आले होते.

## सूरतकडं जाणाऱ्या बसचा भीषण...

रस्त्याचं काम लवकरात लवकर करून योग्य उपाययोजना कराव्यात अशी मागणी ग्रामस्थांसह वाहन चालकांनी केली आहे.

धुळे-सूरत राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. यात रस्त्याचं खोलीकरण करणं आणि रूंदीकरणाचं काम सुरू आहे. या महामार्गावरून जात असताना ही एसटी बस सुमारे १० ते १५ फूट खाली घाटातील रस्त्यावर कोसळली. यामुळं घाबरेलेल्या नागरिकांनी आरडाओरड केली. अपघात झाल्यानंतर स्थानिकांनी आणि इतर वाहन चालकांनी बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी मदत केली. अपघाताची माहिती मिळताच विसरवाडी पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

## निवडणुकीसाठी सर्वोच्च आदेश

काळापासून घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सर्व महापालिकांमध्ये प्रशासकांद्वारे कारभार सुरु आहे. मात्र आता कोर्टाच्या या निकालानंतर राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाला सप्टेंबर महिन्यापर्यंत राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. त्यामुळे जवळपास पाच वर्षांपासून रखडलेल्या मुंबई, पुण्यासह विविध महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगर पंचायत निवडणुका घेण्यास हिरवा कंदील मिळाला आहे.

# पेट्रोल-डिझेलच्या उत्पादन शुल्कात वाढ

**नवी दिल्ली :** देशात इंधन दरांबाबत एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात थेट २ रुपयांची वाढ केली आहे. सामान्य नागरिकांमध्ये यामुळे इंधन महागण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र, सरकारने तात्काळ स्पष्ट केले की, या निर्णयाचा थेट परिणाम ग्राहकांवर होणार नाही.

उत्पादन शुल्क हा केंद्र सरकारचा पेट्रोल आणि डिझेलवर लावलेला कर आहे. हा कर इंधनाच्या किंमतीचा मोठा भाग व्यापतो. सध्या पेट्रोलवर १३ रुपये प्रति लिटर आणि डिझेलवर १० रुपये प्रति लिटर उत्पादन शुल्क आहे. २०१४ मध्ये पेट्रोलवर ९.४८ रुपये आणि डिझेलवर ३.५६ रुपये प्रति लिटर शुल्क होते. गेल्या काही वर्षांत या दरात अनेकदा वाढ झाली. उत्पादन शुल्कात वाढ झाली तरी सामान्य माणसाला त्याचा फटका बसणार नाही असे सरकारने जाहीर केले.

**ई-लिलाव अधिसूचना - स्क्रॅप एमएस प्लेट्स आणि स्क्रॅप**
**लार्सन अँड टुब्रो लिमिटेड, तळेगाव, पुणे**
- संकेतस्थळ -
www.auctionindia.com
लिलावाची तारीख 13-05-2025
वेळ : दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत

# पाकमध्ये ४ दिवसांनंतर पाणीबाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात वॉटर स्ट्राईक केला आहे. त्यामुळे पाकचा घसा पाण्याअभावी कोरडा पडणार आहे. पाणी न मिळाल्यामुळे पाकड्यांचे हालहाल होतील. भारताने सिंधू पाणी करार स्थगित केला आहे. त्यानुसार पाकिस्तानकडे जाणारे पाणी रोखून धरले आहे. त्यामुळे पाकिस्तानात चिनाब नदीची पातळी दुसऱ्या दिवशी ७ फूट घसरली असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे पाकिस्तानातील २४ शहरांत, ३ कोटी पाकिस्तानी नागरिक, ४ दिवसांनंतर पाण्याअभावी तहानलेले दिसतील अशी स्थिती आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध केलेल्या वॉटर स्ट्राइकचा परिणाम आता दिसत आहे. भारताने जम्मूच्या रामबन स्थित बगलियार धरणात चिनाब नदीचे पाणी रोखले आहे. त्यामुळे सोमवारी पाकिस्तानच्या सियालकोटमध्ये चिनाब नदीची पाणी पातळी घटून १५ फूट राहिली आहे. रविवारपेक्षा ती ७ फूट आणखी घटली आहे. चिनाब आटत चालल्याने ४ दिवसांनंतर पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील २४ महत्त्वाच्या

## २४ शहरांतील ३ कोटी नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न



शहरांत ३ कोटींहून जास्त नागरिकांना पाण्यासाठी तरसावे लागण्याची चिन्हे आहेत.

या शिवाय फैसलाबाद, मुज्जफरगड चिनीउट, आणि हाफिजाबादसारख्या अधिक लोकसंख्येच्या पाकिस्तानी शहरांत ८०% लोकसंख्या पिण्याच्या पाण्यासाठी चिनाब नदीवर अवलंबून आहे. त्यामुळे या शहरातील लोकांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होणार आहेत हे निश्चित आहे. त्यामुळे जर भारताने पाणी सोडलं नाही तर काय होणार याचाच विचार आता इथले नागरिक करत आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल करार स्थगित केला होता. त्या करारानुसार सिंधू, झेलम, चिनाब, रावी, सतलज आणि बियास नदीच्या पाण्याची पाककडे विभागणी होती. आता या नद्यांचे पाणी भारताने रोखण्याचा निर्णय घेतला आहे.

### पहलगाम दहशतवादी हल्ला

● पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केलं होतं. त्यात २६ पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला होता. तर अनेक पर्यटक हे जखमी झाले होते. गेल्या काही वर्षातील काश्मीरमधला हा सर्वात मोठा हल्ला होता. या हल्ल्यानंतर भारताने ही कडक भूमीका घेत पाकिस्तानची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. सर्वात आधी सिंधू जल कराराला स्थिगिती दिली. त्यानंतर पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले. भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्यात सांगण्यात आले. शिवाय वाघा अटारी बॉर्डरही बंद करण्यात आली. या हल्ल्यानंतर भारताला जग भरातून पाठिंबा मिळत आहे.

### भारताचा वॉटर स्ट्राईक

● भारत सरकारने बगलिहार आणि सजल डॅम पूर्णपणे बंद करीत पाकिस्तानवर वॉटर स्ट्राईक केला आहे. सोमवारी दुपारी काश्मीरच्या रियासी सेक्टरमध्ये चिनाब नदीची पाण्याची पातळी दीड ते दोन फूट खाली पोहोचली. खडकाळ तळ वर दिसू लागला आहे. गुडघ्यापर्यंत पाण्यात जाऊन लोक व्हिडिओ शूट करीत आहेत. सर्वसामान्यांनी पहिल्यांदाच चेनाब नदी पायी चालत पार करीत आहेत. गेल्या कित्येक वर्षात नागरिकांनी चिनाब नदीला अशा अवस्थेत पाहिलं नाही. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर नरेंद्र मोदी सरकारच्या या निर्णयावर जम्मूचे लोक खूश होते आणि याहून मोठ्या कारवाईचे अपेक्षा करीत आहेत. फैसलाबाद, मुज्जफरगड चिनीउट आणि हाफिजाबादसारख्या अधिक लोकसंख्येच्या पाकिस्तानी शहरांत ८०% लोकसंख्या पिण्याच्या पाण्यासाठी चिनाब नदीवर अवलंबून आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल करार रोखला. त्या करारानुसार सिंधू, झेलम, चिनाब, रावी, सतलज आणि बियास नदीच्या पाण्याची पाककडे विभागणी होती.



## पंतप्रधान मोदींनी 'धाडसी निर्णय' घेतले आहेत

**नवी दिल्ली :** माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांनी मंगळवारी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी "धाडसी निर्णय" घेतले आहेत आणि या धोक्याचा अंत करण्यासाठी घेतलेल्या सर्व निर्णयांना त्यांचा आणि त्यांच्या पक्षाचा पाठिंबा आहे. "आपण दहशतवाद्यांना धडा शिकवायला हवा. एखाद्या पंतप्रधानाने इतके धाडसी पाऊल उचलण्याची ही पहिलीच वेळ आहे. कोणत्याही पंतप्रधानांनी लष्कराला इतके सर्वोच्च अधिकार दिलेले नाहीत," असे देवेगौडा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. जनता दल (धर्मनिरपेक्ष) नेत्याने नमूद केले की मोदींनी अनेक उपाययोजना राबवल्या, ज्यात भारतीय सशस्त्र दलांना त्यांच्या प्रतिसादाची पद्धत, लक्ष्ये आणि वेळ निश्चित करण्यासाठी पूर्ण ऑपरेशनल स्वातंत्र्य देणे समाविष्ट आहे.

# भारतीय अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकाची होणार

## आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अहवाल जाहीर

भारत २०२५ मध्ये जपानला पिछाडीवर टाकून जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणार आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) ने जारी केलेल्या वर्ल्ड इकोनॉमिक आऊटलूक एप्रिल २०२५ मधून ही माहिती समोर आली आहे. अहवालात असं म्हटले आहे की, २०२५ मध्ये भारताचा नॉमिनल जीडीपी ४,१८७.०१७ अब्ज डॉलरपर्यंत वाढेल. त्याच वेळी, जपानच्या जीडीपीचा आकार ४,१८६.४३१ अब्ज डॉलरपर्यंत राहण्याचा अंदाज आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत सद्यस्थितीला जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. जीडीपीमध्ये अमेरिका, चीन, जर्मनी आणि जपाय हे देश भारताच्या पुढे आहेत. आयएमएफच्या अंदाजानुसार, भारत येणाऱ्या काही वर्षात जर्मनीला मागे टाकून तिसरी सर्वात मोटी अर्थव्यवस्था बनू शकतो. भारताची अर्थव्यवस्था २०२७ पर्यंत ५ ट्रिलियनचा टप्पा गाठू शकते. यावेळी जीडीपीचा आकार ५०६९.४७ अरब डॉलर असू शकतो. तर २०२८ पर्यंत भारताच्या जीडीपीचा आकार ५,५८४.४७६ अरब डॉलर असू शकतो. तर या काळात जर्मनीच्या जीडीपीचा आकार ५,२५१.९२८ अरब डॉलर राहण्याचा अंदाज आहे. नाणेनिधीच्या अंदाजानुसार, जगातील सर्वात मोठ्या दोन अर्थव्यवस्था अमेरिका आणि चीन येणारी १० वर्षे आपलं स्थान कायम राखतील.

आयएमएफने २०२५ साठी भारताच्या जीडीपी वाढीचा अंदाज ६.२ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. जानेवारीच्या आउटलुक अहवालात याआधी हा आकडा ६.५ टक्के इतका होता. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफ निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे विकास दरात घट झाल्याचे अहवालात म्हटले आहे. भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचे नाणेनिधीच्या रिपोर्टमध्ये सांगण्यात आलं आहे. पुढील दोन वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था एकमेव असेल जी ६ टक्क्यांच्या वेगाने वाढेल.

आयएमएफच्या एप्रिल २०२५ च्या वर्ल्ड इकोनॉमिक आऊटलूकमध्ये जागतिक विकासदर २.८ टक्के कमी राहण्याचा अंदाज आहे. ज्यामध्ये १२७ देशांमध्ये विकासदर घसरून जागतिक जीडीपीच्या ८६ टक्के राहिल, असं नाणेनिधीच्या मुख्य अर्थतज्ज्ञ गीता गोपीनाथ यांनी म्हटलं आहे.

# नक्षलवाद्यांनी उपसरपंचालाच संपवलं



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**छत्तीसगड :** छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यातील बैनपल्ली गावचे उपसरपंच मुचाकी रामा यांची नक्षलवाद्यांनी हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. सुकमा पोलिसांनी या हत्येची माहिती दिली. ही घटना सुकमाच्या बेनपल्ली गावातील आहे. जागरगुंडा पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या या गावात रात्री तीन वाजता नक्षलवाद्यांनी उपसरपंचाची हत्या केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नक्षलवाद्यांना सोमवारी रात्री उशीरा त्यांची हत्या केली.

प्राथमिक तपासानुसार, मध्यरात्री नक्षलवादी बेनपल्ली गावात राहणारे उपसरपंच मुचाकी राम यांच्या घरी गेले. त्यांनी गावकऱ्यांची वेशभूषा केली होती. त्यांनी घराबाहेरून राम यांना आवाज दिला आणि जबरदस्तीने त्याला सोबत घेऊन गेले. पोलिसांनी सांगितलं की, नक्षलवाद्यांनी मुचाकी रामची हत्या केली. घटनेच्या काही वेळावंतर उपसरपंचाचा मृतदेह मिळाला. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. यासोबत संपूर्ण परिसरात अलर्ट जारी करण्यात आलं आहे.

### या वर्षातील नववी हत्या...

● पोलिसांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, नक्षलवाद्यांनी केलेल्या हिंसाचारात गेल्यावर्षी ६८ नागरिकांचा मृत्यू झाला होता. अशात नक्षलवाद संपविण्यासाठी केंद्र सरकारने छत्तीसगढमध्ये ऑपरेशन चालवलं होतं. या ऑपरेशन अंतर्गत अनेक नक्षलवाद्यांनी सरेंडरही केलं आहे.



## खालिदा झिया उपचारानंतर घरी परतल्या

**ढाका :** बांगलादेशच्या आजारी माजी पंतप्रधान खालिदा झिया चार महिन्यांच्या वैद्यकीय उपचारानंतर मंगळवारी लंडनहून घरी परतल्या, त्यांच्या पक्षाच्या नेत्यांनी आशा व्यक्त केली की त्यांच्या उपस्थितीमुळे अंतरिम सरकारद्वारे शासित देशात लोकशाही पुनर्संचयित होण्यास मदत होईल. बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) च्या अध्यक्षा आणि तीन वेळा माजी पंतप्रधान राहिलेल्या झिया ८ जानेवारी रोजी प्रगत वैद्यकीय उपचारांसाठी लंडनला गेल्या आणि त्यांना लंडन क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले. डिस्चार्ज मिळाल्यानंतर, त्या त्यांचा मोठा मुलगा तारिक रहमान यांच्या निवासस्थानी राहायला गेल्या, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. ७९ वर्षीय नेत्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांना लंडनहून घेऊन जाणारी कतारी शाही एअर ॲम्ब्युलन्स ढाक्यातील हजरत शाहजलाल आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरली, जिथे बीएनपीच्या वरिष्ठ नेत्यांनी झिया यांचे स्वागत केले.



## मिझोराममध्ये ३० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त

**आयझॉल :** मिझोरम पोलिसांनी चंफाई जिल्ह्यातील भारत-म्यानमार सीमेजवळ ३०.७२ कोटी रुपयांच्या मेथाम्फेटामाइन गोळ्या जप्त केल्या, असे एका पोलिस अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले. रविवारी संध्याकाळी गस्त घालत असताना, पोलिसांनी वानझाऊ गावाजवळ संशयावरून एक वाहन थांबवले आणि कसून झडती घेतली तेव्हा त्यांना कारमध्ये लपवून ठेवलेल्या २ लाख गोळ्या सापडल्या, ज्याचे वजन २३६ किलो होते, असे त्यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, उत्तेजक औषधाची वाहतूक केल्याबद्दल लालतानपुईया (३०) आणि वनरोपुईया (२७) अशी ओळख पटवण्यात आलेल्या दोघांना अटक करण्यात आली आहे, दोघेही चम्फाईच्या वेंगथर परिसरातील आहेत. म्यानमारमधून तस्करी केल्याचा संशय आहे.

## मनुस्मृतीचा अपमान केल्याबद्दल राहुल बहिष्कृत

**हरिद्वार :** शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी मंगळवारी सांगितले की, मनुस्मृतीचा



अपमान केल्याबद्दल लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना हिंदू धर्मातून बहिष्कृत करण्यात आले आहे. मनुस्मृतीला सनातन धर्माचा पाया असल्याचे वर्णन करताना ते म्हणाले की, राहुल गांधी यांनी लोकसभेत काही संदर्भात त्याचा अपमान केला होता. मनुस्मृतीचा अपमान केल्याबद्दल मठाने जारी केलेल्या नोटीसला उत्तर न दिल्याने किंवा त्याबद्दल माफी न मागितल्याने काँग्रेस नेत्याला हिंदू धर्मातून बहिष्कृत करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## उत्तर प्रदेशची अदानींकडून वीज खरेदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेश सरकार २०३४ पर्यंत राज्याच्या विजेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अदानी पॉवर लिमिटेडकडून १,५०० मेगावॅट वीज खरेदी करणार आहे. राज्य मंत्रिमंडळानं मंगळवारी याबाबतच्या कराराला मंजुरी दिली आहे. उत्तर प्रदेशाचे ऊर्जा मंत्री ए.के. शर्मा यांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमडळाच्या बैठकीतील निर्णयाची माहिती देताना सांगितलं का,सरकारने मंगळवारी स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे २x८०० मेगावॅट (१,६०० मेगावॅट) औष्णिक ऊर्जा प्रकल्पातून १,५०० मेगावॅट वीज खरेदी करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. यासंदर्भात घेण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत अदाणी पॉवर लिमिटेडला यशस्वी बोलीदार घोषित करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. त्याने देऊ केलेला सर्वात कमी दर ५.३८३ रुपये होता. राज्याला वाढत्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी २०३३-३४ पर्यंत १०,७९५ मेगावॅट अतिरिक्त औष्णिक उर्जेची आवश्यकता असेल, असं शर्मा यांनी स्पष्ट केले.

शर्मा याबाबत बोलताना म्हणाले की, अदाणी पॉवर लिमिटेड ही निविदा प्रक्रियेत सर्वात कमी बोली लावणारी कंपनी म्हणून उदयास आली.



**लंडन** लंडनमध्ये युरोपमधील विजय दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सशस्त्र दल आणि माजी सैनिकांच्या परेडमध्ये कॅथरीन, प्रिन्सेस ऑफ वेल्स, प्रिन्सेस चार्लोट, प्रिन्स जॉर्ज, प्रिन्स लुई आणि विल्यम, प्रिन्स ऑफ वेल्स आदी उपस्थित होते.

# खालच्या जातीचा म्हणून टार्गेट केलं..., सुप्रीम कोर्टाचा संताप




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** न्यायव्यवस्थेतील जाती-आधारित भेदभावाचा निषेध करताना, सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी एका वरिष्ठ न्यायिक अधिकाऱ्याला केवळ तो एका मोचीचा मुलगा असल्याने लक्ष्य करण्यावरुन खडेबोल सुनावले . तसेच पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने त्यांना बडतर्फ करण्याचा उच्च न्यायालयाचा प्रशासकीय निर्णय रद्द करून त्यांना पुन्हा सेवेत घेण्याचे निर्देश दिले होते, त्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवले.

माध्यमातील वृत्तानुसार, कथित जाती-आधारित भेदभावाला गांभीर्याने घेत, पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले की 'त्यांना पंजाबमधील न्यायव्यवस्थेतील घडामोडींची माहिती आहे आणि ज्या न्यायिक अधिकाऱ्याचे वडील चांभार आहेत आणि आई मजूर आहेत, त्यांना केवळ कनिष्ठ जातीतील असल्याने लक्ष्य करण्यात आले. हे किती काळ चालू राहील...' असा संतप्त सवालही न्यायमूर्तींनी यावेळी उपस्थित केला.

न्यायमूर्ती कांत आणि एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने प्रेम कुमार यांच्या एसीआरची तपासणी केली. प्रेम कुमार यांची २०१४ मध्ये पंजाबमध्ये अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश म्हणून थेट नियुक्ती झाली होती. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड आणि कामाची देखरेख करणाऱ्या न्यायाधीशांनी चांगली असल्याचे म्हटले आहे. मात्र पुढच्या वर्षी अचानक त्यांची कामगिरी खराब झाली आणि 'संशयास्पद अखंडता' सह ते आणखी खालच्या स्थानावर होते परंतु कामगिरी आणि अखंडता निकषांमध्ये सुधारणा झाली.

प्रेम कुमार यांच्या कामगिरीचे आणि रेकॉर्डचे तपसणी करणे नेहमीचेच झाले होते अशातच एप्रिल २०२२ मध्ये प्रशासकीय बाजूने उच्च न्यायालयाने त्यांच्या सेवा रद्द केल्या. आपल्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी कुमार यांनी रिट याचिकेद्वारे उच्च न्यायालयात आपल्या बडतर्फीला आव्हान दिले. या वर्षी जानेवारीमध्ये उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने रिट याचिका मंजूर केली, ७ मार्च २०२२ रोजी पूर्ण न्यायालयाच्या शिफारशी तसेच २० एप्रिल २०२२ रोजी त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याचा आदेश रद्द केला. उच्च न्यायालयाने खंडपीठाच्या आदेशाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील केले. दरम्यान, अपील फेटाळताना न्यायमूर्ती कांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने म्हटले की "त्यांना केवळ खालच्या जातीचे असल्यामुळे लक्ष्य केले जात आहे. उच्च न्यायालयात ही एक मोठी समस्या आहे.

# उन्हाचा पारा वाढला; प्रवाशांना हवाय निवारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** यंदा उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत चालला असल्याने नागरिकांची लाही लाही झाली आहे. त्यातच ओतूर बसस्थानकात प्रवाशांची संख्या वाढती असल्याने बसस्थानकातील सावली पुरेशी नाही. यामुळे येथे येणाऱ्या प्रवाशांचे हाल होत असून प्रवाशांना निवाऱ्याची नितांत गरज भासत आहे. याचा विचार एस.टी. तथा परिवहन विभागाने करावा आणि येथे तात्काळ उपाययोजना करण्यात यावी अशी आग्रही मागणी केली जात आहे.

ओतूर हे गाव कल्याण अहिल्यानगर महामार्गावर येत असल्याने आणि या महामार्गावरील मोठे बसस्थानक असल्याने येथे प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. सध्याच्या परिस्थितीत उन्हाळ्याच्या झळा असहाय्य असल्यामुळे प्रवाशांना सावली हवीय. मात्र, बसस्थानकातील अपुऱ्या जागेमुळे प्रवाशांना निवाऱ्याविना बसस्थानक परिसरात, भर उन्हात वाहनांची वाट बघत थांबावे लागत असल्याचे दिसून येत आहे. येथे लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना कडक उन्हाचा तडाखा बसून उष्णतेचा त्रास सहन करावा लागत आहे. असहाय्य होत असलेल्या उन्हामुळे काही दुर्घटना देखील घडू शकते, याची जाणीव ठेवून परिवहन विभागाने प्रवाशांची सोय करावी, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.



उन्हातान्हातील प्रवासी...

यंदा उन्हाळ्यात सर्वत्रच वाढत्या तापमानाची नोंद होताना दिसून येत आहे. मात्र, ओतूर येथे प्रवाशांना चटके खात बसची वाट पाहत उभे रहावे लागत आहे.

## पुरंदर तालुक्यात निकाल ८९.४७ टक्के

**जेजुरी :** बारावी बोर्डाचा निकाल नुकताच जाहीर झाला असून उच्च शैक्षणिक दर्जा असणाऱ्या पुरंदर तालुक्याचा बारावीचा निकाल ८९.४७ टक्के लागला आहे. तालुक्यातील १७ विद्यालयातून २३७६ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेस बसले होते. त्यापैकी २१२६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य नंदकुमार सागर यांनी सर्व विद्यार्थी व विद्यालयाचे अभिनंदन केले. पुरंदर तालुक्यातील ज्युनियर कॉलेजचे बारावीचे निकाल पुढील. प्रमाणे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय परिंचे ८५.७१ टक्के, वाघिरे कॉलेज सासवड ९२.४८,कीलाचंद विद्यालय निरा ८२.५०, महर्षी वाल्मिकी विद्यालय वाल्हे ८६.०४, पुरंदर ज्युनियर कॉलेज सासवड ९१.२०, ए.सी हुंडेकरी कॉलेज जेजुरी ७८.४४, डॉ शंकरराव कोलते ज्युनियर कॉलेज पिसरवे ९८.१४, इ एम एस वाघिरे विद्यालय सासवड ९०.४१, केदारेश्वर विद्यालय काळदरी ९६ टक्के, जिजामाता ज्युनियर कॉलेज जेजुरी ९०.६६, रीसे पिसे ज्युनियर कॉलेज रिसे पिसे ८३.३३, शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल सासवड १०० टक्के, म.जोतीराव फुले विद्यालय शिवरी ९०.७४, कन्या विद्यालय नीरा १०० टक्के, वघिरे कॉलेज सासवड व्यावसायिक विभाग ९१.१७, पुरंदर ज्युनियर कॉलेज सासवड व्यावसायिक ६४.०६. पंच क्रोशी तांत्रिक शेतकरी विद्यालय वाघापूर ६७.६४. सर्व यशस्वी विद्यार्थी व विद्यालयाचे पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ,तालुका मुख्याध्यापक संघ,पुणे जिल्हा व तालुका शिक्षक संघाच्या वतीने तसेच राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त माजी मुख्याध्यापक कुंडलिक मेमाणे यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

## अन्यथा दौंड नपात कचरा टाकणार; शरद पवार गटाचा इशारा

**दौंड :** दौंड शहरात जागोजागी पडलेला कचरा नगरपालिकेने येत्या दोन दिवसात उचलला नाही, तर शहरातील सर्व कचरा हा दौंड नगरपालिकेसमोर किंवा नगरपालिका कार्यालयात आणून टाकला जाईल अशा आशयाचे निवेदन दौंड शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट व काँग्रेस सरचिटणीस प्रकाश सोनवणे, हरेश ओझा, शिवसेना उभाठा गटाचे दोन शहराध्यक्ष आनंद पळसे यांनी दौंड नगरपालिकेला लेखी निवेदनाद्वारे दिला आहे दौंड शहरात कचऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस गहन होत चालला असून, नगरपालिका प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही नगरपालिकेतील या विभागातील अधिकारी मुजोर आहेत. त्यांना अनेकदा सांगितले, तरी शहरातील अनेक ठिकाणचा कचरा वेळच्यावेळी उचलला जात नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरलेली असते. या कचऱ्यावर मोकाट जनावर देखील असतात. परंतु सुस्त पडलेल्या नगरपालिका प्रशासनापुढे सध्या कोणाचेच काही चालेना असे झाले आहे. याविषयी काही तक्रार करण्यास नागरिक जातात, तेव्हा संबंधित विभागाचे कर्मचारी हे जागेवर नसतात. सध्या दौंड नगरपालिकेला मुख्य अधिकारी पूर्णवेळ नसल्याने, तात्पुरता कार्यभार सासवडचे मुख्य अधिकारी यांच्याकडे आहे. परंतु ते आठवड्यातून एकदा किंवा दोनदा येत असतात, त्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. दौंड नगरपालिकेतील कर्मचारी केव्हा येतात, केव्हाही जातात. विशेषतः पुण्याहून ये-जा करणारे कर्मचारी दुपारी तीन नंतर कार्यालयातून गेलेले दिसून येतात. याबाबत त्यांना मागील आठवड्यात सर्वांना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सूचना केल्या होत्या. तथापि, या मुजोर कर्मचाऱ्यांसमोर सध्या कोणाचेच काही चालेनासे झाले आहे.

## लवथळेश्वर पतसंस्थेच्या चेअरमन पदी रमेश लेंडे

**जेजुरी :** श्री क्षेत्र जेजुरी येथील लवथळेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी जेजुरी शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष रमेश वसंतराव लेंडे यांची तर व्हाईस चेअरमन पदी सामाजिक कार्यकर्ते संभाजी श्रीरंग पवार यांची पाच वर्षासाठी बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अमरीन बागवान मॅडम यांनी काम पाहिले नविन संचालकपदी राहुल घाडगे, राजेंद्र जावळेकर, प्रल्हाद गिरमे, प्रकाश बुधे, संजय सोनवले, श्रीकांत दिडभाई, अनिल लेंडे, महेश खोलपे, मोहन तांबडे,सौ. कल्पना क्षिरसागर,सौ निता लेंडे आदिंची निवड करण्यात आली. या निवडणुक प्रक्रियेसाठी निवडणूक अधिकारी बागवान मॅडम यांना घनश्याम सोनवले, चंद्रकांत नेवसे, स्वरजंली पवार यांनी मदत केली. निवडीनंतर चेअरमन व व्हा. चेअरमन यांनी सर्व सामान्य नागरिकांचा आर्थिक स्थर उंचावण्यासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.



# श्री शिवाजी शिक्षण संस्थेची बारावीत उत्तुंग कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** शिक्षणमहर्षी चंदूकाका जगताप यांनी स्थापन केलेल्या सासवड येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध उच्च माध्यमिक विद्यालयांनी इयत्ता बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केले आहे. संस्थेचा सरासरी निकाल तब्बल ९३.४७ टक्के लागला असून, संस्थेने नेहमीप्रमाणेच गुणवत्तापूर्ण निकालाची परंपरा कायम राखली आहे.

यंदा विज्ञान शाखेतील सर्व म्हणजेच १०० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, तर वाणिज्य शाखेचा निकाल ९० टक्के आणि कला शाखेचा निकाल ८१.१३ टक्के लागला आहे. संस्थेच्या एकूण ४१४ विद्यार्थ्यांपैकी ३८७ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. विशेष म्हणजे यावर्षीच्या निकालातही मुलींनीच बाजी मारली आहे.

विविध विद्यालयांमधील निकालाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे: विज्ञान शाखा: जिजामाता हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, जेजुरी आणि शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवड - १०० टक्के निकाल. वाणिज्य शाखा: जिजामाता ज्युनिअर कॉलेज, जेजुरी - ९० टक्के निकाल. कला शाखा: जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर







कॉलेज, जेजुरी - ७२.१३ टक्के निकाल. रिसे पिसे माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, रिसे - ८३.३३ टक्के निकाल. श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी - ९६ टक्के निकाल.

संस्थेतील विविध शाखांमधील प्रथम तीन क्रमांक पटकावणारे विद्यार्थी, त्यांचे गुण आणि विद्यालयाचे नाव खालीलप्रमाणे आहे: विज्ञान विभाग: श्रावणी किशोर काकडे - ८१ टक्के - शिवाजी इंग्लिश मीडियम, सासवड. श्रावणी उमेश जगताप - ७९.३३ टक्के - शिवाजी इंग्लिश मीडियम, सासवड. स्नेहल धनेश दळवी - ७७.३३ टक्के - शिवाजी इंग्लिश मीडियम, सासवड. वाणिज्य शाखा: प्रज्ञा रोहिदास घोरपडे - ७६.३३ टक्के - जिजामाता ज्युनिअर कॉलेज, जेजुरी. कविता मोहन माने - ६८.८३ टक्के - जिजामाता ज्युनिअर कॉलेज, जेजुरी. स्वराज सुनिल कुल - ६७.६७ टक्के - जिजामाता ज्युनिअर कॉलेज, जेजुरी. कला शाखा: श्रेया अरूण कुंभारकर - ८१.३७ टक्के - रिसे पिसे माध्यमिक विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज, रिसे. कोमल भगवान धनावडे - ७५.५० टक्के - श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी. सायली भिमराव पवार - ७४.६७ टक्के - जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी.

या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सनदी अधिकारी व विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, सचिव आणि पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप, विश्वस्त डॉ. अस्मिता जगताप, राजवर्धिनी जगताप, सहसचिव डी. एन. गवळी, व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे, विद्या समितीचे सचिव रवींद्रपंत जगताप यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, प्राचार्य, शिक्षक आणि पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांची ओळख: श्रावणी काकडे - विज्ञान विभाग प्रथम, प्रज्ञा घोरपडे - वाणिज्य विभाग प्रथम, श्रेया कुंभारकर - कला विभाग प्रथम.

## १९०० लाभार्थींना जात प्रमाणपत्रांचे वितरण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाल्हे :** महाराष्ट्र शासन जिल्हाधिकारी कार्यालय - पुणे महसूल विभाग - यांच्या १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम उपक्रम अंतर्गत आज फर्ग्युसन महाविद्यालयात आयोजित भव्य समारंभात चंद्रशेखरजी बावनकुळे महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते भटके - विमुक्त जाती जमातींच्या जवळपास ११०० लाभार्थींना जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

पालांवर, तांड्यावर राहणारे आणि समाज सुधारक प्रवाहापासून वंचित असलेल्या भटक्या विमुक्त अशा जाती - जमातींमधील लोकांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी जात प्रमाणपत्र आवश्यक असून या साठी शासकीय कॅम्पस आयोजित करून अशा लाभार्थींना जात प्रमाणपत्र मिळवुन देण्यासाठी भटके विमुक्त विकास परिषद द्वारा विशेष प्रयत्न सुरु आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयांकडे यादी करुन दिल्यानंतर अशा लाभार्थींना जागेवर जात प्रमाणपत्र मिळत आहेत. आपल्या ओतारी समाजातील ज्यांना जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी अडचण येत आहे.

अशा परिवारानी आपापल्या जिल्हा ओतारी समाज कार्यकारिणींकडे कागदपत्रांसह माहिती दिल्यास जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रयत्न करता येतील.


आज पुणे येथे झालेल्या या समारंभा करीता ओतारी समाज कार्यकर्ते सदानंद ओतारी (सल्लागार समिती जेष्ठ सदस्य), सुनिल ओतारी (सदस्य), चारुदत्त ओतारी (पुणे जिल्हा सचिव), श्वेता दत्तात्रय ओतारी (सामाजिक कार्यकर्ती), संजय खेडवन (जेष्ठ कार्यकर्ते), मुकेश वांद्रे (अध्यक्ष - ओतारी समाज संघ - महाराष्ट्र तथा सदस्य भ.वि.विकास परिषद - महाराष्ट्र), श्वेता सुहास ओतारी (अध्यक्षा जाणीव महिला संघटना तथा सदस्य पथ विक्रेता समिती सदस्य सासवड नगरपरिषद) आदी उपस्थित होते.

## मांदळेवाडीमधे जय हनुमान यात्रा उत्सव उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** मांदळेवाडी (ता.आंबेगाव ) येथे जय हनुमान यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.सदर उत्सवामध्ये बैलगाडा शर्यत व मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २ मे व ३ मे रोजी भव्य बैलगाडा शर्यती संपन्न झाल्या. शनिवारी रात्री नृत्यांगना सायली पाटील यांचा मनोरंजनाचा कार्यक्रम, तर रविवारी भिका भीमा सांगवीकर यांचा लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम झाला.

दोन दिवस आयोजित केलेल्या भव्य बैलगाडा शर्यतीमध्ये एकूण ३२५ बैलगाडे धावले. त्यामध्ये दोन दिवसात सर्वात आतून आलेली बारी कै.फक्कडराव मार्तंडराव शिंदे (कान्हूर मेसाई ) यांच्या बैलगाड्याने घाटाचा महाराजा होण्याचा मान मिळवत दुचाकी पटकावली. दुर्योधनदादा दगडू शिंगाडे ( शिंगाडवाडी ) यांच्या गाड्याला घाटाचा राजा हा बहुमान मिळाला. प्रथम क्रमांकात एकूण ४३ गाडे आले तर प्रथम क्रमांक फळीफोड पहिला दिवस विलास वसंत नाणेकर हे ठरले, तर दुसरा दिवस संतोष मधुकर गावडे हे ठरले. द्वितीय क्रमांक एकूण १०५ गाडे आले तर द्वितीय क्रमांक फळीफोड पहिला दिवस देवांश गणेश जाधव तर दुसरा दिवस सदाशिव महादू पानसरे हे ठरले. तृतीय क्रमांकात एकूण ७७ गाडे आले तर तृतीय क्रमांक फळीफोड पहिला दिवस शहाजी सुदाम काशीद तर दुसरा दिवस बाळासाहेब नानाभाऊ खैरे हे ठरले. चतुर्थ क्रमांक एकूण ३८ गाडे आले तर चतुर्थ क्रमांक फळीफोड पहिला दिवस कै.गुलाबराव बाळाजी पुंडे तर दुसरा दिवस शौर्य कुमार स्वप्निल गावडे हे ठरले.



# पालखी सोहळ्याचा उरुळी कांचनला विसावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** अखेर यावर्षी जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळा उरुळी कांचन (ता. हवेली) येथे दुपारच्या विसाव्यासाठी थांबणार आहे. पालखी सोहळा उरुळी कांचन विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या मोकळ्या जागेत विसाव्यासाठी तब्बल एक तासासाठी थांबणार आहे अशी माहिती उरुळी कांचनचे सरपंच अमित (बाबा) कांचन यांनी दिली. मागील वर्षी पालखी सोहळा उरुळी कांचन ग्रामस्थ, पालखी सोहळा प्रमुख आणि विश्वस्त यांच्यामधील वादाने उरुळी कांचन येथे थांबला नव्हता. या पार्श्वभूमीवर ही बाब सर्व ग्रामस्थ, भाविक, वारकरी आणि एकूणच वारकरी संप्रदायाच्या भावनेशी निगडित होती. त्यामुळे पालखी सोहळा विषयाला थांबणार या बातमीने उरुळी कांचन परिसरात आनंदाचे वातावरण झाले आहे.

जगद्गुरु संत श्रेष्ठ संत तुकाराम महाराज पालखी सोहळा नियोजन संदर्भातील बैठक श्रीक्षेत्र देहू येथील विश्वस्त, पालखी सोहळा प्रमुखांच्या उपस्थितीत नुकतीच पार पडली. या बैठकीत पालखी सोहळ्याचे विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख यांच्याशी उरुळी कांचनचे सरपंच अमितबाबा कांचन व ज्येष्ठ नेते के.डी.कांचन यांच्यासह अन्य मान्यवरांची सकारात्मक चर्चा घडून आली व त्यामध्ये मागील वर्षी न झालेला पालखीचा विसावा, यावर्षी घेण्यास मान्यता दिल्याची माहिती या चर्चेतून समोर आली. हा पालखी सोहळा उरुळी कांचन विविध कार्यकारी सेवा सोसायटी च्या मोकळ्या जागेत तब्बल एक तासासाठी विसाव्यासाठी थांबणार असल्याचे पालखी सोहळा प्रमुख यांनी जाहीर केले.

यावेळी सरपंच अमित कांचन यांनी संस्थानचे नवनिर्वाचित अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांचा उरुळी कांचन ग्रामस्थांच्या वतीने सत्कार केला. यावेळी हवेलीचे ज्येष्ठ नेते के.डी. कांचन, माजी उपसरपंच भाऊसाहेब तुपे, दीपक कांचन, सुरेश कांचन, माऊली तांबे,



तुकाराम कांचन, अभिषेक कांचन, सागर पांगारे, नारायण कांचन आदी मान्यवर उपस्थित होते. वारकरी सांप्रदायाच्या वैष्णवांचा हा मेळा गेल्या ३४० वर्षांपासून देहू ते पंढरपूर असा चालवला जातो, तो मार्गस्थ होत असताना वेगवेगळ्या गावातून, वाड्या वस्त्यांतून रस्त्याने जात असतो, या मार्गातील वैष्णवाला तुकाराम महाराजांबरोबर विठ्ठलाच्या दर्शनाचा लाभ घेता येतो.

दरम्यान, मागील वर्षी उरुळी कांचन येथे पालखी सोहळा परंपरेनुसार गावातून न्यावा असा आग्रह गावकऱ्यांनी धरला होता पण तत्कालीन पालखी सोहळा प्रमुख यांनी ते न ऐकता आम्ही रस्त्यावर थांबू गावात येणार नाही अशी भूमिका घेतली, त्यामुळे पालखी सोहळा उरुळी कांचन येथे पोहचल्यानंतर ग्रामस्थांनी महामार्गावरच थांबून पालखी सोहळ्याचा नगारा अडविला. दुपारचा विसावा हा परंपरेनुसार ग्रामदैवत काळभैरवनाथ मंदिरात करावा, अशी विनंती पालखी सोहळ्याच्या प्रमुखांना ग्रामस्थांनी केली. पण ती विनंती न ऐकल्याने ग्रामस्थ व पालखी सोहळा विश्वस्त यांच्यामध्ये वाद झाला होता. उरुळी कांचन ग्रामस्थ पालखी गावात नेण्यासाठी आक्रमक होते. तेव्हा महसूल व पोलीस प्रशासन पालखी सोहळ्याच्या बाजूने राहून त्यांनी पालखी सोहळा ठरलेल्या वेळापत्रकानुसार उरुळी कांचन येथील विसाव्याला न थांबता थेट यवतच्या दिशेने मार्गस्थ करत, ग्रामस्थ व पालखी सोहळा प्रमुख यांच्यातील वादामध्ये ६० वर्षाची परंपरा मोडीत काढली होती. दरम्यान, सरपंच अमित कांचन व ग्रामस्थांच्या मध्यस्थीने पुन्हा एकदा पालखीचा विसावा उरुळी कांचन येथे होणार आहे. त्यामुळे अमित कांचन यांचे व पदाधिकाऱ्यांचे परिसरातून कौतुक केले जात आहे.



## सातवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला दिला स्मार्ट टीव्ही

**खेड :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडाचीवाडी, ता.खेड येथील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला २५ हजार रुपये किमतीचा गुगल स्मार्ट टीव्ही भेट दिला. विद्यार्थ्यांचा नुकताच सदिच्छा समारंभ पार पडला. यावेळी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजय घाडगे, मुख्याध्यापक संजय राळे, वर्गशिक्षिका वैशाली शिंदे आणि इतर सर्व शिक्षकांसोबतच विद्यार्थी हजर होते. विद्यार्थ्यांनी वर्गणीतून आणि साचवलेल्या पैशातून आपली आठवण म्हणून शाळेची महत्त्वाची गरज असलेला सुमारे पंचवीस हजार रुपये किमतीचा गुगल स्मार्ट टीव्ही शाळेसाठी भेट दिला. मुलांच्या या कृतीचे मुख्याध्यापक संजय राळे , पालक,ग्रामस्थ अशा सर्वांनी कौतुक केले.

## बारामतीतील उद्योजकांसाठी दिल्ली अभ्यास दौरा

**बारामती :** बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या वतीने बारामती परिसरातील उद्योजकांसाठी नवी दिल्लीत यशोभूमी कन्व्हेन्शन सेंटर येथे इंडिया मशीन टूल्स शो हे भव्य औद्योगिक मशिनरी प्रदर्शन पाहण्यासाठी १३ ते १७ मे दरम्यान अभ्यास दौरा आयोजित करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष धनंजय जामदार यांनी दिली. राजधानी दिल्लीत देश विदेशातील अत्याधुनिक मशीनरीचे उत्पादक त्यांचे विविध उत्पादने वेळोवेळी प्रदर्शित करत असतात. आत्ताच्या इंडिया मशीन टूल्स शो प्रदर्शनामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित केलेल्या नाविन्यपूर्ण लहान मोठ्या मशिनरी एकाच ठिकाणी पाहण्याची संधी उद्योजकांना उपलब्ध झाली आहे. देशातील नामांकित मशिनरो उत्पादकां बरोबरच परदेशी कंपन्या देखील यात सहभागी होणार असल्याने जागतिक दर्जाच्या यंत्रसामग्री उद्योजकांना पाहण्यास मिळणार आहेत. स्टार्टअप नवीन उद्योजक व प्रस्थापित उद्योजकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मशिनरीचे उत्पादन प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्याची उत्तम संधी या अभ्यास दौऱ्याच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. या दिल्ली अभ्यास दौऱ्यात सहभागी व्हायचे असल्यास बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनचे खजिनदार अंबिरशाह शेख वकील यांच्याशी संपर्क साधून नाव नोंदवण्याचे आवाहन अध्यक्ष धनंजय जामदार यांनी केले आहे.

## आंबेगाव तालुक्याचा बारावीचा निकाल ९५.६६ टक्के

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यात या वर्षीचा लागलेला बारावीचा निकाल ९५.६६ टक्के कला, वाणिज्य, विज्ञान या तिन्ही शाखा मिळून २३८९ विद्यार्थी पैकी २३७४ विद्यार्थी परीक्षेत बसले होते.त्यातील २२७१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. आंबेगाव तालुक्यात १०० टक्के निकाल लागलेली विद्यालये - श्री शिवाजी विद्यालय धामणी, हुतात्मा बाबू गेनू विद्यालय महाळुंगे पडवळ, श्री पंढरीनाथ विद्यालय पोखरी, शासकीय आश्रम शाळा गोहे बुद्रुक, विद्या विकास मंदीर विद्यालय अवसरी बुद्रुक, श्री भैरवनाथ विद्यालय शिंगवे, डेक्कन मराठा विद्यालय लांडेवाडी. इतर महाविद्यालयांचा निकाल - अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर (९४.२५ टक्के), महात्मा गांधी कनिष्ठ विद्यालय ९८.६९ टक्के, जनता विद्यामंदिर घोडेगाव ९४.३५ टक्के, श्री भैरवनाथ उच्च माध्यमिक विद्यालय अवसरी खुर्द ८५.७१ टक्के, नरसिंह विद्यालय रांजणी वाणिज्य शाखा ८१.८१ टक्के, श्री टी.एस बोऱ्हाडे विद्यालय शिरोली ९८.२४ टक्के, पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय निरगुडसर ९५.८३ टक्के, श्रीमान निवृत्ती शेठ पवळे विद्यालय पेठ ८६.१५ टक्के.

## खेड तालुक्यातील बारावीचा निकाल ९३.९७ टक्के

**खेड :** महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ (बारावी) परीक्षेत खेड तालुक्याचा निकाल ९३.९७ टक्के इतका लागला. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही मुलींनीच बाजी मारली. तालुक्यातील फक्त ५ शाळांचे निकाल १०० टक्के लागले आहेत. खेड तालुक्यातील बारावीच्या परीक्षेस जुनियर कॉलेजचे ४ हजार ८३१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते यापैकी ४ हजार ५४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. खेड तालुक्यातील शाळांचा शेकडा निकाल पुढीलप्रमाणे- हुतात्मा राजगुरु महाविद्यालय (राजगुरुनगर)- ९६. १३. टक्के, कर्मवीर भाऊराव पाटील ज्युनियर कॉलेज,(वाडा)-९२. ४५ टक्के, सिताबाई पाटोळे ज्युनियर कॉलेज (चाकण)-९७.२७ टक्के, संत ज्ञानेश्वर विद्यालय ज्युनियर कॉलेज (आळंदी)- ९६. ५९ टक्के, म.फ.गायकवाड विद्यालय ज्युनियर कॉलेज (दावडी)- ७३. ०७ टक्के, सुभाष माध्यमिक व ज्युनियर कॉलेज (बहुळ) ८५. ७१ टक्के, रामभाऊ म्हाळगी विद्यालय ज्युनियर कॉलेज (कडूस)-७८. ५७ टक्के, नविन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (मरकळ) -९९.५५ टक्के, शिवाजी विद्यालय (डेहणे)- ६२.१९ टक्के, रामचंद्र पाटील औटी उच्च माध्यमिक विद्यालय (आळंदी) - ७० टक्के, आर्टस, कॉमर्स ज्युनिअर कॉलेज (पाईट)-९२.०९ टक्के, महात्मा गांधी विद्यालय व ज्युनियर कॉलेज (राजगुरुनगर) - १०० टक्के, नवचैतन्य उच्च माध्यमिक विद्यालय (काळूस)- ९१.०७ टक्के. श्री भामचंद्र विद्यालय (भांबोली)- ९६.६६ टक्के, उच्च माध्यमिक विद्यालय (वाशेरे) - ९३. १० टक्के, नवमेश विद्यालय (चाकण)- ४५.४५ टक्के, श्री समर्थ माध्यमिक विद्यालय (चिंबळी)- ९८. ८९ टक्के.

# 'ज्ञानेश्वरी'च्या छपाईस 1 कोटीचा निधी

## पवना - इंद्रायणी नदीचे जलप्रदूषण रोखणार, मंत्री उदय सामंत यांची घोषणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे संत साहित्य अर्थात ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सर्वांना सहज अल्पदरात उपलब्ध व्हावी. यासाठी आळंदी देवस्थानला ग्रंथराज ज्ञानेश्वरी छपाईस १ कोटी रुपयांचा निधी तात्काळ उपलब्ध करून देणार असल्याची घोषणा राज्याचे मराठी भाषा व उद्योग मंत्री उदयजी सामंत यांनी आळंदी येथे केली.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आणि आळंदी ग्रामस्थ आयोजित श्री संत ज्ञानेश्वर महाराज ७५० व्या जन्मोत्सवी वर्षा निमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा अंतर्गत कीर्तन महोत्सवास उद्योग मंत्री उदयजी सामंत यांनी भेट देऊन आळंदी मंदिरात श्रींचे दर्शन घेतले. या निमित्त आयोजित कीर्तना नंतर ते मार्गदर्शन करताना बोलत होते. श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मत्सवाच्या तिसऱ्या दिवशी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण मोठ्या भक्तिमय उत्साहात झाले. पहिल्या सत्रातील कीर्तनात ह.भ.प. भागवत महाराज शिरवळकर यांच्या हृदयस्पर्शी अमृतवाणीने कीर्तन सेवा रुजू झाली. यावेळी भाविकांना कीर्तन श्रवणाची पर्वणी लाभली.

मराठी भाषा व उद्योग मंत्री उदय सामंतजी यांनी वारकरी संप्रदायाचे जिव्हाळ्याचा इंद्रायणी नदी प्रदूषित झालेला विषयावर त्यांनी संवाद साधत भाविक, नागरिकांना आश्वस्त केले. ते म्हणाले, इंद्रायणी आणि पवना नदीच्या जल शुद्धीकरण प्रकल्पास गती देण्याचे काम झालेले आहे. उद्योग विभागाचे माध्यमातून पुढील वर्षभरात पवना, इंद्रायणी नदीचे जलप्रदूषण रोखण्यास उपाय योजना करण्यात येतील. यासाठी उद्योगांचे सहकार्य घेतले जाईल.

शासनाचे माध्यमातून ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी छपाईसाठी १ कोटी रुपये देण्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. संत साहित्य घराघरात पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातील. मराठी भाषा मंत्री उदयजी सामंत यांनी आळंदी मंदिरासह अखंड हरिनाम सप्ताहात भेट देऊन श्रींचे दर्शन घेतले. आळंदी मंदिरात तसेच सप्ताहात देवस्थान व आळंदी ग्रामस्थ यांचे वतीने त्यांना सन्मान करण्यात आला. पवना आणि इंद्रायणी नदी जलप्रदूषण मुक्त करण्यासाठी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी जबाबदारी घेतली. इंद्रायणी नदी उद्योग खात्याचे माध्यमातून प्रदूषण मुक्त करण्यास गती देण्यात येईल यासाठी निविदा प्रक्रिया राबवून कामकाज सुरू केले जाईल. श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या. जन्मोत्सवी वर्षानिमित्त पुढील वर्षात ७५१ व्या जन्मोत्सवी वर्षात राज्यातील सर्व जिल्ह्यात कीर्तन महोत्सव सुरू केला जाईल. यात वारकरी संप्रदायाचे देखील सहकार्य घेतले जाईल. असे सांगत वारकरी संप्रदायाशी मार्गदर्शन करताना त्यांनी संवाद साधला.

यावेळी आळंद देवस्थानचे पदाधिकारी यांनी ज्ञानभूमी प्रकल्पाची माहिती दिली. सुमारे ४५० एकर जागेत साकारणारा हा प्रकल्प अनेक अर्थांनी नाविन्यपूर्ण असून, वारकऱ्यांसाठी तो अत्यंत उपयुक्त ठरेल, असे मत मंत्री सामंत यांनी व्यक्त केले. आळंदी देवस्थानच्या ज्ञानभूमी प्रकल्पास शासना कडून निधी देण्यास पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुढील वर्षी ७५१ व्या जन्मोत्सव वर्षाच्या निमित्ताने वारकरी आणि शासन सुसंवाद ठेवेल. त्याच प्रमाणे या माध्यमातून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कीर्तन महोत्सव आयोजित करील अशी ग्वाही त्यांनी दिली. दिवसभरातील कार्यक्रमात भागवत महाराज शिरवळकर यांची सुश्राव्य कीर्तन सेवा, यशोधन महाराज साखरे यांची प्रवचन सेवा,जयवंत महाराज यांचे कीर्तन तसेच महादेव शहाबाजकार यांची संगीत भजन सेवा भाविकांची दाद देऊन गेली. अखंड हरिनाम सप्तहास राज्यातून हजारो भाविक आळंदीत आले असून आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, आळंदी ग्रामस्थ यांचे माध्यमातून भाविकांना विविध सेवा सुविधा देण्यात आल्या आहेत. कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याची दक्षता घेण्याचे सूचना मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी प्रशासनास दिल्या आहेत.

# नागरिकांना प्यायला पाणी नाही घरात

## राजगुरुनगर नगरपरिषदेच्या पाणी योजनेची गळती तहसीलच्या दारात.!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**खेड :** नागरिकांना घरात नळाला पाणी येत नाही.याउलट भर उन्हाळ्यात रस्त्यांवर पाणी, पाण्याची डबकी साचल्याचे चित्र राजगुरुनगर नगरपरिषदेच्या हद्दीत अनेक ठिकाणी पाहायला मिळते. नागरिकांना रोज याचा त्रास सहन करावा लागतो. यावरून विशेष बैठक घेऊन उपाययोजना करण्याच्या चर्चा होतात, त्यावर अधिकारी सूचनाही देतात.

मात्र फरक पडत नसल्याने शहरातील नागरिक तसेच विविध कामासाठी बाहेरगावाहून येणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत. गेले काही दिवस नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेतील पाईप लाईन फुटल्याने जिल्हा सत्र न्यायालय परिसरात, तहसील कार्यालय आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय यांच्या प्रवेशद्वारावरच पाण्याची डबकी साचल्याचे चित्र दिसून येत आहे.

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने तहसील कार्यालयात बैठक झाली. आमदार बाबाजी काळे,प्रांताधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या सह नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अंबादास गरकळ हे उपस्थित होते. यावेळी राजगुरुनगर नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा यंत्रणेबाबत सर्वात जास्त वेळ चर्चा झाली. त्यात नवीन योजना कार्यान्वित करणे, गळती द्वारे पाण्याचा अपव्यय रोखणे, करवाढ स्थगिती यावर चर्चा झाली. मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी यावेळी जबाबदारीने कामे पूर्ण करण्यात येतील असे सांगितले. मात्र पुढच्या दोनच दिवसांत तहसील कार्यालयाच्या दारातच पाणी आले. नगरपरिषदेचे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी संजय पवार यांना याबाबत माहिती दिली असता त्यांनी येथील गळती तातडीने काढण्यात येईल असे सांगितले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची चाळीस गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी अस्तित्वात असलेली १८ कोटी रुपयांची योजना सन २०१४ मध्ये नगरपरिषदेकडे वर्ग केली. विस्तारित कामांसाठी शासनाने वारंवार निधी दिला. चासकमान धरणाच्या पाण्यावर आधारित असलेल्या या योजनेच्या पाण्याची नागरिकांना अद्याप प्रतिक्षाच आहे.गेल्या अकरा वर्षांपासून नागरिकांना स्वच्छ पाणी मिळण्याची आस लागली आहे.

### अंघोळीला एकच बादली पाणी मिळते?

● महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने तहसील कार्यालयात गप्पा रंगल्या. त्यावेळी राजगुरुनगर नगरपरिषदेच्या पाणी योजनेवर अनेकांनी आक्षेप नोंदवला. नागरीकांना रोजच्या रोज प्यायचे पाणी विकत घ्यावे लागते. बंधाऱ्यात मुबलक पाणी आहे. तरीही वापराचे पाणी मिळत नाही. यावर एका जबाबदार अधिकाऱ्यांनी ' माझ्या घरी मला एकाच बादलीत अंघोळ करायला सांगितले जाते ' असे सांगुन हास्याचे फवारे उडवून दिले.महत्वाच्या अधिकाऱ्यांच्या घरी ही अवस्था असेल तर सामान्य नागरिकांची दखल नगरपरिषद कशी आणि कधी घेणार? असा प्रश्न उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांना पडला.

# नागरी वस्तीत रानगवे आल्याने खळबळ

● आपल्या भागात आलेले गवे रात्रीत जागा बदलत असून सध्या वनविभाग या रानगव्यांवर लक्ष ठेवून आहे. मात्र, नागरिकांनी



त्यांना त्रास देऊ नये अथवा डिवचू नये, सदर घटनेबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिलेली असून नागरिकांनी वनविभागाला सहकार्य करावे असे आवाहन शिरुर वन परिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी केले आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यातील गणेगाव दुमाला परिसरात मागील आठवड्यात दोन रानगवे निदर्शनास आल्याने खळबळ उडालेली असताना आता ते दोन्ही रानगवे सणसवाडी परिसरात आल्याने यापूर्वी कधीही वास्तव्य नसलेल्या रानगव्याचे दर्शन झाल्याने खळबळ उडाली असून वनविभागाकडून नागरिकांना खबरदारीचे आवाहन करण्यात आले आहे.

सणसवाडी, ता. शिरुर येथे सकाळच्या सुमारास दोन भलेमोठे रानगवे नागरी वस्ती जवळ फिरत असल्याचे दिसून आले, दरम्यान काही नागरिकांनी त्यांचे व्हिडिओ सोशल मिडियावर प्रसारित करताच त्या भगत नागरिकांची गर्दी होऊ लागली, याबाबतची माहिती शिरुर वन परिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांना मिळताच वनपाल गौरी हिंगणे, वनमजूर आनंदा हरगुडे, वनविभाग रेस्क्यु टीम मेंबर व निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख, अमोल कुसाळकर, शुभम वाघ, नेचर गार्ड ऑर्गनायझेशन संस्थेचे अध्यक्ष गणेश टिळेकर, सचिव शुभांगी टिळेकर, बाळासाहेब मोरे यांनी सदर ठिकाणी धाव घेत नागरिकांना योग्य सूचना करत सदर प्राण्यांपासून लांब राहण्याच्या सूचना केल्या आहे, यावेळी बाजार समितीचे माजी सभापती अनिल भुजबळ, सणसवाडीचे उपसरपंच राजू दरेकर, सागर दरेकर, माजी ग्रामपंचायत सदस्य अनिल दरेकर, अमोल दरेकर, उद्योजक अक्षय भुजबळ यांसह आदी उपस्थित होते, तर वनविभागाच्या माहितीनुसार गव्यांच्या कळपातून दोन रानगवे वाट चुकून विखुरल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## आळंदी देवस्थानच्या ज्ञानभूमी प्रकल्पास प्राधान्य देणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आळंदी सप्ताहास विशेष भेट दिली. त्यांनी ज्ञानभूमी प्रकल्पाच्या प्रगतीबाबत आढावा घेत या प्रकल्पाला प्राधान्याने गती देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

या भेटीदरम्यान, मंत्री बावनकुळे यांनी आळंदी देवस्थान समितीच्या विश्वस्त मंडळा संमवेत प्रकल्पाच्या विविध पैलूंवर चर्चा केली. सुमारे ४५० एकरवर जागेत साकारणाऱ्या या प्रकल्पाची माहिती जाणून घेतल्यानंतर, त्यांनी या प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, "ज्ञानभूमी प्रकल्प केवळ वारकऱ्यांसाठीच नव्हे, तर राज्याच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक विकासास महत्त्वाचा आहे. हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यास शासनाचे पूर्ण सहकार्य मिळेल. प्रकल्पाच्या प्रगतीसाठी आवश्यक असणारी सर्व मदत शासन स्तरावरून केली जाईल.

प्रकल्पाच्या माध्यमातून वारकऱ्यांसाठी आधुनिक सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून आळंदीच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वैभवात भर पडेल असे त्यांनी सांगितले. माऊलींच्या ७५० व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रभर मोठे कार्यक्रम, उपक्रम, उत्सव व्हावे यासाठी शासन स्तरावर शासन निर्णय घेतला जाईल. या बाबतची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उत्सवात भूमिका स्पष्ठ करतील.



# दुष्काळी शिक्का पुसणार पहाडदरा गाव...



मेंगडेवाडी (ता. आंबेगाव) येथे पहाडदरा शेतकऱ्यांच्या पाईप लाईनचे भूमीपूजन करताना ग्रामस्थ शेतकरी.

उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** आंबेगावचा पूर्व भाग हा कायम दुष्काळीभाग म्हणून ओळख, कारण या भागातील शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे शेती ही फक्त पावसाळ्यातच केली जाते शेतीत ठोस उत्पन्न नसल्यामुळे नोकरी व्यवसायानिमित्ताने या भागातील बहुतांश तरूणवर्ग हा शहराकडे वळलेला दिसत आहे. अशा विपरीत परिस्थितीमध्ये पहाडदरा गावातील शेतकऱ्यांनी मात्र एक आगळवेगळ नियोजन करून सर्वांच्या दृष्टीस एक आशादायी चित्र निर्माण केले आहे. आजूबाजूच्या गावातील शेतकऱ्यासाठी एक आदर्श ठरेल असा उपक्रम राबवला आहे.

गावातील काही शेतकऱ्यांनी अधिका-अधिक संख्येने एकत्र येऊन शेतीसाठी पाणी नेण्याचे शिवधनुष्य उचलून तो उपक्रम यशस्वी होताना दिसत आहे. यासाठी मेंगडेवाडी (ता. आंबेगाव ) येथून जो डिंभे धरणाचा उजवा कालवा जात आहे तेथून बंद पाईपलाइनद्वारे शेतीसाठी पाणी नेण्याच पहाडदरा येथील ग्रामस्थ संतोष कुरकुटे, बाबासाहेब कुरकुटे,महेश वाघ, अनिल कुरकुटे,राहुल कुरकुटे,हनुमंत कुरकुटे,खंडु कुरकुटे,विजय कुरकुटे,मंदा कुरकुटे, भाग्यश्री कुरकुटे, संकेत वायकर या शेतकर्यांनी शेतीला पाणी आणण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी या शेतकऱ्यांनी डिंभे उजव्या कालव्यावर मेंगडेवाडी ते पहाडदरा अंतर चार किमी आहे. त्यासाठी सहा ईंचीच्या दोनपाईपलाईन मधून पाणी कुरकुटे मळा येथील तलावात टाकले जाणार आहे. त्यासाठी तीस एचपीचे दोन विद्युत पंप बसविले जाणार आहे. विद्युत पंपासाठी मेंगडेवाडीचे माजी सरपंच दिलीप रणपिसे यांनी जागा उपलब्ध करून दिली आहे. तर माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी वनविभाग,महावितरण व इतर कामासाठी विशेष सहकार्य केल्याचे माजी सरपंच भाग्यश्री कुरकुटे यांनी सांगितले. गावातील सर्व शेतकरी व मान्यवरांच्या हस्ते पाईपलाईन कामाचे भूमिपूजन करण्यात आले असून पाईप लाईनचे काम सुरू झाले आहे. ही घटना येथील शेतकऱ्याच्या दृष्टीने आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

विचारा प्रश्न


## कोणत्या चाचण्या करून घेऊ?

मी २२ वर्षांचा तरुण असून वजन ७२ किलो आहे. सात वर्षांपूर्वी मला उच्च रक्तदाबाचं निदान झालं. सततच्या डोकेदुखीमुळे शारीरिक तपासणी केली असता ही समस्या समोर आली. डॉक्टरांनी मेटोलर (५० एमजी) गोळी सुरू केली. अजूनही मी ही गोळी घेत आहे. औषधांमुळे रक्तदाब नियंत्रणात आहे. नुकतीच माझी कार्डिओलॉजिस्ट असणाऱ्या नातेवाईकांशी भेट झाली. त्यांनी मला औषध बदलण्याचा सल्ला दिला. मेटोलरमुळे भविष्यात मधुमेहाचा तसंच नपुंसकत्व येण्याचा धोका वाढतो, असं त्यांनी सांगितलं. असं असताना मी दुसरं औषध घ्यायला हवं का? कोणत्या चाचण्या करू? या नातेवाईकांनी मला रेनल डोपलर चाचणी करायला सांगितली आहे. ती करू की नको?

**उत्तर :** रक्तदाब नियंत्रणात असणं ही चांगली बाब आहे. पण कमी वयात उच्च रक्तदाबाचं निदान झाल्याने काही चाचण्या करायला हव्या. रेनल आर्चरी स्टेनोसिसमुळे असं होऊ शकतं. त्यामुळे ही शक्यता पडताळून पाहायला हवी. तू एका चांगल्या डॉक्टरांना भेट. तसंच आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब कर. वजन नियंत्रणात ठेव. मीठाचं प्रमाण कमी कर. धूम्रपान, मद्यपान करू नकोस. नियमित व्यायाम कर. यामुळे तुझा रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होईल.

## स्पाँडिलायटिस आहे?

**सर्वसाधारणपणे मानेच्या किंवा कंबरेच्या स्पाँडिलायटिसची लक्षणे अधिक प्रमाणात आढळून येतात. आपण आजूबाजूला वावरताना मानेला किंवा कंबरेला पट्टा बांधलेले अनेकजण आढळतात. ते शक्यतो स्पाँडिलायटिसचेच रूग्ण असतात. हा विकार कोणालाही होऊ शकतो. याविषयी...**




सध्याच्या धावपळीच्या युगात प्रत्येकालाच तारेवरची कसरत करावी लागत आहे. कमी वेळेत जास्तीत जास्त कामं पार पाडावी लागत असल्याने दमछाक होणं स्वाभाविक आहे. यातूनच विविध आजार उद्भवतात. त्यात इतर काही आजारांप्रमाणेच अलीकडे स्पाँडिलायटिसचा विकारही मोठ्या प्रमाणावर दिसून आलं आहे.

सर्वसाधारणपणे मानेच्या किंवा कंबरेच्या स्पाँडिलायटिसची लक्षणं आढळून येतात. आपण आजूबाजूला वावरताना मानेला किंवा कंबरेला पट्टा बांधलेले अनेकजण आढळतात. ते शक्यतो स्पाँडिलायटिसचेच रूग्ण असतात. हा विकार स्त्री किंवा पुरूष कोणालाही होऊ शकतो. पूर्वी या विकाराने त्रस्त असणाऱ्यांची संख्या बरीच कमी होती. शिवाय हा विकार उतारवयातच होत असे. मात्र अलीकडे तरूण वयातही या आजाराची लक्षणं दिसून येत आहे. तारूण्यातच असा आजार जडल्यास संबंधित व्यक्तीची मानसिक अवस्था भलतीच बिकट होते. अर्थात अलिकडे या आजारावर प्रभावी उपचार करणं शक्य झालं आहे. मात्र आधी स्पाँडिलायसिस म्हणजे काय हे जाणून घेणं गरजेचं ठरेल.

आपल्या शरीरातील प्रत्येक मणक्यामधून नसेद्वारे रक्तपुरवठा केला जातो. काही कारणाने या नस दबल्या गेल्यास स्पाँडिलायटिसचा विकार उद्भवतो. मान दुखणं, वळवताना किंवा हलवताना त्रास होणं, हात दुखणं, हाताला मुंग्या येणं अशा प्रकारची लक्षणं जाणवू लागतात. यालाच सर्व्हायकल स्पाँडिलायटिस म्हणतात. दुसऱ्या प्रकारात कंबर दुखणं, दोन्ही किंवा एक पाय वरून खालपर्यंत दुखणं, पायांना मुंग्या येणं, जड वाटणं, बधिर झाल्यासारखं वाटणं, थोडीशी हालचालही त्रासदायक वाटणं अशा स्वरूपाची लक्षणं जाणवू लागतात. याला लम्बर स्पाँडिलायटिस असं म्हणतात.

पुरुषांमध्ये अँकिलोझिंग स्पाँडिलायटिसचं प्रमाण अधिक आढळून येतं. यामुळे माकडहाड तसंच मणके अधिक प्रमाणात प्रभावित होतात. यामध्ये स्नायू आखडण्यापासून सुरुवात होते. त्यानंतर हळूहळू मान आणि कंबरेची हालचाल बंद होते. शिवाय कंबरेला बाक येण्याचीही शक्यता असते. संबंधित रुग्णाला चोवीस तास वेदना होत असतात. त्यामुळे मान हलवणंही अशक्य होऊन जातं. सदर लक्षणांवरुन या आजाराचं गंभीर स्वरुप तसंच रुग्णांना सहन करावा लागणाऱ्या वेदनांची कल्पना येते. रुग्णामध्ये आढळणाऱ्या लक्षणांवरून त्याला कोणत्या स्वरूपाचा स्पाँडिलायसिस झाला आहे हे निश्चित केलं जातं.

सतत एका दिशेला नजर स्थिर करून पहात राहणं, मान अचानक वळवणं यासारख्या कारणांमुळे मानदुखी निर्माण होते. सुरुवातीच्या काळात या व्याधीकडे दुर्लक्ष केल्यास गुंतागुंत वाढण्याची शक्यता असते. शिवाय सतत वाकून काम करावा लागणाऱ्या व्यक्तींमध्ये कंबरदुखीची लक्षणं जाणवतात. शिवाय कंबर आखडणं किंवा त्या भागाला रक्तपुरवठा सुरळीत न होणं अशी लक्षणंही दिसून येतात. यातील कोणत्याही लक्षणांवर तातडीने उपाय करणं गरजेचं ठरतं. विशेषत: वाहनचालकांना कंबरदुखीचा त्रास अधिक प्रमाणात होत असल्याचं दिसून आलं आहे. सतत एकाच अवस्थेत बसून वाहन चालवल्यामुळे कंबरेचे स्नायू आखडतात. त्यातून कंबरदुखी निर्माण होते. कारणं कोणतीही असली तरी मानदुखी किंवा कंबरदुखीवर वेळीच इलाज करणं महत्त्वाचं ठरतं.

आरोग्य विशेष

स्पाँडिलायटिसच्या विकारामध्ये एक्स-रे तसंच एमआरआय चाचण्या उपयुक्त ठरतात. शिवाय या विकारावर प्रभावी ठरतील अशी औषधे होमिओपॅथीमध्ये उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे होमिओपॅथीच्या उपचारामुळे स्पाँडिलायटिससारखा विकार पूर्णपणे बरा होतोच शिवाय तो पुन्हा उद्भवण्याची शक्यताही नसते. शरीराच्या एखाद्या भागातील दबली गेलेली नस पूर्ववत करण्यासाठी ही औषधं उपयोगी ठरतात. त्यामुळे मानेचा किंवा कंबरेचा पट्टा सुटण्यास आपोआपच मदत होते. अर्थात या विकारावरील होमिओपॅथीची औषधं एक महिन्यापासून सहा महिन्यांपर्यंतच्या कालावधीसाठी घ्यावी लागतात. कोणताही विकार समूळ नष्ट करण्यासाठी काही कालावधी जाऊ द्यावा लागतो. तोपर्यंत सातत्याने आणि वेळेवर उपचार घेणं गरजेचे ठरतं. ही औषधं प्रभावी ठरण्याचं आणखी एक कारण म्हणजे मानसिक ताणतणावांवर होमिओपॅथीचा इलाज प्रभावी ठरतो. त्यामुळे स्पाँडिलायटिसचा विकार कमी होण्याबरोबरच मानसिक ताणतणावांपासूनही सुटका होते. शिवाय या उपचारामुळे शांत झोप लागणं शक्य होत असल्यामुळे रुग्णाच्या शारीरिक क्षमतेत वाढ होते.

थोडक्यात, स्पाँडिलायटिसबरोबरच शरीरातील इतर व्याधींवरही होमिओपॅथीचा उपचार प्रभावी ठरत आहे. यादृष्टीने रुग्णांनी विचार करून या उपचारपद्धतीचा आधार घ्यायला हवा. त्याद्वारे रुग्णांचं जीवन सुखकर होण्यास मदत होते.

## पायाला मुंग्या येतात?



कधी ना कधी हात किंवा पायांमध्ये मुंग्या येतात. हातावर झोपतो किंवा बराच वेळ पाय दुमडून बसतो, तेव्हा असे होऊ शकते. आपण याला पॅरेस्थेसिया असे म्हणू शकता. मुंग्या येण्याबरोबरच सुन्नपणा, वेदना किंवा हात आणि पायांच्या आजूबाजूला अशक्तपणा जाणवू शकतो. या समस्येचे कारण सामान्यतः दबाव, आघात किंवा मज्जातंतूंचे नुकसान असू शकते.

मधुमेहामुळे मज्जासंस्थेला हानी पोहोचते तेव्हा ही समस्या उद्भवते. यामध्ये पाय आणि हातांवर परिणाम करू शकते. मज्जातंतूंना हानी पोहोचवण्याप्रमाणेच नसांपर्यंत रक्त पुरवणाऱ्या रक्तवाहिन्यांनाही यामुळे नुकसान पोहोचवू शकते. मज्जातंतूंना पुरेसा ऑक्सिजन मिळत नसल्यामुळे ते नीट काम करू शकत नाहीत. त्यामुळे मुंग्या येतात. शरीराच्या अनेक भागांतील नसा संकुचित होऊ शकतात आणि हात किंवा पायांवर परिणाम दिसू शकतो. म्हणूनच मुंग्या येणे, हात-पाय सुन्न होणे किंवा वेदना होणे या त्रासाकडे दुर्लक्ष करु नये.

काळजी घ्या

किडनी नीट काम करत नसेल तर मूत्रपिंड निकामी होते. उच्च रक्तदाब किंवा मधुमेह यांसारख्या परिस्थितीमुळे किडनी निकामी होऊ शकते. किडनी नीट काम करत नाही, म्हणजेच ती निकामी झाल्यामुळे पायात मुंग्या येणे उद्भवते. शरीरात व्हिटॅमिन बी आणि ई च्या कमतरतेमुळे नसा आणि शरीराच्या इतर भागांवर परिणाम होतो. तुम्ही कदाचित योग्य पदार्थ खात नसाल, तरीदेखील ही समस्या जाणवू शकते. अशा परिस्थितीत आवश्यक पोषक तत्त्वांच्या कमतरतेमुळे हात-पायांना मुंग्या येणे सुरु होते. हे लक्षण दिसत असेल तर आहाराकडे लक्ष दिले पाहिजे. मज्जातंतूंशी संबंधित समस्या निर्धारित औषधांचा दुष्परिणाम म्हणूनही पाहिली जाऊ शकते. क्षयरोग, उच्च रक्तदाब, एचआयव्ही आणि इतर अनेक संसर्गांमुळे कधीकधी हात आणि पाय सुन्न होतात आणि मुंग्या येतात. अल्कोहोलचे जास्त सेवन केल्यानेही नसा आणि ऊतींचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे नसांवर वाईट परिणाम होतो. त्यामुळे पाय आणि हातांना मुंग्या येण्यासारख्या समस्या उद्भवू शकते.

## फ्लूकडे दुर्लक्ष नको

फ्लू हा सर्वसाधारण विकार आहे. तो हंगामी विषाणूंमुळे होतो. यात सौम्य ते तीव्र स्वरूपाची लक्षणं दिसून येतात. काही रूग्ण आठवड्याभरात बरे होतात तर काही रूग्णांमध्ये बरीच गुंतागुंत निर्माण होऊ शकते. ६५ वर्षांपुढच्या रूग्णांमध्ये गुंतागुंतीची शक्यता बरीच जास्त असते. ज्येष्ठ नागरिकांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झालेली असते. कमकुवत प्रतिकारशक्तीमुळे शरीर विषाणूंना प्रतिकार करू शकत नाही. फ्लूचा संसर्ग वाढला तर त्याचं रूपांतर निमोनियात होऊ शकतं. निमोनिया झालेल्या रूग्णाला रूग्णालयात दाखल करावं लागतं. म्हणूनच ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी.



६५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या लोकांना ही लक्षणं जाणवली तर पुढची गुंतागुंत टाळण्यासाठी त्यांनी तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. फ्लूची लक्षणं दिसल्यानंतर ४८ तासांत आराम दिसला नाही तर डॉक्टर तुम्हाला विषाणूविरोधी औषधं घेण्याचा सल्ला देतात. वेळेत औषधं घेतली तर फ्लूची तीव्रता कमी होऊ शकतो.

तरूण तसंच सशक्त असणाऱ्या लोकांमध्ये फ्लूमुळे फारशी गुंतागुंत निर्माण होत नाही. कारण त्यांची रोगप्रतिकारक शक्ती चांगली असते. पण ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये फ्लूमुळे बरीच गुंतागुंत निर्माण होऊ शकते. फ्लूमुळे सायनस किंवा कानाला जंतुसंसर्ग होऊ शकतो. तीव्र स्वरूपाची गुंतागुंत असेल तर निमोनिया किंवा ब्रॉकायटिस होऊ शकतो.

फ्लू आणि सर्वसामान्य सर्दी यात फरक असतो. आजारी पडल्यानंतर फ्लू आणि सर्दी यातला फरक जाणून घेणं गरजेचं आहे. फ्लू आणि सर्दी यांची लक्षणं सारखीच असली तरी सर्दीची लक्षणं बरीच सौम्य असतात तर फ्लूची बरीच लक्षणं साध्या सर्दीत दिसून येत नाहीत.

आरोग्यचर्चा


**फ्लू आणि सर्दीची लक्षणं**

नाक गळणं, छातीत कफ साठणं, घसा दुखणं, खोकला ही सर्दी आणि फ्लूची सर्वसाधारण लक्षणं आहेत. फ्लू असेल तर अतिरिक्त लक्षणं दिसून येतात. त्यात ताप, अंगदुखी, थंडी, थकवा, अशक्तपणा, अस्वस्थता जाणवणं, तीव्र डोकेदुखी यांचा समावेश आहे. पिवळ्या, करड्या किंवा हिरव्या रंगाचा कफ पडणं, थकवा येणं, धाप लागणं, ताप, छातीत दुखणं ही ब्रॉकायटिसची लक्षणं असू शकतात. ब्रॉकायटिसमुळे निमोनिया होऊ शकतो. निमोनिया खूप गंभीर असतो. यावर वेळेत उपचार झाले नाहीत तर रोगाचे जंतू रक्तात मिसळू शकतात. यामुळे अवयव निकामी होण्याची शक्यता असते. त्यामुळे फ्लूकडे दुर्लक्ष करू नये. फ्लूला प्रतिबंध करण्यासाठी प्रत्येकाने फ्लूविरोधी लस घ्यायला हवी. त्यातही ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींनी फ्लूचं लसीकरण करायला हवं.

## मोनोपॉजच्या काळात ...

दर महिन्याला साधारण २१ दिवसांच्या अंतराने महिलांना पाळी येते. मासिकपाळी दरम्यान पोटात दुखणे आणि पायात क्रॅम्प येणे अशा शारीरिक आजारांप्रमाणे मानसिक त्रासालादेखील महिला सामोऱ्या जात असतात. मासिक पाळी सुरु असताना चिडचिड होणे, रडावेसे वाटणे असे मूड स्विंग्ज होत असतात. त्याचप्रमाणे चाळिशीत आल्यावर मोनोपॉजमुळे महिलांमध्ये मानसिक बदलही मोठ्या प्रमाणात होत असतात.

चाळिशीनंतर शरीरात संप्रेरके बदलतात. याचा जास्त परिणाम मानसिक आरोग्यावर दिसून येतो. त्याचप्रमाणे भूक न लागणे, थकवा येणे आणि अशक्तपणा जाणवणे यांसारख्या शारीरिक समस्या हीदेखील मोनोपॉजची लक्षणे समजली जातात. मासिकपाळी हळूहळू बंद होण्याच्या मार्गावर असताना महिलांना याचे दडपण येते. त्यामुळे बऱ्याच जणी नैराश्यात जातात. मात्र हा शारीरिक बदल संयमाने स्वीकारणे गरजेचे आहे. व्यायाम आणि आहाराबरोबरच स्वत:ला वेळ देणे गरजेचे आहे. स्वत:वर प्रेम करणे, स्वत:ची काळजी घेणे त्याचप्रमाणे आवडत्या गोष्टींकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. मोनोपॉजच्या काळात नैराश्यापासून दूर राहण्यासाठी योगा आणि ध्यान करणे फायदेशीर ठरते. ध्यान केल्याने मानसिक स्थिती सुधारते. मानसिक संतुलन राखण्यासाठी मेडीटेशन बरोबरच योग्य आहार घेणे महत्त्वाचे आहे. घरातील सात्विक अन्न आणि ताज्या फळांचे सेवन करणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर कॅफेनयुक्त पदार्थांचे सेवन टाळावे.




मोनोपॉजमध्ये येणाऱ्या डिप्रेशकडे दुर्लक्ष न करता वेळीच डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. या दिवसात चिंता, तणाव आणि शारीरिक कष्ट घेणे टाळावे. मुबलक पाणी प्यायल्याने मुळे मानसिक ताण दूर होण्यास मदत मिळते. तसेच या दिवसात भरपूर पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेटेड राहण्यास मदत मिळते.

## गर्भधारणा होतीये सोपी

अलिकडच्या काळात सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (एआरटी) क्षेत्रात, विशेषत: इन विट्रो फर्टिलायझेशन (आयव्हीएफ) मध्ये उल्लेखनीय प्रगती झाली आहे. या प्रगतीमुळे केवळ यशाचा दर सुधारत नाही तर वंध्यत्वाच्या आव्हानांना तोंड देत असणाऱ्या जोडप्यांना नवीन आशाही मिळत आहे.

मेडिसिन एक्सपर्ट डॉ. प्रदीप महाजन सांगतात, की प्रत्येक व्यक्तीचा प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून आम्ही विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी 'आयव्हीएफ' प्रक्रियेचे नियोजन आखतो. यामुळे सकारात्मक परिणाम वाढतात. लवकरच गोळ्यांद्वारे उपचार न करता स्वत:च्याच शरीरातील पेशींचा वापर केला जाईल. 'आयव्हीएफ'मध्ये नावीन्य आणणारे प्रमुख तंत्रज्ञान म्हणजे 'प्रीइम्प्लांटेशन जेनेटिक टेस्टिंग'. हे स्त्रीभ्रूणशास्त्रज्ञांना भ्रूण रोपण करण्यापूर्वी अनुवांशिक विकारांसाठी भ्रूण तपासण्याची परवानगी देते. ते अनुवांशिक रोगांचा धोका कमी करते आणि यशस्वी गर्भधारणेची शक्यता वाढवते. डॉ. महाजन यांच्या मते, 'आयव्हीएफ' प्रक्रियेदरम्यान हस्तांतरित केलेल्या भ्रूणांच्या एकूण गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी 'पीजीटी' अतिशय महत्त्वपूर्ण आहे. भ्रूण अनुवांशिकदृष्ट्या निरोगी असणे हे एआरटी उपचारांमधील एक गेम-चेंजर ठरत आहे. आयव्हीएफ प्रयोगशाळांमध्ये टाइम-लॅप्स इमेजिंग सिस्टमचा वापर हेदेखील एक प्रगत तंत्रज्ञान आहे. ही प्रणाली गर्भाच्या विकासावर सतत लक्ष ठेवतात.



भ्रूण गुणवत्ता आणि व्यवहार्यतेबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करतात. रिअल-टाइम मॉनिटरिंग भ्रूण निवडीबाबत अधिक चांगले निर्णय घेण्यास अनुमती देते. त्यामुळे यशस्वी गर्भधारणा आणि गर्भपाताचा धोका कमी होतो. डॉ. महाजन म्हणतात की, सेल बेस थेरपी ही आयव्हीएफ परिणाम वाढवण्यास मदत करते. हे इम्प्लांटेशन दर सुधारण्यासाठी आणि भ्रूण विकासास समर्थन देण्यासाठी मेसेन्कायमल पेशींचा वापर करण्यावर लक्ष केंद्रित करते. मेसेन्कायमल पेशींमध्ये पुनरुत्पादक क्षमता अधिक आहे. त्यांच्या गुणधर्मांचा उपयोग करून आम्ही भ्रूण रोपण आणि वाढीसाठी गर्भाशयात पोषक वातावरण निर्माण करण्याचे ध्येय ठेवले आहे. सेल बेस थेरपी एंडोमेट्रिओसिस, गर्भाशयाच्या कार्यातील अडथळे आणि पुरुष वंध्यत्वास कारणीभूत घटक यांसारख्या समस्यांचे निराकरण केल्याने प्रजनन क्षमता पुनर्संचयित करण्यासाठी आणि संपूर्ण पुनरुत्पादक आरोग्य सुधारण्यासाठी नवीन मार्ग उपलब्ध करून देतात.

तंत्रज्ञान

नवसंशोधन

### ...म्हणून लोक पत्करतात धोका!


काही लोक धोके पत्करतात. धाडसी खेळ खेळतात. दुसरीकडे काहींना उंचावर जाण्याची खूप भीती वाटते. मेंदूतल्या विशिष्ट प्रकारच्या पेशींमुळे असं होतं ही बाब एका संशोधनातून समोर आली आहे. ओएलएम नावाच्या या पेशी धोका पत्करण्याच्या मानसिकतेत महत्त्वाची भूमिका बजावतात. हा शोध अस्वस्थता, चिंता, काळजी, नैराश्य यांसारख्या मानसिक विकारांवरील उपचारांसाठी मैलाचा दगड ठरेल, अशी अपेक्षा आहे.



डोळ्यांचं आरोग्य

### डोळ्यांना दुखापत झाल्यास....

डोळा हा आपल्या शरीराचा अत्यंत नाजूक असा अवयव आहे. त्यामुळे डोळ्याला होणारी कोणतीही दुखापत किंवा संसर्ग गंभीर स्वरूपाचा असू शकतो. डोळ्याला दुखापत झाली की तातडीने औषधोपचार व्हायला हवेत. यामुळे संभाव्य नुकसान टळू शकतं. डोळा दुखणं, सतत पाणी येणं, डोळे लाल होणं, पापण्या सुजणं ही डोळ्याच्या दुखापतीची लक्षणं आहेत. त्यामुळे डोळ्यांना दुखापत झाली की तातडीने डॉक्टरांकडे जायला हवं.



दंतारोग्य

### कारणं श्वासाच्या दुर्गंधीची

वैद्यकीय भाषेत श्वासाच्या दुर्गंधीला 'हॅलीटोसिस' असं म्हटलं जातं. तोंडाची आणि दातांची अस्वच्छता हे तोंडाच्या दुर्गंधीचं महत्त्वाचं कारण आहे. दातांमध्ये अडकलेल्या अन्नकणांवर बॅक्टेरिया वाढतात. या बॅक्टेरियांमुळे तोंडाला दुर्गंधी येते. तोंड कोरडं पडणं हे सुद्धा तोंडाच्या दुर्गंधीचं कारण आहे. हिरड्यांशी संबंधित विकारांमुळेही तोंडाला दुर्गंधी येते. त्यामुळे तोंडाच्या दुर्गंधीचं कारण जाणून घेऊन त्यावर योग्य ते उपचार करायला हवेत.



आजीबाईंचा बटवा

### प्रथिनयुक्त पालक

आहारात प्रथिनांचा समावेश करायला हवा. अंडी, मांस आणि मासे हे प्रथिनांचे उत्तम स्रोत आहेत. शाकाहारींसाठीही प्रथिनं मिळवण्याचे बरेच पर्याय आहेत. त्यापैकी एक म्हणजे पालक. पालकामध्ये भरपूर प्रमाणात प्रथिनं असतात. यासोबतच त्यात भरपूर लोह, जीवनसत्त्व, खनिजं आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे आहारात पालकाचा समावेश करायला हवा.









# हैदराबादचं प्लेऑफचं स्वप्नही भंगलं

## दिल्लीविरुद्धचा सामना पावसामुळे अनिर्णित राहिला, दोन्ही संघांना १-१ गुण मिळाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**हैदराबाद :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेतील ५५ वा सामना सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स संघात होणार होता. सोमवारी (५ मे) राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होणारा हा सामना पहिल्या डावानंतर पावसामुळे रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे आता दोन्ही संघांना प्रत्येकी १-१ पॉँइंट देण्यात आला आहे. यामुळे आयपीएल २०२५ च्या प्लेऑफच्या शर्यतीमधून सनरायझर्स हैदराबाद अधिकृतरित्या बाहेर झाले आहेत. सनरायझर्स हैदराबाद प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर होणारा तिसरा संघ ठरला आहे. यापूर्वी चेन्नई सुपर किंग्स आणि राजस्थान रॉयल्स या माजी विजेत्यांना प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर व्हावे लागले आहे.

सनरायझर्स हैदराबादला आता एक पॉँइंट मिळाल्यामुळे त्यांचे ११ सामन्यांनंतर ७ पॉँइंट्सच झाले असून त्यांचे आता ३ सामने बाकी आहेत. त्यामुळे त्यांचे जास्तीत जास्त १३ पॉँइंट्स होतील. त्यामुळे हैदराबादला आता प्लेऑफमध्ये पोहचता येणार नाही. हैदराबाद आता ८ व्या क्रमांकावर आहेत.

दिल्ली संघाला ११ सामन्यांनंतर १३ पॉँइंट्स झाले आहेत. त्यांनी आधीच ६ सामने जिंकलेले आहेत. त्यामुळे त्यांचे आव्हान अजूनही जिवंत आहे. त्यांना आता प्लेऑफमध्ये पोहचण्यासाठी उर्वरित तीन सामन्यांपैकी किमान दोन सामने जिंकावेच लागणार आहेत. तसेच त्यांनी जर तिन्ही सामने जिंकले, तर त्यांच्यासाठी प्लेऑफमध्ये जाणे सोपे असणार आहे. पण एक सामना पराभूत झाला, तरी त्यांना बाकी संघांच्या निकालावरही अवलंबून रहावे लागणार आहे. दिल्ली सध्या १३ गुणांसह पाचव्या क्रमांकावर आहेत.

आता तीन संघ बाहेर झाले आहेत. राजस्थान १२ सामन्यांनंतर ६ गुणांसह नवव्या क्रमांकावर आहेत. चेन्नई सुपर किंग्स ११ सामन्यांनंतर ४ गुणांसह सर्वात शेवटी आहेत. पॉँइंट्स टेबलमध्ये आता ५५ व्या सामन्यानंतर पहिल्या सात क्रमांकावर असलेले संघ प्लेऑफच्या शर्यतीत आहेत.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू ११ सामन्यांत सर्वाधिक १६ पॉँइंट्ससह अव्वल क्रमांकावर विराजमान आहे. दुसऱ्या क्रमांकावर ११ सामन्यांत १५ गुण मिळवून पंजाब किंग्स दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर अनुक्रमे मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स आहेत. या दोन्ही संघांचे १४ पॉँइंट्स आहेत. पण मुंबईचा नेट रन रेट गुजरातपेक्षा जास्त आहे. मात्र मुंबईचे ११ सामने झाले आहेत, तर गुजरातचे १० सामने झाले आहेत. पाचव्या क्रमांकावर दिल्ली, तर सहाव्या क्रमांकावर कोलकाता नाईट रायडर्स ११ सामन्यांतील ११ पॉँइंट्ससह आहे. सातव्या क्रमांकावर असलेल्या लखनौ सुपर जायंट्सचे ११ सामन्यांत १० गुण आहेत.

## बुद्धीबळ स्पर्धेत सहा खेळाडू आघाडीवर



**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या वतीने आयोजित व एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एच2इ पॉवर सिस्टीम महाराष्ट्र राज्य 7 वर्षाखालील खुल्या व मुलींच्या गटात निवड बुद्धीबळ स्पर्धेत खुल्या गटात निहांश खोडे, कविश भट्टड, निश्वंत रामकुमार यांनी 5गुणांसह तर, मुलींच्या गटात प्रितिका नंदी, समायरा थोरात, प्रियल शिखरे यांनी 4 गुणांसह संयुक्तरीत्या आघाडी प्राप्त केली आहे. कर्वे रोड येथील अश्वमेध हॉल या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत खुल्या गटात पाचव्या फेरीत पहिल्या पटावरील लढतीत नागपूरच्या निहांश खोडेने नाशिकच्या वल्लभ चव्हाणचा पराभव करून 5गुणांची कमाई केली. पुण्याच्या कविश भट्टड याने मुंबई उपनगराच्या घुमान राजवीर सिंगचा पराभव करून 5 गुण प्राप्त केले. पुण्याच्या निश्वंत रामकुमार याने ठाण्याच्या आकांक्षा श्रीवास्तवचा पराभव करून 5गुण मिळवले. मुलींच्या गटात चौथ्या फेरीत पुण्याच्या प्रितिका नंदी हिने ठाण्याचा खनक कल्पना गाडाचा पराभव करून 4 गुणांसह आघाडी प्राप्त केली. याआधी स्पर्धेचे उद्घाटन माजी बुद्धिबळपटू अॅड. आदिती जोरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एमसीएचे सहसचिव राजेंद्र कोंडे, स्पर्धा संचालक प्रकाश कुंटे, राजेंद्र शिदोरे, शेखर जोरी,विवेक भागवत, चीफ आरबीटर आयए विनिता श्रोत्री आणि श्रद्धा विंचवेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## पुणे क्रिकेट अॅकॅडमी, लीडिंग स्ट्रॉक क्रिकेट अॅकॅडमी संघ विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** निकीत मलके स्पोर्टस मॅनेजमेंट आणि पुणे क्रिकेट क्लब यांच्यावतीने 'युथ करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब (३०-३० षटकांच्या) क्रिकेट स्पर्धेत पुणे क्रिकेट अॅकॅडमी आणि लीडिंग स्ट्रॉक क्रिकेट अॅकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

वाघोली येथील पुणे क्रिकेट अॅकॅडमीच्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत अथर्व कावळे याने केलेल्या ५९ धावांच्या जोरावर पुणे क्रिकेट अॅकॅडमी अ संघाने क्रिकेट अॅकॅडमी संघाचा १४१ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना पुणे क्रिकेट अॅकॅडमीने ३० षटकात २३१ धावांचे लक्ष्य उभे केले. अथर्व कावळे याने ५९ धावांची खेळी केली. अमरेंद्र सिंग (४५ धावा), राजवीर



राऊत (३५ धावा) आणि सार्थक पाटील (३१ धावा) यांनी धावांचे योगदान देत संघाला मोठी धावसंख्या गाठून दिली. या लक्ष्याचा पाठलाग करताना क्रिकेट अॅकॅडमी संघाचा डाव ९० धावांवर गडगडला.

अथर्व सिन्हा याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे लीडिंग स्ट्रॉक क्रिकेट अॅकॅडमीने पुणे क्रिकेट अॅकॅडमी ब संघाचा १० गडी राखून सहज पराभव केला. अथर्व सिन्हा याने नाबाद ५० धावांची खेळी करून संघाचा विजय निश्चित केला.

## मल्लखांबमध्ये आघाडी, खोखोत विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** ७व्या खेलो इंडिया तिरंदाजीसह मल्लखांब प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सुवर्णपदकाकडे वाटचाल कायम राखली आहे. तिरंदाजीत महाराष्ट्राचे सात खेळाडू पदकासाठी भिडणार असून, यातील सहा पदके, तर आताच निश्चित आहेत. मल्ल्खांबमध्येही लौकिकाला साजेशी कामगिरी करीत सांघिक प्रकारात मुलांनी आघाडी घेतली आहे. खोखोत पंजाबचा ५८-९ गुणांनी धुव्वा उडवून महाराष्ट्राच्या मुलींनी विजयी सलामी दिली.



भागलपूर येथे सुरू असलेल्या तिरंदाजी स्पर्धेत सलग दुसरा विजय महाराष्ट्राच्या खेळाडूंनी गाजविला. मुलींच्या तिरंदाजीच्या कम्पाऊंड प्रकारात महाराष्ट्राच्या तेजल साळवे व प्रितिका प्रदिप यांच्यामध्ये अंतिम लढत रंगणर असून, महिलांच्या रिकर्व प्रकारातही शर्वरी शेंडे व वैष्णवी पवार या महाराष्ट्रीय प्रतिस्पर्ध्यांमध्येच सुवर्णपदकांची लढत रंगणार आहे. म्हणजेच ही चारही पदके महाराष्ट्राच्याच झोळीत पडणार आहेत. याचबरोबर मुलांच्या रिकर्व प्रकारात महाराष्ट्राच्या उज्वल ओलेकरने अंतिम फेरी गाठली असून, मुलांच्या कपाऊंड प्रकारातही मानव जाधव अंतिम फेरीत दाखल झाला आहे. म्हणजेच महाराष्ट्रासाठी ही दोन पदकेही निश्चित झाले आहे.

मुलींच्या कम्पाऊंड प्रकारात महाराष्ट्राची वैदेही जाधव कांस्यपदकासाठी लढणार आहे. हेही पदक मिळाले, तर तिरंदाजीत महाराष्ट्राला सात पदके मिळणार आहेत. अव्वल मानांकित श्रावणी शेंडे हिने उपांत्य फेरीत हरियाणाच्या तमन्ना गुल्ला हिचा ६-० गुण फरकाने धुव्वा उडविला. दुसऱ्या उपांत्य लढतीत वैष्णवी पवार हिने झारखंडच्या तमन्ना वर्माचा ७-१ असा पराभव करून आगेकूच केली. महाराष्ट्राच्या मानव जाधवने उपांत्य फेरीत पंजाबच्या सुखमनदीप सिंगचा चूरशीच्या लढतीत १४८-१४७ असा निसटता विजय मिळविला. आता सुवर्णपदकाच्या लढतीत त्याची गाठ झारखंडच्या दलवांशू सिंग याच्याशी पडेल. मराठमोळ्या तेजल साळवेने उपांत्य लढतीत तमिळनाडूच्या मधुरावर्षीनी हिचा १४१-१३९ गुण फरकाने पाडाव करीत अंतिम फेरीत धडक दिली. दुसऱ्या उपांत्य लढती महाराष्ट्राच्या प्रितिका प्रदीप हिने आपलीच राज्य सहकारी वैदेही जाधव हिच्यावर १४४-१४१ अशी मात करीत आगेकूच केली. त्यामुळे आता वैदेही व मधुरावर्षीनी यांच्यात कांस्यपदकाची लढत रंगणार आहे. दुसरीकडे उज्वल ओलेकरने उपांत्य लढतीत मेघालयच्या देवराज महापात्रा याचा ६-२ सेटने पराभव करीत अंतिम फेरी निश्चित केली. सुवर्णपदकाच्या लढतीत त्याची गाठ तमिळनाडूच्या स्मारण सर्वेश याच्याशी पडणार आहे.

## आयर्लंड-इंग्लंडविरुद्धच्या वनडे संघातून हेटमायरला वगळले



**नवी दिल्ली :** आयपीएलमध्ये खेळणाऱ्या शिमरॉन हेटमायरला आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यावरील एकदिवसीय मालिकेसाठी वेस्ट इंडिज संघात स्थान मिळालेले नाही. हेटमायरच्या जागी ज्वेल अँड्र्यूचा १५ जणांच्या संघात समावेश करण्यात आला आहे. डिसेंबरमध्ये बांगलादेश दौऱ्यावर ३-० अशी एकदिवसीय मालिका जिंकणाऱ्या संघात हेटमायरचा समावेश नव्हता. शाई होप कर्णधारपद भूषवणार एकदिवसीय मालिकेसाठी जाहीर झालेल्या वेस्ट इंडिज संघाचा कर्णधार शाई होप असेल. दरम्यान, बांगलादेशविरुद्धच्या मालिकेत तंदुरुस्तीमुळे संघाबाहेर असलेले शोमर जोसेफ आणि मॅथ्यू फोर्ड हे एकदिवसीय मालिकेत परतले आहेत. याशिवाय, या एकदिवसीय मालिकेसाठी आमिर जांगूचाही संघात समावेश करण्यात आला आहे. हेटमायर आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळत आहे हेटमायर आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळत आहे. राजस्थान रॉयल्स प्लेऑफमधून बाहेर पडले आहे. तथापि, राजस्थान रॉयल्सचा शेवटचा लीग सामना १६ मे रोजी जयपूर येथे पंजाब किंग्ज विरुद्ध आहे. आयपीएलचा अंतिम सामना २५ मे रोजी कोलकाता येथे होणार आहे. त्याआधी, क्वालिफायर-१ २० मे रोजी, एलिमिनेटर २१ मे रोजी आणि क्वालिफायर-२ २३ मे रोजी खेळवण्यात येणार आहे. वेस्ट इंडिजचा मे-जूनमध्ये आयर्लंड आणि इंग्लंडचा दौरा वेस्ट इंडिज संघ मे-जूनमध्ये आयर्लंड आणि इंग्लंडचा दौरा करणार आहे. वेस्ट इंडिज २१ मे ते २५ मे दरम्यान आयर्लंड दौऱ्यावर तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे.

## रॅकेट लीग : वेकफील्ड डिलाइट्स, स्टॅश प्रो परमार ऑल स्टार्स, एचके पावरहाऊस संघांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पूना क्लब लिमिटेड यांच्या तर्फे आयोजित पाचव्या पूना क्लब रॅकेट लीग स्पर्धेत साखळी फेरीत वेकफील्ड डिलाइट्स, स्टॅश प्रो परमार ऑल स्टार्स, एचके पावरहाऊस या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी मालिका कायम ठेवली.



पूना क्लबच्या टेबलटेनिस, टेनिस, बॅडमिंटन, स्क्वॅश, पिकलबॉल कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्या सामन्यात एचके पावरहाऊस संघाने एएसआर स्ट्रायकर्स संघाचा 288-254 असा पराभव केला. सामन्यात बॅडमिंटनमध्ये सनत परमार, अश्विन शहा, करण शर्मा, निरव बाफना, जयदीप दाते, मनप्रीत उप्पल यांच्या खेळीच्या जोरावर पावरहाऊस संघाने स्ट्रायकर्स संघाचा 73-57 असा तर, टेनिसमध्ये रक्षय ठक्कर, जयदीप दाते, अवीव कांजीलाल, मनप्रीत उप्पल यांच्या विजयी खेळीच्या जोरावर पावरहाऊस संघाने स्ट्रायकर्सचा 57-50 असा पराभव केला. टेबल टेनिसमध्ये संजय श्रीवास्तव, मनप्रीत उप्पल, जयदीप दाते, करण शर्मा, रक्षय ठक्कर, अवीव कांजीलाल यांच्या खेळीच्या जोरावर पावरहाऊस संघाने स्ट्रायकर्सचा 73-62 असा तर, स्क्वॅशमध्ये पावरहाऊस संघाने स्ट्रायकर्सचा 41-34 असा संघाला विजयी आघाडी मिळवून दिली. अखेरच्या पिकलबॉल लढतीत एचके पावरहाऊस संघाला एएसआर स्ट्रायकर्स संघाला 44-51 असे पराभूत केले. दुसऱ्या लढतीत वेकफील्ड डिलाइट्स संघाने मनप्रीत अँड जीजीज जॅग्वार्स संघाचा 280-270 असा पराभव करून दुसऱ्या विजयाची नोंद केली. बॅडमिंटनमध्ये राजेश बनसोडे, ब्रिन्दा, प्रकाश बूथरा, विनय मुत्याल, आदित्य राठोड, देव घुवालेवाला यांच्या सुरेख खेळीच्या जोरावर डिलाइट्स संघाने जॅग्वार्स संघाचा 63-60 असा पराभव करून संघाचे खाते उघडले.

## २८ चेंडूत शतक करणारा उर्विल सीएसकेमध्ये सामील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** चेन्नई सुपर किंग्जने त्यांच्या संघात नुकताच खेळलेला यष्टीरक्षक-फलंदाज उर्विल पटेलचा समावेश केला आहे. त्याने जखमी वंश बेदीची जागा घेतली. उर्विलने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये २८ चेंडूत शतक ठोकण्याचा विक्रम केला आहे. दुसरीकडे, सनरायझर्स हैदराबादने रविचंद्रन स्मृतीच्या जागी फिरकी गोलंदाज हर्ष दुबेचा संघात समावेश केला.

सीएसकेचा युवा यष्टिरक्षक-फलंदाज वंश बेदी घोट्याच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडला आहे. या हंगामात तो एकही सामना खेळू शकला नाही. गुजरातकडून देशांतर्गत क्रिकेट खेळणारा २६ वर्षीय उर्विल त्याच्या जागी ३० लाख रुपयांच्या बेस प्राईसवर खेळेल. मेगा लिलावात उर्विल विकला गेला नाही.

चेन्नईने हंगामाच्या मध्यात उर्विल आणि आयुष म्हात्रे यांना चाचण्यांसाठी बोलावले होते. कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या जागी म्हात्रेचाही संघात समावेश करण्यात आला होता, पण उर्विलला आताच स्थान मिळाले आहे. उर्विल यापूर्वी २०२३ मध्ये आयपीएल संघ गुजरात टायटन्सचा भाग होता. तथापि, त्यावेळी त्याला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही.

## टेनिस स्पर्धेत शौर्य कलवागट्टू, वीरा परदेशी, आराध्या पवार, अर्जुन कोगेकर यांना विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे व केपीआयटी व सोलींको प्रायोजित 8,10वर्षाखालील मुले व मुलींच्या गटातील पीएमडीटीए मानांकन मिलिंद मारणे टेनिस अकादमी ब्रॉन्झ सिरिज 2025 स्पर्धेत शौर्य कलवागट्टू, वीरा परदेशी, आराध्या पवार, अर्जुन कोगेकर यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले.



भूगाव येथील द पूना वेस्टर्न क्लब येथे पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत ८ वर्षाखालील मुलांच्या गटात अव्वल मानांकित शौर्य कलवागट्टू याने चौथ्या मानांकित आयुष मदणीकरचा ७-४ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. याच मुलींच्या गटात वीरा परदेशी हिने मायरा सर्बाभोमचा ६-४ असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला.

१० वर्षाखालील मुलींच्या गटात अंतिम लढतीत बिगरमानांकित आराध्या पवार हिने अव्वल मानांकित समायरा ताम्हाणेचा ७-३ असा पराभव करून विजेतेपद मिळवले. मुलांच्या गटात अंतिम फेरीत अव्वल मानांकित अर्जुन कोगेकर याने तिसऱ्या मानांकित अहान नारगोळकरचा ७-३ असा पराभव करून विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना करंडक व प्रशस्तिपत्रक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण द पूना वेस्टर्न क्लबचे व्यवस्थापक नितीन गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

## ७ वी खेलो इंडिया युवा स्पर्धा, बिहार २०२५

# जलतरणात महाराष्ट्राची पदक सप्तमी, आदितीला सुवर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जलतरणात सलग दुसऱ्यांदा आदिती हेगडेने सुवर्णपदकाची लुट करीत ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रासाठी पदकाचे खाते उघडले. आदितीच्या १ सुवर्णासह १ रौप्य व ४ कांस्य पदकांची कमाई करीत महाराष्टाने सोमवारी पदकाची सप्तमी साजरी केली.



गया शहरातील बीआयपीएआरडीच्या जलतरणात तलावावर अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी पदकांची लयलूट केली. आदिती हेगडेने १ सुवर्ण, १ कांस्य, समाईरा मल्होत्राने १ रौप्य, तर शुभम जोशी, झारा बक्षी, वेदांत तांदळे, ऋजुता राजाज्ञा यांनी कांस्य पदके जिंकून दिवस गाजविला.

मुलींच्या २०० मीटर फ्रीस्टाईल प्रकारात मुंबईच्या आदिती हेगडे २ मिनिटे ९.५१ सेंकद वेळेत शर्यत पूर्ण करून महाराष्ट्रासाठी स्पर्धेतील पहिले पदक जिकले. चुरशीच्या शर्यतीत शतांश सेकंदाच्या फरकाने दिल्लीच्या तितिक्षा रावतला मागे टाकून आदितीने बाजी मारली. तितिक्षाला २ मिनिटे ९.५८ सेंकद वेळेसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. याचबरोबर ८०० मीटर फ्रीस्टाईल प्रकारात आदितीला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. आदितीचे खेलो इंडिया स्पर्धेतील हे ६ वे पदक ठरले. गत तामिळनाडू स्पर्धेत तीने पदकाचा चौकार झळकविला होता. मुंबईतील खेलो इंडिया अॅकॅडमीत ती सराव करत असते.

मुलींच्या १०० मीटर बेस्ट स्ट्रोक प्रकरात महाराष्ट्राचा डबल धमाका बघायला मिळाला. मुंबईच्या समाईरा मल्होत्रा व झारा बक्षी यांनी अनुक्रम रूपेरी व कांस्यपदकाला गवसणी घातली. कर्नाटकच्या मानवी वर्माने सुवर्णपदक जिंकले. मुलांच्या १०० मीटर बेस्ट स्ट्रोक प्रकरात ठाणेच्या शुभम जोशीने कांस्यपदकाची कमाई केली. कर्नाटकच्या क्रीश सुकुमारने सुवर्ण पदकाचा पल्ला पार केला.

मुलांच्या ५० मीटर बटरफ्लाय प्रकारात पुण्याच्या जलतरणपटूंनी महाराष्ट्रासाठी पदकांचा करिश्मा घडविला. मुलांच्या गटात पर्दापणातच वेदांत तांदळेने कांस्यपदकावर नाव कोरले.

#रा